दैनिक "वृत्तमानस" साठी पाठविण्यात येणाऱ्या बातम्या आणि अन्य कार्यालयीन कामासाठी कृपया editorvm22@gmail.com या मेल वर पत्रव्यवहार करावा

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई/ पालघर | बुधवार, १७ जानेवारी २०२४ | वर्ष- २७ | अंक-२०८ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

पुन्हा अध्यक्षपदी निवड झाल्यास इस्रायलचा प्रश्न चुटकीशीर सोडवणार

पान 8



# ठाकरे शिवसेनेचा 'लाव रे तो व्हिडिओ'



## थेट जनतेसमोर पुरावे समोर ठेवत नार्वेकरांच्या निकालाची केली चिरफाड

**प्रतिनिधी**
**मुंबई**

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाचा निकाल नुकताच दिला.खरी शिवसेना ही एकनाथ शिंदे यांचीच असल्याचा निर्णय देत शिंदे गटाचे आणि ठाकरे गटाचे आमदार पात्र ठरवले. मात्र,राहुल नार्वेकर यांनी दिलेल्या या निर्णयाविरोधात ठाकरे गटाने आता महापत्रकार परिषद घेत थेट शिवसेनेच्या कार्यकारिणीचे व्हिडिओच दाखवले आहेत. ठाकरे गटाच्या या पत्रकार परिषदेला 'जनता न्यायालय'असं नाव देण्यात आलं आहे.

शिवसेना पक्षाचा निर्णय देताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिवसेनेची 2013 आणि 2018 ची घटना नसल्याचं निरीक्षण नोंदवत 1999 नंतर घटना नसल्याचे राहुल नार्वेकर यांनी निवडणूक आयोगाच्या हवाल्याने सांगितले.


आता याच मुद्यांवर ठाकरे गटाचे नेते ॲड.अनिल परब यांनी थेट 2013 ला शिवसेनेच्या कार्यकारणीत झालेले निर्णय वाचून दाखवले. याबरोबरच 2013 च्या कार्यकारणीत कोणकोणते ठराव झाले, या कार्यकारिणीवेळी कोण-कोण उपस्थित होते, याचा थेट व्हिडिओच दाखवला. तर या व्हिडिओमध्ये आत्ता विधानसभेचे अध्यक्ष असलेले राहुल नार्वेकर हे 2013 ला शिवसेनेत होते.

एवढंच नाही तर शिवसेनेच्या कार्यकारिणीच्या ठरावावेळी राहुल नार्वेकर हे तेथे स्वत:उपस्थित असल्याचं व्हिडिओत दिसून येत आहे. याबरोबरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, रामदास कदम, राहुल शेवाळे यांच्यासह आदी नेते त्यावेळी तेथे उपस्थित असल्याचं व्हिडिओत दिसत आहे.

शिवसेनेच्या या प्रकरणाची जवळपास दीड वर्ष सुप्रीम कोर्टात सुनावणी सुरू होती. कपिल सिब्बल शिवसेनेची बाजू मांडत होते. 16 गद्दार आमदार पान ६ वर

## आता जनतेने ठरवावं कोणाला पुरावा, गाडावा की तुडवावा

**मुंबई :** नार्वेकरांनी, शिंदेंनी माझ्यासोबत जनतेमध्ये यावं आणि तिथं सांगावं शिवसेना कुणाची? असं म्हणत उद्धव ठाकरेंनी विरोधकांना आज थेट आव्हान दिलं. सुप्रीम कोर्टाकडून आता शेवटची आशा आहे. लोकशाहीचा मूलभूत घटक असणाऱ्या जनतेच्या न्यायालयात आपण आलो आहोत. सरकार कोणाचंही असलं तरी, सत्ता ही सामान्य जनतेचीच असली पाहिजे. माझं आव्हान आहे. नार्वेकरांनी, शिंदेंनी माझ्यासोबत जनतेमध्ये यावं आणि तिथं सांगावं शिवसेना कुणाची? मग जनतेने ठरवावं कोणाला पुरावा, गाडावा की तुडवावा.



शिवसेना जर तुम्ही विकली असाल तर मी जिथे जिथे जातो, तिथे तिथे शिवसैनिक माझ्यासोबत कसे?, राज्यपालांना विनंती करतो, एक अधिवेशन पुन्हा बोलवा, विधानसभा अध्यक्षांविरोधात अविश्वास ठराव आणा. मी तुम्हाला पाठिंबा देतो. हाकला त्यांना... व्हीपचा अर्थ आहे चाबूक... चाबूक लाचारांच्या हातात शोभत नाही. शिवसेनाप्रमुखांच्या आणि शिवसैनिकांच्या हातात शोभतो, असं म्हणत उद्धव ठाकरेंनी आज जोरदार निशाणा साधला.

### रा.स्व.संघ-भाजपच्या नागपुरातील बैठकीत अजित पवारांच्या गटाबाबत दिर्घ मंथन

# महायुती लोकसभा निवडणूक कमळ चिन्हावर लढणार ?

**सुनील ओसवाल**
**मुंबई**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपच्या बैठकीत उपमुख्यमंत्री अजित पवार गटाबाबत बरेच मंथन झाल्याचे खात्रीलायकरित्या समजते. भाजपला राज्यात ४८ जागा पाहिजेत म्हणुन संघ आग्रही आहे, असे सांगण्यात येते. लोकसभा निवडणुकीत राज्यातल्या सत्तास्थापनेचा बागुलबुवा न करता सोबत असलेल्या पक्षांना कमळ चिन्हावर निवडणूक लढविण्यास सांगावे, असे तब्बल सहा तास चालेल्या बैठकीत संघाने सांगितले असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. बैठकीत ७० वय असलेल्या विद्यमान खासदारांच्या जागी नवा चेहरा देण्यावरही चर्चा झाल्याचे समजते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्यांच्याशी संबंधित संघटनांची समन्वय बैठक पार पडली. सोमवारी रेशमबाग येथील हेडगेवार स्मृती भवनात झालेल्या बैठकीत केंद्रीय विदर्भ प्रांत आणि पश्चिम विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते. भाजपच्यावतीने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचीही या बैठकीला उपस्थिती होती .

मागील दोन वर्षात राज्यात झालेल्या राजकीय बदलांचा निवडणुकीवर होणारा परिणाम यावर विशेष चर्चा झाली. सोबतच शिवसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकीट वाटपाबाबतही मंथन झाल्याचे कळते. अजित पवार यांचा पक्ष पुरोगामी विचारांचा असून याबाबतही दिर्घ चर्चा झाल्याचे सांगण्यात येते.

संघाने सहयोगी संघटनांच्या माध्यमातून लोकसभा मतदारसंघ स्तरावर सर्वेक्षण केले आहे. विधानसभा निवडणुकीत संघाचे सर्वेक्षण सर्वाधिक अचूक ठरले होते. भाजपच्या मुख्यमंत्री

**Exclusive वृत्तमानस**

निवडीच्या बाबतीतही संघाच्या त्या अहवालांना महत्त्व देण्यात आले होते. संघाच्या 36 संघटनांमध्ये राष्ट्र सेविका समिती, वनवासी कल्याण आश्रम, विश्व हिंदू परिषद, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भाजपा किसान संघ, विद्या भारती, भारतीय मजदूर संघ, संस्कार भारती, सेवा भारती, अखिल भारतीय साहित्य परिषद यांचा समावेश आहे. विदर्भ आणि महाराष्ट्रातील ज्या जागांवर भाजपची स्थिती चांगली नाही, अशा जागांवर मुख्य लक्ष केंद्रित केले जाणार असून महाराष्ट्रात सुरु असलेल्या मराठा आरक्षण आंदोलनाबाबत देखील चर्चा झाल्याचे समजते.

येत्या २२ रोजी अयोध्या येथील राम मंदिराचे लोकार्पण असल्याने अधिकाधिक नागरिकांना या सोहळयात सहभागी करून घ्या, निमंत्रणासाठी गावोगावी आणि घरोघरी जाण्याचा सल्ला यावेळी भाजपच्या कार्यकर्त्यांना संघाच्यावतीने देण्यात आला. पंतप्रधानांनी आधीच सूचित केले आहे की, पक्षाचे लक्ष तरुण आणि महिलांवर असेल. हे साध्य करण्यासाठी ७० वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या खासदारांना नारळ दिला जाण्यावरही चर्चा झाल्याचे समजते. सध्या पक्षात एकूण ५६ खासदारांचे वय ७० आणि त्यापेक्षा जास्त असल्याचे समजते.

### शिंदे शिवसेनेला 'कमळ'वर निवडणूक लढवायला लावण्यासाठी भाजपचा दबाव?

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाच्या तेरा खासदारांसमोर कमळ किंवा धनुष्यबाण, अशा दोन्ही चिन्हांचे पर्याय ठेवले असून भाजपकडून कमळ या चिन्हावर निवडणूक लढवावी म्हणून प्रयत्न केले जात असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. मोदींना पंतप्रधान करण्यासाठी एकाच चिन्हावर निवडणूक लढविण्याचा आग्रह भाजपा कडून केला जात असल्याचे समजते. भाजपने एकाही विद्यमान खासदारास किंवा उमेदवारी करण्यास उत्सुक असलेल्या उमेदवारास कामाला लागा, अशी सूचना दिलेली नाही. मात्र भाजपा उमेदवारी देतांना शिंदे गटावर दबाव आणून उमेदवार बदलण्याचा प्रयत्न करणार, अशीही चर्चा आहे. या चर्चेला अनुसरून शिंदे गटाच्या काहींनी आतापासून इतर पक्षांशी आपले सुत जमवून घेण्याचा प्रयत्न सुरु केल्याचे वृत्त आहे. आता काहींना दगाफटका होण्याची भीती सतावू लागली असल्याचे समजते. भाजपने पाच राज्यांच्या निवडणुकांत उमेदवारी देताना धक्का तंत्राचा वापर केला. काही खासदारांना उमेदवारी दिली, तर काहींना निवडून आल्यानंतर मंत्री देखील केले. राज्यातील लोकप्रिय चेहऱ्यांना बाजूस सारून प्रचार यंत्रणा राबविली. आता लोकसभा निवडणुकीतही नवे चेहरे देऊन या तंत्राचा वापर तर केला जाणार नाही ना, अशी धाकधूक बऱ्याच विद्यमान खासदारांच्या मनात आहे.

## दावोसमध्ये पहिल्याच दिवशी ७० हजार कोटींचे सामंजस्य करार

**दावोस**

राज्यात एकीकडे राजकीय रणधुमाळी सुरू असताना दुसकीडे आज 16 जानेवारी रोजी दावोस येथे राज्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा तीन प्रकल्पांसाठी 70 हजार कोटी रुपयांच्या सामंजस्य करारावर मॅग्नेटिक महाराष्ट्राच्या अद्ययावत अशा दालनात स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्योगमंत्री उदय सामंत उपस्थित होते.



ग्रीन हायड्रोजन प्रकल्पासाठी आयनॉक्स एअरसमवेत 25 हजार कोटींचा करार करण्यात आला. आयनॉक्स एअर प्रोडक्शन बरोबर 25 हजार कोटींच्या सामंजस्य करारावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी करण्यात आली. बीसी जिंदाल यांच्याशी 41 हजार कोटींच्या सामंजस्य करारावर देखील आज स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. महाराष्ट्रात आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा हब निर्माण करण्यासाठी महाप्रीत आणि अमेरिकेच्या प्रिडीक्शन्स 4000 कोटी रुपये गुंतवणुकीचा करार करण्यात आला.

## म ह त्त्वा चे

### दोन विमानांची टक्कर, 289 प्रवासी थोडक्यात बचावले

**टोकियो :** जपानमध्ये दोन आठवड्यांतील दुसरा मोठा विमान अपघात झाला आहे. आज दोन विमान टक्कर झाली आहे. हा अपघात जपानच्या उत्तरी बेटाच्या होक्काइडो येथील न्यू चिटोस विमानतळावर झाला. कँथे पॅसिफिक एअरवेजचे विमान विमानतळावर उभे होते. यावेळी लँडिंग करणाऱ्या कोरियन एअरलान्सच्या विमानची टक्कर झाली. कोरियन एअरलान्सच्या विमानात २८९ प्रवासी होते. एक विमान कोरियन एअरलाइन्सच्या विमानाला धडकल्याचे निवेदनात म्हटले आहे. त्यानुसार, कॅथे पॅसिफिक विमानात एकही प्रवासी किंवा चालक दलातील सदस्य नव्हते. दरम्यान, तेथे लँडिंग करणाऱ्या कोरियन एअर ए330 ची धडक झाली.

### 'डायरेक्ट टू मोबाईल' प्रसारणाची लवकरच चाचणी...

**नवी दिल्ली :** D2H ला मिळणार नवीन पर्याय! केंद्र सरकारची माहिती 'डायरेक्ट-टू-मोबाइल' प्रसारण लवकरच प्रत्यक्षात येऊ शकते. यामध्ये मोबाइल वापरकर्ते सिम कार्ड किंवा इंटरनेट कनेक्शनशिवाय व्हिडिओ स्ट्रीम करू शकतील. एका प्रसारण परिषदेला संबोधित करताना माहिती आणि प्रसारण सचिव अपूर्व चंद्रा यांनी ही माहिती दिली आहे. 'डायरेक्ट-टू-मोबाइल' प्रसारण लवकरच प्रत्यक्षात येऊ शकते. यामध्ये मोबाइल वापरकर्ते सिम कार्ड किंवा इंटरनेट कनेक्शनशिवाय व्हिडिओ स्ट्रीम करू शकतील. एका प्रसारण परिषदेला संबोधित करताना माहिती आणि प्रसारण सचिव अपूर्व चंद्रा यांनी ही माहिती दिली आहे. देशांतर्गत डायरेक्ट-टू-मोबाइल (D2M) तंत्रज्ञानाची लवकरच 19 शहरांमध्ये चाचणी केली जाईल. यासाठी 470-582 मेगाहर्ट्झ स्पेक्ट्रम देण्यासाठी मजूत तयारी करण्यात येईल.

## आता विमानतळावर होणार 'वॉर रुम'

**प्रतिनिधी**
**नवी दिल्ली**

धुक्यामुळे विमान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तर नागरी विमान वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी पुढील भविष्यातील स्थिती कमी करण्यासाठी एअरलाइन्स कंपन्यांना मानक कार्यप्रणाली जारी केल्या आहेत. धुक्यामुळे होणारे व्यत्यय आणि प्रवाशांची गैरसोय कमी करण्यासाठी काल सर्व विमान कंपन्यांना मानक कार्यप्रणाली (SOPs) जारी करण्यात आल्याचं त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलंय. सर्व ६ मेट्रो विमानतळांसाठी दिवसातून तीनवेळा घटनेचा अहवाल मागवण्यात आला. SOP आणि CAR चे निरीक्षण केले जाईल आणि नियमितपणे अहवाल दिला जाईल. तसेच विमानतळांवर 'वॉर रूम' उभारण्यात येणार असल्याचं सांगितलं जात आहे.

**प्रवाशांच्या सुविधेसाठी नव्या एसओपी**

**लोकसभेसाठी महायुतीचा फॉर्म्युला ठरला**

## भाजप ३२, शिंदे गट १० तर पवार गट ६ जागा लढणार?

**विशेष प्रतिनिधी**
**मुंबई**

राज्यात महाविकास आघाडीचे जागावाटप जवळजवळ अंतिम झाले असताना भाजप आणि महायुती जागावाटप देखील अंतिम झाले आहे. सूत्रांनुसार महाराष्ट्रातील ४८ पैकी ३२ जागा भाजप लढणार आहे तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला १० जागा आणि राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला ६ जागा मिळण्याची शक्यता आहे, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली. मात्र जागावाटप करताना ज्यांची जिथे ताकद त्यांचे तिथे उमेदवार हे निकष लावण्याची शक्यता आहे.

महायुतीमध्ये भाजपसह शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार गट आणि अन्य काही पक्ष आहेत. या सर्व पक्षांमध्ये प्रामुख्याने तीनच पक्ष लोकसभेला आपले उमेदवार लढवतील, असेही समजते. ४८ पैकी सोबत असलेल्या मित्र पक्षांना काही जागा प्रमुख पक्षांच्या कोट्यातून दिल्या जाऊ शकतात. दरम्यान, गेले काही दिवस महाराष्ट्रातील लोकसभेच्या जागा वाटपाबाबत सुरू असलेला तिढा महायुतीसह महाविकास आघाडीमध्येही सुरु आहे. महायुतीमध्ये एकनाथ शिंदे यांच्यासोबत तेरा खासदार आहेत. त्यामुळे एकनाथ शिंदे यांना दहा जागा दिल्यास अन्य तीन खासदारांचे काय हा प्रश्न देखील महायुतीसमोर असणार आहेत. त्यासोबतच अजित पवार गटाला केवळ सहा जागा दिल्या जातील तर अजित पवार गट नाराज होण्याची शक्यता आहे.



### अजित पवार गटाला सहा जागा

*अजित पवार गटाला ज्या सहा जागा दिल्या जाऊ शकतात त्यामध्ये बारामती, शिरूर, सातारा, भंडारा-गोंदिया, रायगड आणि मावळ लोकसभा असण्याची शक्यता आहे. यामध्ये केवळ रायगडमध्ये अजित पवार गटाचे खासदार आहेत. बारामती, सातारा आणि शिरूरमध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार आहेत. भंडारा- गोंदियामध्ये भाजप आणि मावळमध्ये शिंदे गटाचे खासदार आहेत. सध्या लोकसभेत निवडून गेलेले सुनिल तटकरे हे एकमेव खासदार अजित पवार गटासोबत आहेत.*

## मराठा आरक्षण मसुद्याबाबत तज्ज्ञांशी चर्चा करून सरकारला कळवणार : मनोज जरांगे

**प्रतिनिधी**
**जालना**

राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने आज मराठा आरक्षणाचा मसुदा दुरुस्ती करून आणला आहे. याबाबत उद्यापर्यंत कायदे तज्ञ व अभ्यासक यांच्याशी चर्चा करून मसुद्याबाबत सरकारला उत्तर कळवणार असल्याचे मराठ आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी आज स्पष्ट केले. जरांगे यांच्या मुंबई मोर्चाच्या निमित्ताने सरकारची सुरू असलेली पूर्वतयारी याबाबत आ. बच्चू कडू व मुख्यमंत्र्यांचे खासगी सचिव मंगेश चिवटे, जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, अप्पर जिल्हाधिकारी रिता मेहत्रेवार, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोमाणे यांच्या शिष्टमंडळाने आज अंतरवालीत जरांगे- पाटील यांची भेट घेतली. सरकार दोन दिवसांत जो अध्यादेश काढणार आहे, त्या अध्यादेशातील काही दुरुस्त्या जरांगेंनी सुचवल्या होत्या. त्या अनुषंगाने त्या मसुद्याचा कच्चा ड्राफ्ट या शिष्टमंडळाने जरांगे - पाटील यांना दाखवला.



यावर जरांगे- पाटील म्हणाले की, पुरावे सापडले त्यांच्या रक्ताच्या नात्यातील सगेसोयऱ्यांना लाभ देण्यासाठी जीआर काढला असला तरी ५४ लाख नोंदी सापडूनही लाभार्थ्यांना जातीचे प्रमाणपत्र देत नसतील, तर हा जीआर फक्त कागद म्हणून राहील, मग असला जीआर काढून काही अर्थ होणार नाही. दोन दिवसांत तातडीने प्रमाणपत्र वितरित करून परिवारातील आणि रक्तातील नातवाईकांना प्रमाणपत्र दिले. तर आमचे आंदोलन यशस्वी झाले असे होईल. नाही तर पुन्हा फसवणूक केली. तर मुंबईत आंदोलनावर ठाम असल्याचे जरांगेंनी सांगितले.

## 'इंडिगो' प्रवाशांचे हाल धावपट्टीवरच खाल्लं जेवण; विमानतळ प्रशासनाला केंद्राची नोटीस

**प्रतिनिधी**
**मुंबई**

मुंबई विमानतळाच्या धावपट्टीवर प्रवाशांनी जेवण करतानाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्यानंतर विमान वाहतूक मंत्रालयाने विमानतळ प्राधिकरण आणि इंडिगोला नोटीस बजावली होती. याप्रकरणी कारवाई सुरू करण्यात आल्याचे इंडिगोने आज सांगितलं आहे. एअरलाइनने सांगितलंय की, अंतर्गत तपासणी केली जाईल आणि तपासणीनंतर प्रोटोकॉलनुसार नोटीसचे उत्तर दिले जाईल. 14 जानेवारीला गोव्याहून दिल्लीला जाणारे विमान मुंबईकडे वळवण्यात आलं होतं. त्यानंतर प्रवासी धावपट्टीवर जेवण करताना दिसले. त्याचा व्हिडिओही व्हायरल झाला होता. केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी सोमवारी मध्यरात्री या संदर्भात अधिकाऱ्यांची बैठक घेतली होती.



## म ह त्त्वा चे

### आंध्रच्या काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदी शर्मिला

**नवी दिल्ली :** आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिवंगत वाय. एस. आर. रेड्डी यांच्या कुटुंबामध्ये राजकीय नाट्य रंगण्याची शक्यता आहे. वायएसआर काँग्रेसचे अध्यक्ष आणि आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांना त्यांचीच बहीण वायएस शर्मिला यांनी आव्हान दिले आहे. तसेच काही दिवसांपूर्वीच शर्मिला यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. काँग्रेस प्रवेशानंतर वायएस शर्मिला यांच्याकडे काँग्रेसने आंध्र प्रदेशचे प्रदेशाध्यक्षपद सोपवले आहे. त्यामुळे येत्या काळात आंध्र प्रदेशमध्ये भाऊ विरुद्ध बहीण असा सामना रंगण्याची शक्यता आहे. या नियुक्तीबाबत काँग्रेसकडून एक ट्विट करण्यात आले आहे. त्यात म्हटलेय की, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांन वायएस शर्मिला यांना तत्काळ प्रभावाने काँग्रेसच्या आंध्र प्रदेशमधील प्रदेशाध्यक्षपदावर नियुक्त केले आहे.

### पंतप्रधान मोदी आठवड्यातच पुन्हा महाराष्ट्र दौऱ्यावर

**सोलापूर :** पंतप्रधान मोदी आता सोलापूर दौऱ्यावर येत आहेत. त्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून दौऱ्याची जय्यत तयारी सुरू आहे. सोलापुरात 365 एकर जागेवर गृह प्रकल्प उभारण्यात आला. यावेळी पंतप्रधान मोदी हे सुमारे 30 हजार पैकी 15 हजार तयार घरांचं वाटप करणार आहेत. गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी म्हाडाच्या माध्यमातून उभारलेल्या या महत्त्वकांक्षी प्रकल्पाचं उद्घाटन पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते होणार आहे. काही दिवसांवर लोकसभा निवडणूक आहे. त्या पार्श्वभूमीवर मोदींनी महाराष्ट्रात दौरे वाढवलेत अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे. सध्या सोलापूर जिल्ह्याला भाजपाचे डॉ. जय सिद्धेश्वर महास्वामी महाराज खासदार आहेत. ते आपल्या जातीच्या दाखल्यामुळे अडचणीत आले आहेत.

# प्राणप्रतिष्ठा हा फक्त मोदींचा कार्यक्रम...

## त्यामुळे काँग्रेस अयोध्येत त्यावेळेस जाणार नाही!

**वृत्तसंस्था**
**कोहिमा**

राहुल गांधी म्हणाले, 22 जानेवारीला अयोध्येत होणाऱ्या रामलल्ला मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेचा कार्यक्रम मोदी-आरएसएसचा कार्यक्रम आहे. आरएसएस आणि भाजपने 22 तारखेला निवडणुकीचा तडका दिला आहे. काँग्रेस अध्यक्षांनी या कारणास्तव तेथे जाण्यास नकार दिला आहे. आम्ही सर्व धर्मांसोबत आहोत. ज्याला काँग्रेस सोडायची असेल तो सोडू शकतो.

भारत जोडो न्याय यात्रेच्या तिसऱ्या दिवशी राहुल यांनी ही प्रतिक्रिया दिली. कोहिमा (नागालँड) येथील विश्वेमा गावातून राहुल गांधींनी यात्रेला सुरुवात केली. I.N.D.I.A. मधील जागावाटपाबाबत राहुल म्हणाले की, आघाडी निवडणूक लढवेल आणि जिंकेल. जागा वाटपाबाबत आमची चर्चा सुरू आहे. बऱ्याच ठिकाणी सोपे आहे, काही ठिकाणी थोडे अवघड आहे, पण आम्ही जागा वाटपाचा प्रश्न सहज सोडवू. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांना I.N.D.I.A.चे संयोजक बनवल्याबद्दल ममता बॅनर्जींच्या नाराजीवर राहुल म्हणाले, या छोट्या समस्या आहेत, त्या सोडवल्या जातील. आपल्या सर्वांमध्ये समन्वय आहे. सोमवारी राहुल गांधींनी इंफाळ पश्चिम येथील सेकमाई येथून प्रवासाला सुरुवात केली. राहुल गांधींनी त्यांच्या ट्रेडमार्क पांढऱ्या टी-शर्ट आणि पँटसह पारंपरिक मणिपुरी जॅकेट घातले होते. वाटेत लोकांशी बोलण्यासाठी आणि त्यांच्या समस्यांवर चर्चा करण्यासाठी राहुल यात्रा मार्गावर अनेक वेळा बसमधून उतरले. त्यांनी लोकांसोबत सेल्फी काढले आणि पारंपरिक नृत्य सादरीकरणही पाहिले. ते मैतेई आणि कुकी या दोन्ही समुदायांच्या परिसरातून गेले. गांधींनी कांगपोकपी जिल्ह्यालाही भेट दिली जिथे गेल्या वर्षी मे महिन्यात दोन महिलांना विवस्त्र करून परेड करण्यात आली होती. रात्री यात्रा नागालँडला पोहोचली. राहुल पक्षाच्या सहकाऱ्यांसह मणिपूरच्या सीमेला लागून असलेल्या कोहिमा जिल्ह्यातील खुजामा गावात पोहोचले आहेत.



**मुंबई:** दादासाहेब फाळके चित्रपट युनियन चे राष्ट्रीय अध्यक्ष अजित म्हानुनकर यांनी पत्रकार परिषद घेऊन मिस मुंबई 2024 के ग्रंड फिनाले की तारीख डिक्लेअर केलेली आहे, 14 फेब्रुवारी 2024 ला ग्रांड फिनाले होणार, या पत्रकार परिषदेमध्ये नामांकित बॉलीवूड कलाकार उपस्थित होते, बलजीत विर्क,नईब सिंग, रमेश गुप्ता, संजय वर्मा, अमित मिश्रा, डॉक्टर दीपक, सोनिया सोनी, मुनमुन सरकार, अमरीश सिंग, अरुण झा, नीलम शेठ, तसेच बालकलाकार, मीडिया मार्केटिंग रिपोर्टर जगदीश हांडे, राधा सिंग ,स्वप्नील तलाठी, कलाकार उपस्थित होते , बालकलाकार जय वर्मा आणि नाशिकवर्मा, यांनी खूप चांगली कॉमेडी करून, पत्रकारांचे आणि पार्टिसिपेंटचे मन जिंकून घेतले, त्यांचे खूप चांगल्या प्रकारे करमणूक केली, युनियनचे सर्व भारतातले स्टेट चे जिल्ह्यातले सदस्य व प्रेसिडेंट उपस्थित होते, यामध्ये सरला दिलीप इंगळे वर्किंग प्रेसिडेंट ऑफ यवतमाळ व नागपूर येथील डॉ. सारिका दोरखंडे उपस्थित होत्या, तसेच प्रत्येक जिल्ह्यातून दादासाहेब फाळके युनियन इंडिया यांचे पदाधिकारी उपस्थित होते, तसेच संपूर्ण महाराष्ट्रातून सर्व मॉडेल्स ने या मिस मुंबईच्या 2024 ला सहभागी व्हावे असे आवाहन राष्ट्रिय अध्यक्ष अजित म्हानुनकर यांनी केले आहे,



## थोडक्यात

### गोखिवरे वन विभागाची बंदुक चोरली कोणी?

**वसई:** दि.14/10/2016 रोजी एका डुप्लीकेट चावीच्या साह्याने चोरपावलांनी गोखिवरे वनपरिक्षेत्राच्या कार्यालयात घुसून वरीष्ठ अधिकाऱ्याचे लॉकर उघडून त्यातील एक शासकीय परवाना असलेली बंदुक व 5 जिवंत काडतुसे चोरट्यांनी पळवून नेण्यात आली होती. सदरप्रकरणी वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र 7 वर्षानंतरही तपास शून्य असल्याने गोखिवरे वन विभागाची बंदुक कोणी चोरली यावरील प्रश्नचिन्ह अद्याप कायम आहे. गोखिवरे वन परिक्षेत्राचे वरीष्ठ अधिकारी डी.एन. तोंडे यांना शासनाने एक सर्व्हिस बंदुक म्हणून वापरण्यासाठी दिली होती. मात्र सात वर्षापूर्वी ही बंदूक कोण्या अज्ञात चोरट्याने पळवून नेली होती. मात्र या बंदुकीचा अद्याप ठावठिकाणा लागलेला नाही. ही बंदुक वन प्रशासनातीलच एका झारीच्या शुक्राचार्याने लंपास केली असल्याचा संशय आहे. मात्र अद्याप पोलीस सदरबाबतीत तपास करण्यात स्वारस्य दाखवत नसल्याने शासनाच्या परवाना बंदुकीचा एखादा इसम गैरवापर करण्याची भिती व्यक्त होत आहे.

### दोन हजाराची लाच घेताना वीज अभियंता रंगेहात अटकेत

**वसई:** एम.एस.ई.बी.चा कनिष्ठ अभियंता राजेश रविशंकर गुप्ता याला दोन हजाराची लाच घेताना ठाण्याच्या लाचलुचपत विभागाने रंगेहात अटक केली आहे. फिर्यादी कडून दुकानस लाईटचे दोन मिटर लावून देण्याकरीता त्याने दोन हजार लाचेची मागणी केली होती. फिर्यादीने याबाबत तक्रार ठाणे लाच लुचपत विभागाला केल्यावर ठाण्याच्या लाचलुचपत विभागाने सापळा रचून, सोमवारी दुपारी तीन वाजता दोन हजार घेताना रंगेहाथ गुप्ताला पकडलं. मंगळवारी रात्री अडीज वाजता त्याच्यावर नायगांव पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, राजेश गुप्ता याला अटक करण्यात आली आहे. राजेश गुप्ता याला याआगोदरही लाच घेताना अटक करण्यात आली होती. आता ही त्याची दुसरी वेळ आहे.

### एकतर्फी प्रेमातून युवतीच्या गळ्यावर ब्लेडने वार

**मुंबई:** १९ वर्षीय महाविद्यालयीन तरुणीच्या गळयावर ब्लेडने वार केल्याप्रकरणी दिंडोशी पोलिसांनी ३५ वर्षीय व्यक्तीला मंगळवारी पहाटे अटक केली. तरूणीने प्रेमाचा प्रस्ताव नाकारल्यामुळे महाविद्यालयातून परतत असताना आरोपीने तरूणीवर हल्ला केल्याचे तपासात निष्पन्न झाले. याप्रकरणी दिंडोशी पोलिसांनी हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. गोरेगाव (पूर्व) येथील संतोष नगरमधील रहिवासी संजय प्रल्हाद बायस याला दिंडोशी पोलिसांनी मंगळवारी राहत्या घरातून अटक केली. तक्रारदार तरुणी कुलसुम शेख ही बायस यांच्या शेजारी राहते आणि वाणिज्य शाखेच्या दुसऱ्या वर्षाची विद्यार्थिनी आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**


वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# वसईत अग्नीसुरक्षेचे तीन-तेरा; आणखी एक कारखाना भक्ष्यस्थानी

प्रतिनिधी
■ वसई

नुकतेच काही दिवसांपूव कामण परिसरात एका कंपनीचे सहा गाळे जळून खाक झाल्याची घटना घडली होती. ही घटना ताजी असतानाच सोमवारी संध्याकाळी वसई पूर्वेकडील सातिवली येथील इको इंडस्ट्रियल कंपनीत आग लागून ती बेचिराख झाली असल्याची घटना घडली आहे. या घटनेत करोडो रूपयांची हानी झाली आहे. यावरून औद्योगिक वसाहतीत अग्नीसुरक्षेची कशी बोंब आहे ते समोर आले आहे.

## पालिकेचे दुर्लक्ष; कंपन्यांमध्ये आगीचे प्रमाण वाढले



वसई पूर्व औद्योगिक पट्ट्यात मोठ्या प्रमाणात कारखाने आहेत. या कारखान्यांत अग्नीसुरक्षेची मोठीच बोंब आहे. त्यामुळे वारंवार आगीच्या दुर्घटना घडूनही कंपनी मालक अग्नी परिक्षणाच्या मुद्दावर हवे ते लक्ष पुरवत नसल्याने अनेक ठिकाणी आग लागण्याच्या दुर्घटना घडत आहेत. वसई- विरारमध्ये औद्योगिक वसाहतींत कंपन्या चालवताना काही अटी व नियम आहेत. मात्र या अटी व नियम कारखानदारांकडून पाळल्या जात नसल्याचे दिसून येते. ज्या इको इंडस्ट्रियलमध्ये सदरची आग लागली त्याच कंपनीच्या काही अंतरावर असलेल्या एका कंपनीत महिनाभरापूव आग लागली होती. या घटनेनंतरही आजुबाजूच्या कारखानदारांनी धडा न घेतल्याचे चित्र दिसून येते.

वसईत अधिकृत कंपन्यांपेक्षा अनधिकृत कंपन्या जास्त आहेत. या कंपन्यांचे सरसकट स्ट्रक्चर ऑडिट होत नसल्याने आगीचे प्रमाण वाढले आहे. दरम्यान, कारखानदार तसेच विकासक गाडी वळवण्यासाठी जी सुरक्षित जागा असते त्याठिकाणी शेड टाकून गेट बंद करत आहेत. त्यामुळे अग्निशमन दलालाही आग विझवताना तारेवरची कसरत करावी लागते. मागील वर्षी 2023 मध्ये सुमारे 80 हून अधिक कारखाने आगीच्या भक्ष्यस्थानी सापडले होते.

# मोखाड्यातील आश्रम शाळेत अमानवी प्रकार जेवताना दोन लाडू हातात दिसल्याने शिक्षकाकडून विद्यार्थ्याला बेदम मारहाण




प्रतिनिधी
■ पालघर

जेवताना केवळ दोन लाडू हातात दिसले म्हणून विद्यार्थ्याला शिक्षकाडून बेशुद्ध होईपर्यंत बेदम मारहाण केल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. धक्कादायक घटना ही पालघर येथील एका आश्रम शाळेत घडली आहे. पीडित विद्यार्थाच्या आई-वडिलांना पोलिसात तक्रार करू नये म्हणून मारहाण करणाऱ्या शिक्षकाने दबाव टाकला होता. यामुळे आश्रम शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत प्रश्न चिन्ह उपस्थित होत आहे.

मोखाडा तालुक्यातील कारेगाव येथील एका शासकीय आश्रमशाळेत नववीत शिकणाऱ्या रुद्राक्ष दत्ता पागी या विद्यार्थ्याला शिक्षकाने बेदम मारहाण केली आहे. विद्यार्थ्याला मारहाण करणाऱ्या शिक्षकाचे नाव ललित अहिरे असे आहे. हा मारहाणींची माहिती प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनी दिली आहे.

नेहमीप्रमाणे रुद्राक्षही सोमवारी (१५ जानेवारी) जेवण घेण्यासाठी गेली असताना त्याच्या हातात दोन लाडू शिक्षकाला दिसून आलेते. त्यावेळी शिक्षकाने रुद्राक्षला प्रश्न विचारला की, तुझ्या हातात दोन लाडू कुठून आले? यानंतर शिक्षकाने रुद्राक्षला काठीने बेशुद्ध पडेपर्यंत मारहाण केली. यानंतर रुद्राक्षला रुग्णालयात दाखल करण्यात आले.

***आश्रमशाळेत सुविधांचा अभाव***

*काही दिवसांपूर्वी गडचिरोली जिल्ह्यातील आश्रम शाळांतील विद्यार्थ्यांना नियमित चहा आणि जेवण देखील मिळत नाही, असा प्रकार देखील समोर आला होता. यासारख्या प्रश्नांना आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना तोंड द्यावे लागेल. या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना आरोग्यसेवाही पुरविल्या जात नाही. या असुविधांच्या अभावामुळे अनेक विद्यार्थी पळून जाण्याच्या घटना घडतात.*

# आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या पत्नीवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी
■ वसई

पतीला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी पत्नीसह अन्य एका तरुणावर नायगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नायगाव पूर्व जुचंद्र येथील राघव चाळीत राहणाऱ्या रिंकू झा याने आत्महत्या केल्या प्रकरणी त्याचे वडील परमानंद झा यांनी नायगाव पोलिस ठाण्यात तक्रार देऊन तरुणाच्या पत्नीसह अन्य एकावर हा गुन्हा दाखल केला आहे. रिंकूचे वडील परमानंद सकाळी कामावर निघून गेल्यानंतर त्यांची पत्नी रेखादेवी रिंकूला चहा- नाष्ट्याबाबत विचारपूस करण्यासाठी त्याच्या बेडरुमजवळ गेल्या.कित्येकदा दार ठोठावून आणि आवाज देऊन ही रिंकूने दरवाजा न उघडल्यामुळे शेजा-यांनी त्याच्या वडिलांना हा प्रकार फोनद्वारे कळविला.ते घरी आल्यानंतर रहिवाशांच्या मदतीने खिडकी खोलून त्यांनी आत प्रवेश केला असता रिकूने गळफास घेतल्याचे दिसून आले. रिंकुचा लहान भाऊ टिंकू आल्यानंतर रिंकू याला खाली उतरवून रुग्णालयात नेले असता, डॉक्टरांनी त्यास मयत घोषित केले.

त्यानंतर रिंकुच्या वडीलांनी नायगाव पोलीस ठाणे गाठून रिंकूची त्याची पत्नी रोशनी आणि जित प्रताप पाठक यांनी रिंकुला आत्महत्येस प्रवृत्त केल्याची तक्रार केली.या दोघांनी वारंवार मानसिक छळ केल्यामुळे रिंकु ने आत्महत्या केल्याच्या तक्रारीवरून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## परप्रांतीयांचे लोंढे थांबणार कधी?

# अनधिकृत चाळींत रूम विकत घेण्यासाठी परप्रांतीयांची सुट्टीच्या दिवशी वसईकडे धाव

प्रतिनिधी
■ वसई

वसई -विरारमध्ये कोरोना आपत्तीच्या निवारणानंतर परप्रांतीयांचे लोंढे मोठ्या प्रमाणात वाढत चालले आहेत. कामाधंद्यासाठी वसईत येणाऱ्या परप्रांतीयांची सर्वाधिक पसंती ही वसई- विरार शहराला आहे. येथे अनधिकृत बांधकामांची संख्या वाढत असून मुंबईच्या मानाने याठिकाणी घर घेणे परवडत असल्याने परप्रांतीय नागरिकांचे लोंढे वाढत चालले आहेत. या लोंढ्यांमुळे वसई- विरारचे नागरिकीकरण झपाट्याने वाढत असून त्यामागोमाग गुन्हेगारीचे प्रमाणही वाढले आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेतील प्रशासकीय राजवट, भ्रष्टाचारात बरबटलेले अधिकारी यामुळे अनधिकृत बांधकामांचा वेग वाढू लागला आहे. या अनधिकृत बांधकामांत पालिकेचा लाखोंचा महसूल वाया जात असून अनधिकृत बांधकामं मात्र सर्वसामान्य नागरिकांच्या कष्टाचा पैसा लुबाडत आहेत. मुंबईतील सामान्य परप्रांतीय चाकरमानी वसईत घर घेणे परवडत असल्याने वसईकडे कुच करू लागला आहे. त्यामुळे येथील वाढते नागरिकीकरण आणि वाढत्या नागरिकीकरणाला अपेक्षित सेवा-सुविधा देण्यात महापालिकेला मात्र तारेवरची कसरत करावी लागत आहे. नायगाव,वसई पूर्वेतील परिसर, नालासोपारा तसेच विरार पूर्व परिसरा अनधिकृत बांधकामांचा वेग मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

दर शनिवारी व रविवारी येथे मुंबईतील परप्रांतीय मोठ्या प्रमाणात रूम पाहायला येत असतात. मात्र अनधिकृत बांधकामांतील रूम या बोगस बांधकाम परवानगी कागदपत्राच्या अनुषंगाने विकण्यात येत असल्याने नागरिकांची त्यात फसवणूक होत आहे. वाढते नागरिकीकरण व त्यामुळे उद्भवलेली गुन्हेगारी लक्षात घेता हे परप्रांतीय लोंढे आवरण्यासाठी वसई -विरार शहर महापालिका व पोलिसांनी एकजुटीने प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याची मागणी होत आहे.

# मेस्टाचे 9 वे राज्यस्तरीय अधिवेशन 18 व 19 जानेवारीला मुंबईत

## आरटीई प्रतिपुर्ती व विविध मागण्यांसाठी मोठा लढा उभारणार

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्र इंग्लिश स्कुल ट्रस्टीज आसोसिएशन (मेस्टा ) या राज्यव्यापी संघटनेचे राज्यस्तरीय अधिवेशन, सास्कृतिक महोत्सव व पारितोषिक वितरण सोहळा २०२४ येत्या १८ आणि १९ जानेवारीला मुंबईत आयोजित करण्यात आले आहे. अधिवेशनाचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शालेय शिक्षण मंत्री दिपक केसरकर, मुंबईचे पालकमंत्री व कौशल्यविकास मंत्री मंगलप्रभात लोढा व विधानपरिषद विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असुन राज्यातील दोन हजार संस्थाचालक या दोन दिवसीय अधिवेशनाला हजेरी लावणार आहेत.

या अधिवेशनास सर्व पक्षीय नेते उपस्थित राहणार आहेत. शिवसेना नेते आ. सचिन अहिर , आ. ज्ञानेश्वर म्हात्रे, आ. वर्षा गायकवाड, आ. संजय केळकर, आ. प्रकाश सुर्वे, आ. यामिनी जाधव, आ. प्रसाद




लाड, प्रहारचे जनशक्ती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष अनिल भाऊ गावंडे, आ. श्रीकांत देशपांडे कार्यक्रमाच्या ब्रँडअँबेसिडर डॉ. निशीगंधा वाड आदींसह मेस्टाचे राज्य कार्यकारीणी, विभागीय कार्यकारीणी व राज्यातील सर्व जिल्हा कार्यकारीणी पदाधिकारी व सदस्य उपस्थित राहणार असुन या अधिवेशनात मांन्यवरांच्या हस्ते या वर्षी प्रथमच देण्यात येणारा प्रतिष्ठेचा शिक्षण महर्षी पुरस्कार विबग्योर हायगृप ऑफ स्कुलचे संस्थाचालक रूस्तोम केरावाला तर जीवन गौरव पुरस्कार पोदार गृप ऑफ स्कुलचे संस्थाचालक पवन पोदार, प्रसिद्ध लेखिका विजया वाड व लोककला अभ्यासक प्रकाश खांडगे यांना जाहीर झाले आहेत.

शिक्षण मित्र म्हणुन अजय दरेकर , योगीता तोडकर, श्रिनिवास ध्यावरशेट्टी डॉ. अशोक गुप्ता यांना दिले जाणार आहेत. याचबरोबर राज्यभरातुन येणाऱ्या इंग्रजी शाळा संस्थाचालकांतुन ११ बेस्ट ट्रस्टी ॲवार्ड, २२ बेस्ट स्कुल ॲवार्ड, १८ बेस्ट प्रिंसिपल ॲवार्ड, ४४ बेस्ट टिचर ॲवार्ड, सांस्कृतिक महोत्सावातील विजेते व वर्ष २०२३-२४ मेस्टा- स्टुडेंट केअर टॅलेंट सर्च परिक्षा दिलेल्या दोन लाख विद्यार्थ्यांमधुन राज्य पातळींवर प्रथम, द्वितीय, तृतिय गुण प्राप्त विद्यार्थि यांना पारितोषिक प्रदान करण्यात येणार आहेत.

शिक्षकांच्या सर्वांगीण मागण्यांना पाठींबा देण्यासाठी राज्यातील इंग्रजी शाळा संस्थाचालक प्रिन्सिपॉल व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित रहाणार आहेत. अशी माहिती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.संजयराव तायडेपाटील, राज्यध्यक्ष प्रा. डॉ. नामदेव दळवी, महीला राज्याध्यक्ष सुदर्शना त्रिगुणाईत, राज्य सरचिटणीस विनोद कुलकर्णी,राज्यउपाध्यक्ष राजेश उजैनकर, राज्य समन्वयक सचिन मलीक, राज्य कोषाध्यक्ष मनिष हांडे,कोकण विभागीय अध्यक्ष गजानन पाटील, मुंबई विभाग कार्याध्यक्ष भालचंद्र दळवी मुंबई संघटक अनिल झोरे, सुरेश शिवलकर ठाणे जिल्हाध्यक्ष नरेश पवार ठाणे जिल्हासरचिटणीस नरेश कोंडा, साईनाथ म्हात्रे, उत्तम सावंत, श्रिनिवास अडेप यांनी दिली.

# मकरसंक्रांत पक्ष्यांच्या जीवावर; मुंबईत मांज्यामुळे 800 पक्षी जखमी

**मुंबई:** मकर संक्रांतीच्या निमित्ताने मुंबईत मोठ्या प्रमाणावर पतंगबाजी झाली. मकरसंक्रांतीनिमित्त रविवारसह सोमवारी पतंग उडविण्यासाठी वापरण्यात आलेल्या धारदार मांजामुळे ८०० पक्षी जखमी झाले आहेत. चर्चगेटपासून विरारपर्यंत घडलेल्या घटनांतील जखमी पक्ष्यांचा हा आकडा आहे. दहिसर, कांदिवली, मालाड, बोरीवली पट्ट्यात अधिक पक्षी जखमी झाल्याचे प्राथमिक माहिती मिळत आहे. मकरसंक्रांतीच्या निमित्ताने इमारतीच्या गच्च्या, मैदाने, मोकळया जागांवर पतंगबाजी रंगली आहे. पतंग उडवण्यासाठी वापरण्यात आलेला मांजा हा अनेक पक्ष्यांसाठी जीवघेणा ठरला आहे. जखमी झालेल्या पक्ष्यांवर उपचार करण्यासाठी रविवारी व सोमवारी वैद्यकीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

**वसई-विरार शहर महानगरपालिका**
प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम)
**मुख्य कार्यालय विरार**
दुरध्वनी क्र. १२२५०-२४०२१७९ / २४०२५६३

जावक क्र.: व.वि.श.म./ क.वि./८४/ २३-२४ दिनांक : १५/०१/२०२४

**जाहिर नोटीस**

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | आचोळे-१२ | NL२१/३२/१४ | ४६५९ | जे. सी. कंन्स्ट्र | राजीव राजेश सोलंकी |
| २. | आचोळे- १२ | NL२१/२३/६४ | ४६६० | जिवन चेतना सोसायटी | दत्ताराम महादेव परब |
| ३. | आचोळे-१२ | NL २१/१४१/२४ | ४७०५ | रामजी विश्वकर्मा | होरीलाल विश्वकर्मा |
| ४. | आचोळे- १२ | NL २१/२१/२५ | ४७१४ | अनिलकुमार मिठु यादव | लालमन मिटु यादव |
| ५. | आचोळे- १२ | NL २१/११२/३२ | ४७२२ | वि मुथु करप्पन | आर. बी. मनीषा रामाकृष्ण |
| ६. | आचोळे- १२ | NL २१/२७५/६६ | ४६३९ | पन्नालाल यादव व जितलाल यादव | पन्नालाल यादव |
| ७. | आचोळे-१२ | NL २१/२८०/३० | ४६५४ | फरीदा शेख | शाकीर अली चंदू अली इदरीसी |
| ८. | आचोळे-१२ | NL २१/२४/३० | ४७९० | ब्रिजेश कुमार जे. सिंग | भूषण अरुण कोलेकर व मनिषा कोलेकर |
| ९. | आचोळे- १२ | NL २१/३/१८ | ४७९८ | सतिश एस. मिस्त्री | मनोजकुमार शिवधर मंडळ व सुमित्रादेवी |
| १०. | आचोळे- १२ | NL२१/४१५/३८ | ४८१२ | जय हनुमान डेव्ह. | अश्वीनी अशोक कदम |
| ११. | आचोळे- १२ | NL२१/३२९/२६ | ४८१८ | अभिनव श्रीवास्तव | दिप्ती संदीप सामंता |
| १२. | आचोळे-१२ | NL २९/३२०/८० | ४८२० | प्रेमचंद स्वदेशी राजपुत | धर्मेंद्र रायसाहब सिंह व प्रतिभा धर्मेंद्र सिंह |
| १३. | आचोळे- १२ | NL २१/१४०/३१ | ४७९४ | शबाना परविन सिराज शेख | रशिदा अल नासिर शेख |
| १४. | आचोळे- १२ | NL २१/७५/२ | ४६९४ | नितिन नरहरी व्यास व इतर | दिलिप राधेश्याम सिंह व बबिता सिंह |
| १५. | आचोळे- १२ | NL २१/६८/१८ | ४७५१ | शबनम असलम मनसुरी | वाजिद खलिल अन्सारी |
| १६. | आचोळे-१२ | NL.२१/७२/८९ | ४७४७ | वैभव पी. पानसरे | खोजा फखरुद्दीन बोहरा |
| १७. | आचोळे-१२ | NL. २९/७१/१ | ४७५२ | किरण कांतीलाल मकवाना व मुकेश मकवाना | संतोषकुमार शर्मा व डिंपल संतोष शर्मा |
| १८. | आचोळे-१२ | NL२१/७१/४ | ४७५७ | गुलाब मूलचंद्र मिना | डूंगर सिंह मिना |
| १९. | आचोळे- १२ | NL २१/१३१/३५ | ४७५४ | हुसेन जुजर गिथम व अबिझेर हकिमुद्दीन भगा | मोहम्मद अनवर जावेद शेख व सुमैया अनवर जावेद शेख |
| २०. | आचोळे- १२ | NL २१/२५४/१७ | ६३६४ | धरमपाल आर वर्मा | विनोद विजयकुमार दोनतुल |

सही/-
(सुरेश पाटील)
प्र. सहा. आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा

# अंधेरी स्थानकावर प. रेल्वेचे 'रेस्टॉरंट ऑन व्हील्स'

## उपनगरीय विभागात अशा प्रकारचा पहिला उपक्रम

प्रतिनिधी
■ मुंबई

आपल्या प्रवाशांसाठी चांगल्या सुविधा आणि सुविधा पुरविण्याच्या मालिकेत, पश्चिम रेल्वेच्या मुंबई सेंट्रल विभागाने अंधेरी रेल्वे स्थानकावर पहिले 'रेस्टॉरंट ऑन व्हील्स' सुरू केले. ही सुविधा त्यांच्या संरक्षकांना वातानुकूलित दर्जेदार जेवणाचा अनुभव देईल.

पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी सुमित ठाकूर यांनी जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, 16 जानेवारी 2024 रोजी अंधेरी स्थानकावर रेस्टॉरंट ऑन व्हील्स सुरू करण्यात आलेही संकल्पना जुन्या सेवा न करता येणाऱ्या डब्यांना चाकांवर बसवून एका आकर्षक रेस्टॉरंट लूकमध्ये रूपांतरित करण्याभोवती फिरते. रेस्टॉरंट सुधारित कोचमध्ये एक अनोखा आलिशान जेवणाचा अनुभव देईल. पश्चिम रेल्वेच्या उपनगरी भागात ही संकल्पना अशा प्रकारची पहिलीच आहे ज्याचा उद्देश रेल्वे प्रवाशांच्या जेवणाच्या अनुभवात बदल घडवून आणण्याचा आहे. या रेस्टॉरंटचे



कंत्राट मेसर्स ओएएम इंडस्ट्रीजला देण्यात आले आहे, जे त्यांच्या ब्रँड नावाने ओळखले जाते- हल्दीराम. रेस्टॉरंटमध्ये एका वेळी 48 संरक्षक बसण्याची क्षमता आहे. रेस्टॉरंट प्रवाशांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि टेकवे काउंटर सुविधा प्रदान करण्यासाठी 24x7 कार्य करेल, ज्यामुळे प्रवाशांना त्यांच्या ऑर्डर लवकर आणि जाता-जाता गोळा करण्यात मदत होईल.

ठाकूर पुढे म्हणाले की, अंधेरी स्थानकावर अत्याधुनिक डिझाईन केलेल्या रेस्टॉरंटमध्ये अत्याधुनिक डिझाईन केलेले रेस्टॉरंट बनवण्याचे काम अंधेरी स्टेशनवर पूर्ण झाले आहे आणि सेवा देण्यासाठी सज्ज आहे. रेस्टॉरंटचे खास आकर्षण मिठाई आणि स्नॅक्स हे असतील ज्यासाठी हल्दीराम जागतिक स्तरावर प्रसिद्ध आहे. या व्यतिरिक्त, रेल्वे प्रवाशांची भूक भागवण्यासाठी रेस्टॉरंटमध्ये त्यांचे बहु-पाककृती अन्न देखील दिले जाईल. बोरिवली आणि वांद्रे स्थानकांवर इतर 'रेस्टॉरंट ऑन व्हील्स'चे काम सुरू आहे. या तीन रेस्टॉरंटचे एकूण करार मूल्य नॉन-फेअर रेव्हेन्यूचा (NFR) भाग म्हणून रु. 5.94 कोटी योगदान देईल. पश्चिम रेल्वे सुरत, वांद्रे टर्मिनस, वलसाड, लोअर परळ आणि वसई रोड स्थानकांवर अशा प्रकारचे आणखी 'रेस्टॉरंट ऑन व्हील्स' सुरू करण्यास उत्सुक आहे.

### राज्य कामगार विमा रुग्णालये आरोग्य विभाग चालवणार

**मुंबई:** राज्य कामगार विमा योजनेअंतर्गत असलेले एकूण विमाधारक आणि विमा योजनेच्या रुग्णालयांमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्या यांचे प्रमाण कमालीचे मोठे असल्याचे आढळून आले आहे. ही रुग्णालये राज्य कामगार विमा सोसायटीमार्फत चालवणे शक्य नसल्यास आरोग्य विभागाअंतर्गत चालविण्याबाबचा प्रस्ताव सादर करण्यास आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी सांगितले आहे.आरोग्यमंत्री सावंत यांनी राज्य कामगार विमा योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या आरोग्य उपचारांचा सविस्तर आढावा संबंधित अधिकारी व डॉक्टरांची बैठक घेऊन सप्टेंबर महिन्यात घेतला होता.

**शुद्धिपत्रक**

दिनांक १०/०१/२०२४ रोजी श्री. रमेश मुलराज निझावन याची जाहीर सूचना प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीत **वर्षा आर. कारंडे** ऐवजी **वर्षा आर. शर्मा** असे वाचावे.

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Political Editor : **Surendra Mulik,** Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Seven**
**Issu - 208**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दुरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ राजकीय संपादक : **सुरेंद्र मुळीक,** निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- सत्तावीस**
**अंक - २०८**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

## पेनांग रोड शो 2024च्या 7व्या आवृत्तीचे भारतात अनावरण

**मुंबई :** मुंबई, नवी दिल्ली, चेन्नई आणि कोची या चार वेगवेगळ्या शहरांमध्ये १५ ते २२ जानेवारी दरम्यान होणाऱ्या पेनांग रोड शो २०२४ च्या बहुप्रतिक्षित ७ व्या आवृत्तीचे अनावरण मुंबईत करण्यात आले. हा मेगा रोड शो भारतीय प्रवासी आणि उद्योग व्यावसायिकांना पेनांगच्या आकर्षणांमध्ये सहभागी होण्याची एक अनोखी संधी प्रदान करणार आहे. पेनांग हे ठिकाण सांस्कृतिक समृद्धता आणि समकालीन आकर्षणाच्या अद्वितीय मिश्रणासाठी ओळखले जाते.'पेनांग ओडिसी' मोहीम हा पीसीईबी चा एक धोरणात्मक उपक्रम आहे ज्याचा उद्देश पेनांगला भारतीय बाजारपेठेतील व्यावसायिक बैठका आणि आरामदायी प्रवास करणाऱ्यांसाठी एक पसंतीचे ठिकाण म्हणून स्थान देण्याचा आहे. व्यवसाय आणि विश्रांती या दोन्हींवर लक्ष केंद्रित करून, मोहीम भारतभरातील ट्रॅव्हल एजंट्ससोबत परस्पर फायदेशीर संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करते. भारताच्या प्रमुख बाजारपेठांपैकी एक म्हणून त्याचे महत्त्व ओळखून, पेनांग ओडिसी मोहीम भारतीय बाजारपेठेला आकर्षित करण्यासाठी नवीन मार्ग शोधण्यासाठी उत्सुक आहे. नेटवर्किंग, सहयोग आणि व्यवसाय विस्तारासाठी डायनॅमिक प्लॅटफॉर्म तयार करून प्रत्येक शहरातून सुमारे २०० खरेदीदार एकत्र येण्याची अपेक्षा आहे.





# राज्यात '...अशी ही पळवापळवी' सुरूच; प्रकल्पांनंतर महाराष्ट्रातून फिल्मफेअर पुरस्कार सोहळाही पळवला

प्रतिनिधी
■ मुंबई

बॉलिवूडचा प्रतिष्ठित आणि मानाचा समजला जाणारा फिल्मफेअर पुरस्कार सोहळा मुंबईत होतो. पण यंदाचा ६९ वा फिल्मफेअर पुरस्कार सोहळा हा गुजरातला होणार आहे. यापूर्वी महाराष्ट्रातील अनेक मोठे प्रकल्प हे गुजरातला गेले आहे. या मुद्यावरून विरोधकांनी महायुती सरकारवर हल्लाबोल करतच असतात. आता फिल्मफेअर पुरस्कार देखील गुजरातला होणार आहे. 'फिल्मफेअर पुरस्कार सोहळा गुजरातला हलवून मुंबईच्या आणखी एका आर्थिक स्त्रोत्रावर हात मारण्याचे पहिले पाऊल टाकले गेले आहे. यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावर काय उत्तर द्यावे?, असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्य जयंत पाटील यांनी केला आहे. यामुळे मुंबई विरूद्ध गुजरात असा वाद पुन्हा होणार आहे. यावर राज्याच्या मुख्यमंत्र्यांसह राजकीय नेते मंडळी काय बोलणार, याकडे सर्वांचे लक्ष लागेल आहे.

फिल्मफेअरसंदर्भात जयंत पाटील ट्वीट करत म्हणाले, "दरवर्षी मुंबई होणारा फिल्मफेअर पुरस्कार सोहळा आता गुजरातमध्ये होणार आहे. यापूर्वी महाराष्ट्रातून प्रकल्प पळवले गेले. आता फिल्मफेअर पुरस्कार सोहळा देखील पळवला गेला. फिल्मफेअर पुरस्कार सोहळा गुजरातला हलवून मुंबईच्या आणखी एका आर्थिक स्त्रोत्रावर हात मारण्याचे पहिले पाऊल टाकले गेले आहे. यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावर काय उत्तर द्यावे?, असा सवाल त्यांनी केला आहे.

### जयंत पाटलांचा सरकारवर निशाणा






**सूत्रसंचालन करण्यासाठी खूप आतुर – करण जोहर**

*फिल्मफेअरच्या वतीने सोमवारी (१५ जानेवारी) जियो वर्ल्ड सेंटर येथे आजोजित केलेल्या पत्रकार परिषदेतून पुरस्कार सोहळा गुजरातला होणार आहे, अशी माहिती दिली आहे. यावेळी बॉलिवूड अभिनेत्री जान्हवी, प्रसिद्ध फिल्म निर्माता करण जोहर आणि अभिनेता वरुण धवन उपस्थित होते. यावेळी पत्रकारांशी बोलताना करण जोहर म्हणाले, "मी फिल्मफेअरचे सूत्रसंचालन करण्यासाठी खूप आतुर आहे. मला गुजरातला जाऊन तेथील संस्कृती, परंपरा, सशक्तीकरण आणि आर्थिक विकास असलेल्या भूमीवर फिल्मफेअर पुरस्कार सोहळा होणार आहे.*

**असा असणार फिल्मफेअर पुरस्कार सोहळा**

*यंदाचा ६९ वा ह्युंडाई फिल्मफेअर पुरस्कार सोहळा २०२४ हा गुजरातच्या गांधीनगर येथील गिफ्ट सिटी येथे होणार आहे. हा पुरस्कार सोहळा २७ आणि २८ जानेवारी असा दोन दिवस असणार आहे. यंदा फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यासाठी सिनेतारका या गुजरातमध्ये दिसणार आहेत. फिल्मफेअर ऑपुरस्कार सोहळा हा 'गुजरात टुरिझम'च्या सहकार्याने होणार आहे. आतापर्यंत फिल्मफेअर पुरस्कार सोहळाहा महाराष्ट्रातच झाला आहे.*

## थोडक्यात

### 'साठवणीतील माणसं' चे रविवारी प्रकाशन

**मुंबई:** जेष्ठ पत्रकार आणि लेखक यांनी लिहिलेल्या 'साठवणीतील माणसं' या राजकीय व सामाजिक क्षेत्रात देशभर आपली छाप सोडणाऱ्या महनीय व्यक्तींच्या आठवणींचे दर्शन घडवणाऱ्या आगळ्या पुस्तकाचे प्रकाशन रविवार २१ जानेवारी रोजी सकाळी१०.३० वाजता मुलुंड (पूर्व ) येथील मराठा मंडळ सांस्कृतिक केंद्रात होणार आहे. सामाजिक आणि राजकीय पटलावर एकेकाळी आपला अद्भुत प्रभाव टाकणाऱ्या महान व्यक्तिंच्या आठवणी आणि कार्याचा लेखाजोगा मांडणाऱ्या या पुस्तकाच्या प्रकाशन सोहोळ्याला अध्यक्ष म्हणून जेष्ठ पत्रकार आणि साहित्यिक विजय कुवळेकर लाभले आहेत. तर विशेष अतिथी म्हणून महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते सुशीलकुमार शिंदे व माजी विधानसभा अध्यक्ष अरुण गुजराथी हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नामवंत अभिनेत्री मृण्मयी देशपांडे करणार आहे. मुलुंड (पूर्व ) येथील ९० फिट रोड ,वासुदेव बळवंत फडके मार्ग येथे आयोजित या कार्यक्रमाला साहित्य रसिकांनी मोठ्या संख्येने उपोस्थित राहावे असे आवाहन निमंत्रक चेतन प्रधान आणि शिवाजी धुरी, सिद्धार्थ प्रकाशन यांनी केले आहे.

### झेवियर्स कॉलेजच्या वाड्मय मंडळाचा 'आमोद 2024'

**मुंबई:** संत झेवियर्स महाविद्यालयाचे मराठी वाङ्मय मंडळ ह्यावर्षी १०१ व्या वर्षात पदार्पण करत आहे. मंडळ गेल्या १०१ वर्षांपासून मराठी संस्कृतीचे संवर्धन करण्याच्या हेतूने अनेक उपक्रम आणि कार्यक्रम राबवत आले आहे. म. वा. मं. मुंबई विद्यापीठाच्या सर्वात प्राचीन सांस्कृतिक समितींपैकी एक आहे. आमोद २०२४ हा मंडळाचा ह्या वर्षीचा शेवटचा कार्यक्रम लवकरच होणार आहे. "आमोद २०२४ - उलगडूया नाविन्य संस्कृतीचे" संस्कृतीच्या नवीनतेचा उत्सव साजरा करेल. आमोद २०२४, २० आणि २१ जानेवारी, रोजी दुपारी ४ वाजल्यापासून संत झेवियर महाविद्यालयात पार पडेल. २१ जानेवारी रोजी मंडळाच्या वार्षिक मासिकाचे म्हणजेच "पखरण" चे उद्घाटन करण्यात येईल आणि याच दिवशी पॅनल डिस्कशन साठी प्रमुख पाहुणे म्हणून अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी, सई गोडबोले,दिग्दर्शक क्षितीज पटवर्धन आणि सतीश राजवाडे हे उपस्थित राहणार आहेत.

# ठाकरे गटाची घटना दुरुस्ती पूर्णपणे अवैध; शंभर टक्के लोकशाही विरोधी



प्रतिनिधी
■ मुंबई

सन 2012 साली शिवसेनेच्या घटनेत दुरुस्ती करताना उद्धव ठाकरे यांनी निवडणूक आयोगाची मान्यता न घेतल्याने निवडणूक आयोगानुसार 2012 साली केलेली घटनादुरुस्ती पूर्णपणे अवैध असून 100% लोकशाही विरोधी पद्धतीने केलेली आहे. असा आरोप मंत्री दीपक केसरकर यांनी काल एका पत्रकार परिषदेत केला.

महायुती म्हणून निवडून आल्यावर फक्त स्वतःच्या स्वार्थासाठी पक्षाच्या घटनेच्या ध्येय-धोरणांना पायदळी तुडवून काँग्रेस सोबत जाणे हे कितपत योग्य आहे हे उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट करावे असे आवाहनही दीपक केसरकर यांनी यावेळी केले.

सन 1998 मध्ये लोकप्रतिनिधी आयोगाने देशातील सर्व राजकीय पक्षांना पक्षाची घटना लोकशाही अंतर्गत आणून त्यामध्ये त्या नुसार बदल करण्याचे आदेश दिले. त्यानुसार वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांनी 1999 मध्ये शिवसेनेच्या पक्षघटनेत लोकशाहीला अभिप्रेत बदल केला. त्यानंतर उद्धव ठाकरेंनी 2012 मध्ये त्यात घटनेत पुन्हा बदल केला आणि 2017 साली त्यांनी घटनेत बदल केल्याचे जाहीर केले. पण घटनेमध्ये बदल करताना घटनादुरुस्ती प्रक्रियेनुसार निवडणूक आयोगाची मंजुरी घ्यावी लागते आणि राष्ट्रीय कार्यकारिणीकडे जावे लागते. तसेच आपल्या पक्षाची जनरल बॉडी मिटिंग घेऊन त्यामध्ये घटनेत बदल केल्याचा प्रस्ताव पारित करावा लागतो. त्यावेळेस उद्धव ठाकरे यांनी निवडणूक आयोगाकडून घटना दुरुस्तीची मंजुरी घेतली नव्हती. त्यामुळे शिवसेनेची 1999 सालची घटना अधिकृत आहे आणि 2012 साली करण्यात आलेली घटना दुरुस्ती पूर्णपणे अवैध असून शंभर टक्के लोकशाही विरोधी पद्धतीने करण्यात आलेली आहे, असा निर्णय निवडणूक आयोगाने आणि विधानसभा अध्यक्षांनी दिला आहे. त्यामुळे आम्हीच बरोबर असून हा निर्णय कसा चुकीचा आहे, अशी ओरड करून जनतेची दिशाभूल करण्याचे आणि त्यांच्या मनात आमच्याबद्दल चुकीची भावना पसरवण्याचे काम उद्धव ठाकरे आणि त्यांच्या गटाचे लोक करत आहेत, असा आरोपही शिक्षणमंत्री केसरकर यांनी केला. या पत्रकार परिषदेत त्यांच्या सोबत आमदार संजय शिरसाट उपस्थित होते.

**पक्षप्रमुखांनीच लोकशाही पाळली नाही**

*पक्षातील एखाद्या प्रमुख व्यक्तीला पक्षातून काढण्याचा निर्णय फक्त पक्षप्रमुख घेऊ शकत नाही, तर तो संपूर्ण पक्षाचा निर्णय असावा लागतो. पक्षाची बैठक घेऊन तो बहुमताने तो निर्णय घ्यावा लागतो आणि हीच लोकशाही आहे. पण उद्धव ठाकरेंनी तसे काहीही केलेले नाही. त्यांनी कोणतीही लोकशाहीची मूल्ये पाळली नाहीत आणि आज निवडणूक आयोगाने आणि विधानसभा अध्यक्षांनी दिलेला निर्णय किती चुकीचा आहे त्याची ओरड करत आहेत. असेही केसरकर म्हणाले.*

# शिवसेना प्रमुखांच्या जयंतीनिमित्ताने शिवडी महोत्सव अंतर्गत भगवा चषक 2024

प्रतिनिधी
■ मुंबई

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त १७ जानेवारी ते २८ जानेवारी सायंकाळी ७.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत शिवडी रामटेकडी बाल विकास मनोरंजन मैदान येथे शिवडी महोत्सव अंतर्गत भगवा चषक २०२४ आयोजित करण्यात आले आहे.या शिवडी महोत्सवामध्ये "कला,क्रीडा आणि सांस्कृतिक" अशा सर्व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

या शिवडी महोत्सवात शिवडी विधानसभेतील सर्व प्रमुख तसेच आजी माजी पदाधिकारी आणि इतर प्रमुख मान्यवर देखील उपस्थित राहणार आहेत.यावर्षी देखील हजारो शिवडीकर या महोत्सवामध्ये सहभागी होणार आहे. अशी माहिती माजी नगरसेवक सचिन देवदास पडवळ यांनी दिली.

*१७ ते २१ जानेवारी, कब्बडी स्पर्धा - कब्बडी असोसिएशन मान्यताप्राप्त मुंबई शहर "ब" गट, वेळ - संध्या ७.०० ते १०.००, २३ रोजी एकेरी नृत्य स्पर्धा, वेळ - संध्या ६.०० ते १०.००, २४ जानेवारी, लावणी क्वीन्स वेळ - संध्या ६.०० ते १०.००, २५ जानेवारी, खेळ पैठणीचा, हळदी कुंकू वेळ - संध्या ५.०० ते १०.००, २६ जानेवारी, चित्रकला स्पर्धा, वेळ - संध्या ६.०० ते १०.००, २७ जानेवारी, समूह नृत्य स्पर्धा, वेळ - संध्या ६.०० ते १०.००, २८ जानेवारी, रंग तरंग ऑर्केस्ट्रा, वेळ - संध्या ७.०० ते १०.००*

# बेस्ट भवन येथे एकाच वेळी 14 इलेक्ट्रिक बसगाड्या चार्ज होणार

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईत प्रदूषण नियंत्रणासाठी बेस्टच्या ताफ्यात इलेक्ट्रिक साध्या व एसी बसगाड्या दाखल होत आहेत. मात्र या इलेक्ट्रिक बसगाड्या चार्ज करण्यासाठी बेस्ट प्रशासनाकडून व्यवस्थापन सुरू आहे. दरम्यान, बेस्ट उपक्रमाचे मुख्य कार्यालय असलेल्या कुलाबा येथील बेस्ट भवन (इलेक्ट्रिक हाऊस) या ठिकाणी एकाच वेळी १४ इलेक्ट्रिक बसगाड्या चार्ज करण्यासाठी सुविधा उपलब्ध करण्यात येत आहे. त्यासाठी युद्धपातळीवर काम सुरू आहे. लवकरच हे काम पूर्ण झाल्यावर इलेक्ट्रिक बसगाड्या चार्ज करण्यात येतील.

सद्या बेस्ट भवन येथे इलेक्ट्रिक चार्जिंग पॉइंट कार्यरत आहे. तेथे बेस्टची आणि बाहेरील चारचाकी वाहने चार्ज करण्यात येतात. मात्र बेस्ट उपक्रमाने एकाच वेळी अनेक बसगाड्या चार्ज करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार काही दिवसांपूर्वीच कामाला सुरुवात करण्यात आली आहे. आता काम प्रगतीपथावर असून लवकरच काम पूर्ण होईल.




बेस्ट उपक्रमात सध्या, बेस्टच्या स्वतःच्या मालकीच्या १,१३६ बसगाड्या कार्यरत आहेत. तर बेस्टने तोटा कमी करण्यासाठी भाडे तत्वावर १,७७८ बसगाड्या घेतल्या आहेत. एकूण २ हजार ९१४ बसगाड्या बस ताफ्यात आहेत. तसेच बेस्टमध्ये बेस्टच्या मालकीच्या - २४५ साध्या बसगाड्या, सीएनजी गॅसवरील - ६२५ बसगाड्या, इलेक्ट्रिक बसगाड्या - ८८५ अशा एकूण १,१३६ बसगाड्या आहेत. तर,भाडे तत्वावर साध्या बसगाड्या - २८०, सीएनजी गॅसवरील - १,०२५ बसगाड्या, इलेक्ट्रिक बसगाड्या - ४७३ अशा एकूण १,७७८ बसगाड्या आहेत. त्यामुळे बेस्टच्या स्वतःच्या आणि भाडे तत्वावरील बसगाड्या असे मिळून बेस्ट उपक्रमात एकूण २,९१४ बसगाड्या आहेत.

मात्र सध्या पर्यावरणाच्या दृष्टीने इलेक्ट्रिक बसगाड्या या जास्त अनुकूल आहेत. या इलेक्ट्रिक बसगड्यांमध्ये इंजिनचा आवाज येणे वगैरे अशी काही भानगड नाही. इंधनाचा धूर निघून डोळ्यांना त्रास होण्याचीही काही भानगड नाही. त्यामुळे आता आगामी काळात टप्प्या टप्प्याने १०० टक्के बसगाड्या या इलेक्ट्रिक बसगाड्या बेस्टच्या बस ताफ्यात आणण्यात येणार आहेत.



**मुंबई:** *22 जानेवारी रोजी अयोध्येत होणाऱ्या श्री राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेच्या निमित्ताने, पंतप्रधान यांच्या आवाहनानुसार, मुंबईतील आराध्य देवी माँ मुंबादेवी मंदिराचे दर्शन घेतले आणि मां मुंबादेवी मंदिर परिसरात स्वच्छता या मोहिमेअंतर्गत स्वच्छता करण्यात आली. या प्रसंगी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, स्थानिक आमदार आणि महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबईचे पालकमंत्री दीपक केसरकर , माजी कॅबिनेट मंत्री राज के पुरोहित आणि इतर मान्यवर उपस्थित होते. नेते व कार्यकर्ते उपस्थित होते.*

## माजी नगरसेवक ॲड. एम. जे. हेगडे निवर्तले



**मुंबई:** जनता दल (से) पक्षाचे माजी नगरसेवक आणि ज्येष्ठ समाजवादी नेते ॲड. एम. जे. हेगडे यांचे शुक्रवारी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९३ वर्षांचे होते. ॲड. मुडलकट्टे जगन्नाथ हेगडे असे त्यांचे मूळ नाव होते, मात्र एम. जे. हेगडे याच नावाने ते ओळखले जात! अंधेरी पूर्वमधील मरोळ भागातून १९८५ नंतर तीन वेळा नगरसेवक म्हणून ते निवडून आले होते. प्रामाणिक आणि सच्छील चारित्र्याचे नगरसेवक म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांच्या पत्नीचे काही वर्षांपूर्वीच निधन झाले होते. त्यांच्या पश्चात दोन मुलगे असून त्यातील ॲड. विनय हेगडे हे कॅनडामध्ये असतात.


## मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबई

प्रशासकीय इमारत, सेक्टर-१८, तुर्भे, नवी मुंबई
दूरध्वनी क्रमांक: २७८८८४१४ वेबसाईट: www.mumbaiapmc.org

**ई-निविदा सूचना**

मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयाकरिता आवश्यक असलेले कार्यालयीन लेखन साहित्य व स्टेशनरीचा आणि छापील स्टेशनरी पुरवठा करण्यासाठी बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील पुरवठादारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

ई-निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख ३१.१.२०२४ सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत आहे. अधिक माहिती **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर ई-निविदासंदर्भात काही बदल झाल्यास बाजार समितीच्या वेबसाईटवर कलविण्यात येईल.

**सचिव सभापती**
**मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबई**

## MAHAVITARAN — TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

Bids are invited for Procurement of **Dry Chemical Powder (ABC) Maintenance Free and Corrosion Free Portable Fire Extinguishers (6 kg capacity)** through e-tendering process with an Estimated Cost of Rs. 8.65 Crore (with GST) against MSEDCL advertised Tender on website vide No. **MMD/T-HTM2-01/0124** due for submission on dtd. 06/02/2024. For details please visit website: **https://etender.mahadiscom.in/eatApp/**

**HO PR No. 06/2024** **Chief Engineer (MMD)**

## MAHAVITARAN — TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

Bids are invited for procurement of **New Insulating Oil** as per IS:335 amended up to date through e-tendering process with an Estimated Cost of Rs. 113.28 Crore (with GST) against MSEDCL advertised Tender on website vide No. MMD/T-HTM2-02/0124 due for submission on dtd. 05/02/2024. For details please visit website: **https://etender.mahadiscom.in/eatApp/**

**HO PR No. 04/2024** **Chief Engineer (MMD)**

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
**मुदतवाढ सूचना क्र. ४**

**ई निविदा सूचना क्र. १०३ / २०२३ - २०२४ (मुंबई) करीता**

दिनांक २२/१२/२०२३ रोजी दैनिक नवराष्ट्र, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक वृत्तमानस, मुंबई या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीताच्या ई निविदा महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | डी. एन. नगर अंधेरी (प.) मुंबई येथील निवासी इमारत क्र. २ ची देखभाल व दुरुस्ती... डी.एन. नगर अंधेरी (प.) मुंबई येथील एम-३ इमारतीला प्लास्टर, पॉलिमर ट्रीटमेंटने दुरूस्ती करून रंग लावणे. | ₹४०,१६,७८९.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १९/०१/२०२४ पर्यंत महामंडळाच्या https://www.midcindia.org या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

जा.क्र./का.अ.(मुख्या)/ I/36557/२०२४

## मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ
म्हाडा MHADA

**निविदा सुचना क्र.:- का. अ. (शहर) / मुं.झो.सु.मंडळ/१६/२०२३-२४**

कार्यकारी अभियंता [शहर] विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३९, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ ( दुरध्वनी क्र. ०२२ ६६४०५४८४) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे/ सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन/सिपीडब्लूडी / एमईएस/ मुंबई मनहानगरपालिका / सिडको/ बीपीटी/एमआयडीसी /एम. जे. पी. यांचेकडे नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकुण ०७ कामाकरीता बी-१ (टक्केवारी) नमुन्यातील सिलबंद लिफाफामध्ये निविदा मागवित आहेत. सदर निविदेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे. अट असलेलीनिविदास्विकारली जाणार नाही. सदरनिविदाचे कागदपत्रे निन्म स्वाक्षरीकार याच्या कार्यालयात रु.५९०.०० ( जीएसटीसहीत) अदा केल्यानंतर उपलब्ध होतील. सदर निविदेमधील विस्तृत कामाची माहीती निन्म स्वाक्षरीकार यांचे कार्यालयात नोटीस बोर्डवर निविदा विक्री दिनांकापर्यंत उपलब्ध राहतील. सदरनिविदेतील कामांसाठी निविदा विक्री सुरु दि. १८.०१.२०२४ ते दि. २५.०१.२०२४ रोजी सकाळी ११.०० ते दु. ३.०० पर्यंत राहील आणि निविदा स्विकृती दि. २५.०१.२०२४ रोजी स. ११.०० ते दु. १.०० पर्यंत राहील. सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता (शहर), मुं.झो.सु. मंडळ यांचे दालन क्र. ५३९ येथे स्विकारल्या जातीलव वेळापत्रकानुसार निविदा उघडण्यात येतील. सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**टिप :** १. विस्तृत निविदा सुचना निन्म स्वाक्षरीकार यांचे कार्यालयास नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करणेत येईल.
**टिप :** २. निविदा सुचने बाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त कार्यालयाचे नोटीस बोर्डवर प्रकाशित केले जातील.

**CPRO/A/ 74**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता (शहर),**
**मुं. झो. सु. मंडळ, मुंबई**

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

## ॲक्सिस फायनांस लिमिटेड

AXIS FINANCE
(सीआयएन: एल६५११०जीजे१९९३पीएलसी०२०७६९)
ॲक्सिस हाऊस, सी-२, वाडिया इंटरनॅशनल सेंटर, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई – ४०० ०२५.

**ई - लिलाव विक्री सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) आणि ९ (१) च्या तरतूदीसह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अक्ट, २००२ च्या अंतर्गत स्थावर मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

सूचना ह्याद्वारे सर्व जनतेला आणि विशेषत: कर्जदार / गहाणदार आणि हमीदार ह्यांना सुरक्षित धनको ह्यांच्याकडे गहाण/ भारीत करण्यात आलेल्या येथे खाली नमूद करण्यात आलेल्या स्थावर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा ॲक्सिस फायनांस लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकारी ह्यांनी प्रत्यक्ष ताबा घेतला असून मे. सोहम इस्टेटस (कर्जदार आणि हमीदार), श्री. चैतन्य नंदलाल पारेख (भागीदार आणि हमीदार), श्री. रंजीव वेदप्रकाश मलिक (भागीदार आणि हमीदार), श्री. संजीव वेदप्रकाश मलिक (भागीदार आणि हमीदार) आणि मे. सोहम रिअल इस्टेट डेवलपमेंट कंपनी प्रायव्हेट लिमिटेड (कॉर्पोरेट हमीदार) ह्यांच्याकडून ॲक्सिस फायनांस लिमिटेडला देय असलेल्या २२ नोव्हेंबर २०२३ अनुसार देय असलेल्या रु. ७८,७९,११,३११.४९ (रुपये अठ्ठयाहत्तर कोटी एकूणऐंशी लक्ष अकरा हजार तीनशे अकरा आणि एकूण पन्नास पैसे मात्र) अधिक त्यावरील २३ नोव्हेंबर २०२३ पासूनचे त्यावरील करारानुसार देय असलेल्या व्याजाचा आणि २० नोव्हेंबर २०२३ अनुसार थकीत रु. १४,७०,७४,२०९ (रुपये चौदा कोटी सत्तर लक्ष चौऱ्याहत्तर हजार दोनशे नऊ मात्र) त्यावरील नोव्हेंबर २०२३ पासूनच्या करारामधील व्याज वसुली करण्यासाठी ३१ जानेवारी २०२४ रोजी "जसे आहे जेथे आहे ", "जे आहे जसे आहे" आणि "जेथे आहे तेथे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय तत्वावर" करण्यात येणार आहे.

**परिशिष्ट - I**

ठाणे नोंदणीकरण आणि उप नोंदणीकरण जिल्ह्यामधील कावेसार, तालुका ठाणे आणि जिल्हा ठाणे ह्यांच्या हद्दीमध्ये असलेल्या, वसलेल्या जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. २४०/२ (पीटी), २४०/३, २४०/६, २४०/७, २४०/९, २४०/१० (पीटी), २४०/११ (पीटी), २४२/१/२ (पीटी), २४२/१/३, सरस्वती स्कूल समोर, ऑफ घोडबंदर रोड येथील एकूण ८९४० चौ. मी. मोजमापाचा सर्व खंड आणि भूखंडामधील सर्व अविभाजित हिस्सा ज्याच्या सीमा पुढील प्रमाणे :

पूर्व दिशेला : टॉवर ४ जाकरंडा
पश्चिम दिशेला : सुकुर रेसिडन्सी आणि टीएमसी आरक्षण
उत्तर दिशेला : पोडीयम
दक्षिण दिशेला : ४० मी. रुंद रोड

प्रोजेक्ट सोहम टॉपिकल लगून म्हणून ज्ञात असलेल्या सह सर्व त्यावरील बांधकामे, इमारती आणि त्यावर बांधण्यात आलेले अप्रेटेनसेस किंवा त्यावर बांधण्यात आलेले बांधकाम जे टॉवर – V – डी विटा म्हणून ज्ञात असलेले.

**विक्रीचा तपशिल**

| कर्जदार / गहाणदाराचे नाव | मालमत्ता/ मत्तांचे वर्णन | ई – लिलावाचा दिनांक आणि वेळ | लिलाव विक्रीचा तपशिल 5 | | बोली सादरीकरणासाठी दिनांक आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|
| मे. सोहम इस्टेटस | परिशिष्ट – I नुसार | दिनांक ३१.०१.२०२४<br>वेळ : पासून ११.०० वा. पासून दु. १२.०० वा. पर्यंत.<br>प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह | राखीव मूल्य | | ३०.०१.२०२४ रोजी सायं. ४.०० वा. पूर्वी |
| | | | आरपी (रु. आकड्यामध्ये) | आरपी (रु. आकड्यामध्ये) | |
| | | | रु. ५३ कोटी | रुपये त्रेपन्न कोटी मात्र | मालमत्तेच्या पाहणीचा दिनांक : केवळ पूर्व परवानगीसह दु. १.०० वा. ते दु. ३.३० वा. दरम्यान |
| | | | *मूल्य ज्याच्या खाली सदनिका/ मालमत्ता/ मत्तांची विक्री केली जाणार नाही | | |
| | | | इसारा रक्कम ठेव (इरठे) | | संपर्क व्यक्ती तपशिल आणि मोबा क्र: |
| | | | इरठे (आरपी च्या १०%) (रु. आकड्यांमध्ये) | इरठे (आरपी च्या १०%) (रु. अक्षरांमध्ये) | श्री. अंकित सुराणा मोबा क्र.: ७७१८८८५५८९ (ई-मेल :ankit.surana@axisfinance.in) |
| | | | ५.३ कोटी | रुपये पाच कोटी तीस लक्ष मात्र | |
| | | | बोली वाढविण्याची रक्कम : रु. १०,००,०००/- (रुपये दहा लक्ष मात्र) | | श्री. स्वप्नील तिवारी (मोबा क्र : ९८२००६३२०८) (ई-मेल : swapneil.tiwari@axisfinance.in) |

विक्रीच्या संदर्भात तपशिलवार अटी आणि शर्तीसाठी कृपया https://www.axisbank.com/auction-notices आणि/ किंवा https://axisbank.auctiontiger.net वर देण्यात आलेल्या लिंकचा संदर्भ घ्या. (लिलाव आयडी वर नमूद करण्यात आला आहे.)

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८ (६)/ नियम ९ (१) अंतर्गत संवैधानिक ३० दिवसांची विक्री सूचना**

नमूद कर्जाच्या कर्जदार/ रां, हमीदार / रां आणि गहाणदार/ रां ना उपरोक्त नमूद दिनांकाला होणाऱ्या ई-लिलाव विक्रीसाठी सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८ (६)/ नियम ९ (१) अंतर्गत सूचना असल्याचे समजण्यात यावे.

दिनांक : १५ जानेवारी २०२४
ठिकाण : मुंबई

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**ॲक्सिस फायनांस लि.**

विजेता हा स्वप्नाळू असतो तो कधीही हार मानत नाही.



- नेल्सन मंडेला

वृत्तमानस

मुंबई, बुधवार, १७ जानेवारी २०२४

# अधिकार हवाय, मग कर्तव्य पाळा

एखादे आव्हान अथवा समस्या सोडविण्यासाठी सर्वांची मानसिकता असली की त्यामध्य लखलखीत यश मिळतेच. मुख्यमंत्र्यांचे ठाणे अशी राज्यात बिरुदावली असली तरी हेच ठाणे आता स्वच्छतेमध्ये एक वेगळा आदर्श निर्माण करू पाहात असून त्याचे सर्व नेतृत्वासह सर्वच लोकांना जाते यात तीळमात्र शंका नाही. संवेदनशील व्यक्तिमत्व आणि समाजाची जाण असलेले नेतृत्व हे केवळ ठण्यातच नव्हे तर संपूर्ण राज्यात काय करू शकते याचे उदाहरण म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाहिले पाहिजे. स्वतः स्वच्छतेचा वसा घेऊन कार्यरत राहण्याचा नेतृत्वाचा वारसा जनताही आपसूक घेत असते. विस्तारत चाललेल्या ठाणे शहराची लोकसंख्येची सूज वाढत चालत असल्याने नागरी सुविधांवर मोठा ताण पडत आहे. त्यामुळे शहर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी ही प्रत्येकाची असल्याने त्यांचे भान राखणे महत्वाचे ठरते. परिणामी महापालिका क्षेत्रात स्वच्छतेला दिलेले सर्वोच्च प्राधान्य, शहराची एकूण स्वच्छता आणि शौचालयांची स्वच्छता हे उद्दिष्ट ठेवून प्रामाणिकपणे केलेल्या प्रयत्नांची परिणिती म्हणून स्वच्छ सर्वेक्षणमध्ये शहराने उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. दोन वर्षांपूर्वी हेच स्थान अतिशय मागे होते हे विसरून चालणार नाही. स्वच्छतेची ही लोक चळवळ खरोखरच आदर्शवत ठरावी अशीच आहे. आपला विभाग, प्रभाग स्वच्छ राहावा म्हणून त्या भागातील नागरिक जसे आग्रही राहिले पाहिजेत तसेच त्याला प्रशासनाची जोडसुद्धा आवश्यक ठरते. यासाठी महानगरपालिकेने वर्षभर स्वच्छतेसाठी निरनिराळे उपक्रम हाती घेतले. दररोज जिथे कचरा टाकला जात असे अशा १५० हून अधिक जागांवरील कचरा टाकणे पूर्णपणे थांबविण्यात आल्याने कचरा कोंडाळा आपोपाप नाहीसा झाला. सर्वात उल्लेखनीय म्हणजे लोक कचरा कुठेही आणि कसाही टाकत होते त्याला शिस्त लावत घरोघरी कचरा संकलन करण्याची क्षमता वाढवून प्रत्येक घरी कचरा संकलन गाडी गेलीच पाहिजे, या सूत्रानुसार कचऱ्याचे संकलन सुरू करण्यात आल्याने शहर स्वच्छ राहण्यास मदतच झाली असे म्हणता येईल. ज्याची आवर्जून दखल घेतली पाहिजे ती बाब म्हणजे ओडीएफ (हागणदारीमुक्त) श्रेणीतील सर्वोच्च असा 'वॉटर प्लस' शहरात ठाण्याला प्रथमच मिळू शकला आहे. पाण्याचे नियोजन, प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर, सांडपाण्यावर प्रक्रिया या मुद्यांवर वॉटर प्लस शहराचे मूल्यांकन केले जाते. हागणदारी मुक्तता, मलनि:स्सारण प्रकल्पांची कार्यक्षमता याबाबत महापालिका क्षेत्रातील कामगिरी सरस असल्याने शहराला प्रथम ओडीएफ ट्रीपल प्लस हा बहुमान मिळाला होता. आता त्यापुढील वॉटर प्लस मानांकन मिळाले असल्याने ही अभिमानाची बाब आहे. केवळ ठाणे नव्हे तर नवी मुंबईसुद्धा स्वच्छतेमध्ये राज्यात अव्वल ठरला आहे. सिडकोने वसवलेले हे शहरसुद्धा गेल्या काही काळात फोफावले आहे. या शहराची जडणघडणसुद्धा वेगळीच असल्याने येथे स्वच्छता राखणे ही कसोटी होती. तरीसुद्धा लोकसहभागामधून सर्व शक्य करीत नवी मुंबई ही राज्यात अव्वल ठरली आहे. नवी मुंबई महापालिकेने प्रभावी लोकसहभागावर भर दिला. पालिकेच्या आठही विभागांमधील दोन ते चार हजार नागरिकांनी वेगवेगळ्या दिवशी स्वच्छताकींना त्यांच्या रोजच्या स्वच्छतेच्या कामापासून एक दिवसाची सुटी देत रस्त्यावर उतरून संपूर्ण विभाग स्वच्छ केला. या उपक्रमामध्ये लोकप्रतिनिधी, विविध स्वयंसेवी संस्था, मंडळे, महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या संघटना यांचे सक्रिय योगदान लाभले. स्वच्छताविषयक उपक्रमांमध्ये नागरिकांच्या सहभागात एक विशेष लक्षणीय बाब म्हणजे शहरातील तृतीयपंथीही उपक्रमांत स्वयंस्फूर्तीने मोठ्या संख्येने सहभागी झाले होते ही बाब विरळी ठरावी. नी क्षेपणभूमी शास्त्रोक्त पद्धतीने बंद करून त्या ठिकाणी साकारलेल्या निसर्गोद्यान परिसराला मियावाकी पद्धतीच्या शहरी जंगल निर्मितीतून हिरवाईची झळाळी देत तेथे लागवड केलेल्या ६२ हजारांहून अधिक देशी प्रजातींच्या वृक्ष लागवडीमुळे नवी मुंबईच्या पर्यावरणात लक्षणीय भर पडली असून जैवविविधतेतही वाढ झाली आहे. अशाच प्रकारे १ लाख २३ हजार देशी प्रजातीच्या वृक्षारोपांची लागवड करून नेरूळ, येथे मियावाकी जंगल उभारण्यात आले असून हा मियावाकी पद्धतीचा देशातील सर्वात मोठा शहरी जंगली प्रकल्प आहे. स्वच्छता ही आरोग्यासाठी महत्त्वाची आहे हे जाणून माणसाने वैयक्तिक, सार्वजनिक स्वच्छतेची यापुढे सुद्धा जपणूक केली पाहिजे. स्वच्छता हा आरोग्यसंपन्न जीवनाचा महामंत्र आहे. माणसाने स्वत:पासून स्वच्छता सुरू करावी हाच यातील मूलमंत्र आहे. दीर्घायुष्य लाभण्यासाठी स्वच्छतेचा वसा घेणे फार आवश्यक आहे. स्वच्छता म्हणजे प्रसन्नता, स्वच्छता म्हणजे आनंद, पवित्रता, निर्मळता, सुंदरता. स्वच्छतेचा वसा उचलून जनमाणसातील अंध:कार दूर करण्यासाठी संत गाडगे महाराजांनी कीर्तनाच्या माध्यमातून प्रबोधन केले. संत गाडगेबाबांनी लोकांच्या मनातील अंधश्रद्धा बुरसटलेले विचार दारिद्र हे सर्वदूर करण्यासाठी प्रभावी माध्यम वापरून ते दूर करण्याचा अतोनात प्रयत्न केला आणि दिवसा गावातील रस्ते झाडून स्वच्छतेचा जणू वसा हाती घेतला. कारण आपलं जीवन अनमोल आहे. या अनमोल जीवनात आनंदाचे तरंग निर्माण करण्यातच खरा मर्म आहे. जीवनात स्वच्छता आचार विचारात स्वच्छताही आजच्या काळाची गरज आहे. संत गाडगेबाबा यांनी अखंड पन्नास वर्षे लोकांच्या पायाखालील रस्ते स्वच्छ करण्यासाठी घालवली. हाच वसा देशाच्या आणि राज्याच्या नेतृत्वाने सध्या स्वीकारला आहे. याचा सकारात्मक फायदा यापुढे कायम दिसू शकतो. स्वातंत्र्य, स्वावलंबन, स्वाध्याय आणि स्वाभिमान ही तर स्वच्छतेच्या पुस्तकातील पाने आहेत. आपल्या आरोग्याची काळजी आपण स्वतः घ्यायची असते. निरोगी जीवन जगायचे असेल तर आपल्या आयुष्यात आपण आयुष्यभर स्वच्छतेचा विचार करायला हवा. आपला जीव ओतून आयुष्यभर जिवाची पर्वा न करता संत गाडगेबाबांनी जपलेला, आचारलेला स्वच्छतेचा जीवनमंत्र आपल्याला आज आचारता येईल. स्वच्छतेच्या ध्येयापर्यंत जायचे असेल तर घर, शाळा हे स्वच्छतेच्या संस्काराचे, सर्वात मोठे केंद्रबिंदू आहेत. त्यातून परिसरांत गावाच्या स्वच्छतेचे कृतिशील विचार रुजावा. कारण स्वच्छता ही तुमची आमची सर्वांची जबाबदारी आहे. स्वच्छता हा संस्कार आहे. स्वच्छतेचे बीज मुळापासून रुजायला हवे. प्रत्येकात भिनायला हवे. मोठ्यापासून ते लहानपर्यंत साऱ्यांनीच स्वच्छतेचे महत्व आंतरिक दृष्टीने समजावे. कारण, स्वच्छता ही जबरदस्ती नाही. एक जगण्याचे सूत्र आहे. केवळ आपल्याच आरोग्याच्या सुरक्षेसाठी नव्हे तर संपूर्ण देशाच्या आरोग्याच्या सुरक्षेसाठी हे सूत्र पाळलं गेलं पाहिजे. ती जबाबदारी आपणा सर्वांचे आहे. केवळ अधिकार मागून जमणार नाही तर कर्तव्याचे पालन देखील करावे लागणार आहे. प्रत्येकाने कर्तव्याचे पालन केले तर अधिकार मागण्याची गरजच भासणार नाही. त्यामुळे आधी कर्तव्य मग अधिकार असे सूत्र अमलात आणून प्रत्येकाने वागायला पाहिजे. आपल्या आजूबाजूचा परिसर, आपले शहर, आपले गाव, आपला जिल्हा, आपले राज्य आणि आपला देश हा आपल्या सर्वांचा आहे. त्यामुळे परिसर स्वच्छ निरोगी प्रदेश स्वच्छ निरोगी राहील. माझे कुटुंब माझे जबाबदारी यापुढेही जाऊन आता माझेच कर्तव्य आणि माझी जबाबदारी असं ब्रीदवाक्य घेऊन देश आणखीन सुदृढ करावा लागणार आहे. त्यासाठी कर्तव्य पाळण्यात कसूर होता कामा नये. एकूणच काय तर सध्या लोकांच्या सक्रिय सहभागातून उभारण्यात येत असलेल्या चळवळीचा हा प्रवास यापुढे सुद्धा अखंड राहावा हीच या अपेक्षा आहे. म्हणजेच अधिकार हवाय तर कर्तव्याचे पालन करावेच लागेल.

# दादर - मराठी संस्कृतीचे अभिजात केंद्र !

फोर्टमधील मुंबईचा हळूहळू विस्तार होऊ लागला. मध्यमवर्गीयांचे गिरगांव आणि कष्टकऱ्यांचे लालबाग, हाऊस फुल झाल्यावर पुढे सरकलेली मिश्र वस्ती म्हणजे दादर ! पण आत्ताचे दादर म्हणजे तसे नाजूकच म्हणायला हवे. कारण ढोबळमानाने याचा विस्तार रेल्वे लाईनपासून ते समुद्रापर्यंत आहे. तर दक्षिणेला आगरबाजारच्या आसपास ते उत्तरेला हरिनिवासच्या आसपास, अशी दादर - मुंबई २८ ची हद्द आहे. दक्षिणेला जरा पुढे सरकलात तर लगेच प्रभादेवी, परळ कधी सुरू झाले हेच कळणार नाही. उत्तरेला माहीम आणि माटुंगा खेटूनच आहेत. दक्षिण सीमेवर सिद्धिविनायक आणि प्रभादेवी तर उत्तर सीमेवर शितलादेवी, मनमाला देवी यांच्या संरक्षणात दादर वसले होते. दादर पूर्व म्हणजे, दादर - मुंबई १४ म्हणजेच हिंदू कॉलनी, रेल्वे पोलीस वसाहत, दादरचे मुख्य पोस्ट ऑफिस असा थोडासा भाग सोडला तर बाकीचा भाग हा प्रामुख्याने नायगाव म्हणूनच ओळखला जात असे. जरा इकडे तिकडे गेलात तर लगेच माटुंगा ( मध्य रेल्वे ), वडाळा, हिंदमाता भाग सुरु !

१९१० च्या आधी दादर म्हणजे शेती, वाड्या, छोटी घरे, बैठ्या चाळी, मोजके बंगले, चिखलाचे - मातीचे रस्ते अशा विविध गोष्टी असलेले एक मजेदार खेडे होते. माझ्यासाठी इतक्या जुन्या दादरची माहिती मिळविणे जितके रोमांचक होते तितकेच ते कठीणही होते. मी मूळचा दादरकर असल्याने गेल्या ६७ /६८ वर्षांहून अधिक काळ दादर बघतोच आहे. त्याआधी माझे वडील आणि अनेक जुनी माणसे यांच्याकडून दादरबद्दल खूप कांही ऐकलेले जपून ठेवले होते. अशा विविध साधनांच्या आधारे दादरचा गेल्या शतकभराचा इतिहास उलगडण्याचा हा प्रयत्न आहे.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या " महिकावतीची बखर " नुसार चंपानेरच्या प्रताप बिंब या राजाने दमणपासून चिंचणी, तारापूर, पालघर, केळवे माहीम ते अगदी वाळकेश्वर पर्यंतचा भाग, इ.स. ११४२ मध्ये काबीज केला. माहीम येथे आपली राजधानी स्थापन करून त्याला महिकावती ( माहीम ) असे नाव दिले. याचा विस्तार आताच्या कबुतरखाना,पोर्तुगीज चर्च पर्यंत होता. चिंचणी - तारापूर पासून ते दादर, प्रभादेवी, वरळीपर्यंत नवीन वसाहत करण्यासाठी त्याने आपल्या मूळ देशातून सोमवंशी, सूर्यवंशी, शेषवंशी कुळांना आणून वसविले. अगदी याच भागात हे समाज अगदी आजही खूप प्रगती करून राहिलेले दिसतात. त्यांनी निर्माण केलेली कित्येक मंदिरे आजही उभी आहेत.

कबुतर खाना, डिसिल्वा हायस्कूल हा तेव्हा दादरच्या वस्तीचा मध्यबिंदू मनाला जात असे. याच्या आजूबाजूचे ४ मुख्य रस्ते म्हणजे लेडी जमशेटजी रोड ( आत्ताचा न.चिं.केळकर रोड ), दादर रोड ( मो.चि. जावळे पथ ), पोर्तुगीज चर्च स्ट्रीट ( रा.ब.सी.के.बोले रोड ), कुंभार गल्ली ( भवानीशंकर रोड ) असे होते. दादरचे मध्य रेल्वेचे फ्लॅटफॉर्म्स चक्क लाकडाचे होते.




दादर पूर्वेला शेते आणि मळे होते. पश्चिमेला हंसाळी तलाव ( आत्ताची वीर कोतवाल गार्डन ), पोर्तुगीज चर्च जवळचा तलाव, नर्दुल्ला तलाव, गोपी तलाव, मनमाला तलाव असे मोठे तलाव होते. आजच्या शिवतीर्थाच्या पलीकडे त्यावेळची गेनू वाडी होती. येथे सायंकाळी एकट्याने जायलाही भीती वाटत असे. आज जेथे कीर्तिकर मार्केट आहे तेथे १८७९ मध्ये दादर डिस्टिलरी होती. तिथे ताडीपासून दारू गाळली जात असे. दादर फुल बाजाराजवळच्या रेल्वे पुलाऐवजी तेथे लेव्हल क्रॉसिंग होते. आताचा कबुतरखाना आणि डिसिल्वा हायस्कूल यांच्या मध्ये एक मोठा वटवृक्ष होता. त्याखाली मारुतीचे एक छोटे मंदिर होते. तेच आता तेथे " पुरातन वटवृक्ष श्री हनुमान मंदिर " या नावाने उभे आहे.

सिटी ऑफ बॉम्बे इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट आणि १९१५ च्या नगर रचना कायद्यानुसार दादरमध्ये सुधारणांना आरंभ झाला.अत्यंत गंमतीदार गोष्ट म्हणजे त्यावेळी घरमालक आणि पदवीधर नागरिक यांनाच फक्त मतदानाचा हक्क होता. नंतर मॉटफर्ड सुधारणांनुसार हा अधिकार, कमीतकमी १० रुपये भाडे भरणाऱ्या नागरिकांनासुद्धा देण्यात आला. नगर रचना कायद्यानुसार दादर पूर्व व पश्चिम यांना जोडणारा टिळक पूल, मंडई, रुंद रस्ते, मोठ्या इमारती बांधल्या जाऊ लागल्या. आसपासच्या भागात बॉम्बे डाईंग आणि वूलन मिल यांच्या बरोबरीने कोहिनूर आणि कस्तुरचंद अशा दोन गिरण्या अवतरल्या. लहान लहान कारखाने आले. शाळा आणि महाविद्यालये निघाली. येथे वाढत असलेल्या व्यापारामुळे वस्ती वाढू लागली. पूर्वीच्या प्रथेनुसार पाटील वाडी, बोरकर वाडी, श्याम वाडी, धुरू वाडी, कवळी वाडी, खांडके वाडी, दगडी वाडी, डोंगरे बाग अशा अनेक वाड्या उदयाला आल्या. सरस्वती चाळ, गोरेगावकर चाळ, देऊबाई भंडारणीची चाळ, मिरांडावाडीतील जुनी चाळ अशा चाळी निर्माण झाल्या. शिवाजी पार्क भोवती नवीन वसाहतच उभी राहिली.

शिवाजी पार्क, मरिन ड्राईव्ह, ग्रेटर बॉम्बे मास्टर प्लॅन यांचे जनक, विशेष अभियंता श्री. ना.वि.मोडक ( नानासाहेब मोडक ) यांनी मुंबईच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी एक प्रकल्प हाती घेतला. नाशिक, पुणे आणि ठाणे या तिन्ही जिल्ह्यांची पाहणी केली आणि नाशिक जिल्ह्यातील इगतपुरीपासून ठाणे जिल्ह्यातील खर्डीपर्यंत वाहणाऱ्या वैतरणा नदीत पाण्याचा चांगला प्रवाह असल्याचे आढळून आले. त्यांनी तेथे जवळच नदीवर धरण आणि तलाव बांधला. १९५६ मध्ये हे धरण बांधण्यात आले. १९५७ पासून त्या तलावातून मुंबईत दररोज पाणी येऊ लागले. या प्रतिभावान अभियंत्याच्या स्मरणार्थ महापालिकेने नानासाहेब मोडक यांच्या नावावरून तलावाला 'मोडकसागर' असे नाव दिले आहे. समस्त मुंबईकरांना अभिमान वाटेल अशा ह्या महाअभियंत्याचे स्मृतिस्थळ, १९२८ साली बांधलेल्या मोडक बंगल्याच्या रूपाने दादरमध्ये आहे.

अशा वाढणाऱ्या शहराचे पुढचे टप्पे म्हणजे कला, क्रीडा, साहित्य, समाजकार्य, मनोरंजन, कामगार चळवळ, समाज संघटन इत्यादी अनेक गोष्टींना सुरुवात झाली. न्यू महाराष्ट्र क्रिकेट क्लब या नावाने स्थापन झालेल्या क्लबचे पुढे शिवाजी पार्क जिमखाना असे नाव झाले. पाटणकर नावाच्या व्यक्तीच्या बंगल्यातील एका दुकानाच्या मागच्या बाजूला, एका पेटीत कांही पुस्तके ठेऊन दादर सार्वजनिक वाचनालयाची सुरुवात झाली. इंग्लिश स्कूल ( छबिलदास शाळा ) आणि किंग जॉर्ज हायस्कूल ( राजा शिवाजी विद्यालय ) या महत्वाच्या आद्य शाळा सुरु झाल्या. मुलींचे शिक्षण ही तशी दुर्लक्षित बाब. पण कुंभारवाडा म्युनिसिपल मुलींची शाळा येथे चौथीपर्यंत शिक्षणाची सोय होती. चर्चची इंग्लिश शाळा, कर्वे गर्ल्स हायस्कूल असे मार्ग पुढे उपलब्ध झाले.

भंडारी, माध्यंदिन ( पळशे ) ब्राह्मण, पाठारे प्रभू, सोमवंशी क्षत्रिय ( चौकळशी / पाचकळशी ), कोळी हे दादरमधील आद्य निवासी तसेच सर्व उपजातींचे ब्राह्मण, सीकेपी, ख्रिश्चन या सर्वच समाजांवर या विविध सुधारणांचा परिणाम होत होता. येथे आलेल्या ब्राह्मण आणि सीकेपी समाजाने नवनवीन संस्था उभारायला सुरुवात केली. इतर समाजांनी यात कोलदांडा न घालता आपापल्या समाजाच्या संस्थाही उभारण्यास सुरुवात केली. बघता बघता दादरला अजब असे एक राजकीय - सांस्कृतिक - सामाजिक - व्यापारी मॉडेल उभे राहिले.

**दादरमधील अनेक सांस्कृतिक टप्पे, विविध क्षेत्रातील खूप मोठ्या व्यक्ती आणि अन्य घडामोडींचा रंजक वृत्तांत पुढील भागात पाहू या !**

जाता जाता कांही गंमती -- ऐन दादरमध्ये रामाच्या मंदिराच्या समोरच्या रस्त्यावर " भगत गल्ली " ही माहीममधील रस्त्याची पाटी, त्यावर माहीम मुंबई ४०००१६ या क्रमांकासह ऐटीत मिरविते आहे. तर नॉर्थ अव्हेन्यू, साऊथ अव्हेन्यू असे अगदी विदेशांप्रमाणे दादरमध्येही गोखले रोड, एम.बी. राऊत मार्ग यांचे नॉर्थ आणि साऊथ भाग असण्याचा दुर्मिळ प्रकार पाहायला मिळतो.

- मकरंद करंदीकर

## पत्र मानस

### राजकीय बॅनरचा देखील कचऱ्यात समावेश व्हावा !

मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार मुंबईत डीप क्लिनिंग म्हणजेच स्वच्छता मोहिमेला सुरुवात झालेली आहे. मुंबई महानगरपालिकेमार्फत जानेवारी अखेरीपर्यंत राबविण्यात येणाऱ्या स्वच्छता मोहिमेला स्वतः मुख्यमंत्री जातीने लक्ष देऊन स्वच्छ भारत मोहिमेला एक चळवळ बनविण्याच्या दिशेने प्रयत्न सुरु आहेत. असे असले तरी मुंबईचे सौंदर्य फक्त कचऱ्याच्या ढिगाऱ्यामुळेच कमी न होता दररोज नवनवीन पक्षप्रवेश, कार्यकर्ता मेळावे आणि विविध यात्रांचे राजकीय बॅनर व झेंड्यामुळे मुंबईचे मोठ्या प्रमाणात विद्रुपीकरण होत आहे. मुंबईचे सौंदर्य वाढविण्यासाठी पालिकेमार्फत बसविण्यात आलेले आकर्षक दिवे तर राजकीय बॅनर लावण्याची जणू हक्काची जागाच मिळाल्याप्रमाणे लावले जातात. पालिकेमार्फत कोणत्या उद्देशाने विकासकामे होत आहेत आणि राजकीय पक्ष त्यांचे श्रेय लाटण्यासोबत आपण त्यांना विद्रुप देखील करत आहोत याचेही त्यांना भानच नसते. 'स्वच्छ मुंबई' ही फक्त मुंबई महानगरपालिकेची जबाबदारी नसून ती प्रत्येक मुंबईकरांची देखील आहे. मुंबईत करण्यात येणाऱ्या डीप क्लिनिंगमध्ये फक्त रस्ते / नाले सफाई न होता सर्व चमको राजकीय बॅनर व झेंडे तसेच इतर वायफळ गोष्टीचा समावेश कचऱ्यात करून त्यांची देखील डीप क्लिनिंग झाल्यास खऱ्या अर्थाने मुंबई चमकून निघेल.

**- नितीन प्रकाश पडते, ठाणे (प.)**

### वादग्रस्त विधानांच्या मालिकेतील नवे विधान

उचलली जीभ आणि लावली टाळ्याला याचा प्रत्यय राजकारणात पावलोपावली येत असतो. यातूनच वादग्रस्त विधानांची मालिका सुरु होते. या मालिकेत राजस्थानच्या आदिवासी क्षेत्र विकास मंत्री बाबूलाल खराडी यांच्या अजब वक्तव्याने भर पडली आहे. ते म्हणाले, " तुम्ही मुले जन्माला घाला, पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांच्यासाठी घरे बांधतील". जगभरात लोकसंख्येचा विस्फोट होत असताना भारतातही ती समस्या तीव्रतेने जाणवत आहे. सरकारकडूनही लोकसंख्या नियंत्रणाबाबतीत विशेष मोहिमा, जनजागृती अभियान चालवले जाते. असे असताना एका जबाबदार मंत्र्याकडून असे वक्तव्य केले जाणे हे दुर्दैवी आहे. विशेष म्हणजे खराडी यांचीच आठ अपत्ये आहेत.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी**

### वाद नकोत

अयोध्येतील राम मंदिरात २२ जानेवारी रोजी पंतप्रधानांच्या हस्ते भगवान रामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात येणार आहे. या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी देशभर उत्साहाचे वातावरण असताना सोहळ्यावरुन आरोप-प्रत्यारोप होत आहेत. सोहळ्याचे आमत्रंण न मिळणे, उद्घाटनाचे मिळालेले निमंत्रण अव्हेरणे, राम मंदिराची वादग्रस्त जागा, मंदिर पूर्ण नसल्याने शंकराचार्यांचा विरोध, पत्नीशिवाय मोदी पूजा कशी काय? असे नवे वाद उकरुन काढले जात आहेत. प्रभू श्रीराम हे आपल्या देशातील कोट्यवधी भारतीयांचे आराध्य दैवत असल्याने कोणत्याही राजकीय पक्षानी राम मंदिर हा राजकीय मुद्दा बनवू नये.कोणीही हिंदू धर्म आणि हिंदुत्वविरोधी आक्रमक प्रचार करू नये. राम मंदिरावरून नकारात्मक राजकारण करु नका. अयोध्येत श्रीराम मंदीराचा लोकार्पण सोहळा पार पडणार असल्याने त्याचे श्रेय घेण्याचा कोणाही प्रयत्न करु नये. श्रीराम मंदिर लोकार्पण सोहळा लोकोत्सव म्हणून साजरा करूया. हिंदूच्या मनातील राम मंदिर उभे राहीले याचा आनंद न घेता ते कोणामुळे उभे राहीले यावर वाद घालत बसू नका.

**- विवेक तवटे , कळवा**

### दावोस वरुन राजकारण नको

राज्यातील विरोधकानी दावोस परिषदेला नापसंती दाखवली आहे. सत्ता मग कोणाचीही असो पण फायदा मात्र राज्याचा अर्थात जनतेचा झाला पाहिजे. स्वित्झर्लंडमधील दावोस परिषदेला सीएम एकनाथ शिंदे उपस्थित राहत आहे. यामध्ये संबंधित खात्याचे सचिव व मंत्री यांचा अंतर्भाव आहे. दरवर्षी जागतिक अर्थ विषयक परिषद याठिकाणी घेतली जात असते. विकसित देशाचे राष्ट्रप्रमुख,उद्योजक, गुंतवणूकदार आणि ज्या देशाना आपल्या देशात नवनवीन उद्योग आणण्याचे असते ते देश आवर्जून अशा परिषदेला हजेरी लावतात. मागील सरकारच्या काळात पर्यटन मंत्री म्हणून आदित्य ठाकरे यानी हजेरी लावली होती. विशेष म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जागतिक स्तरावरील लोकप्रियता अर्थात गॅरंटी आणि भारतातील विशेषतः महाराष्ट्रातील परदेशी गुंतवणूकीला असलेले अनुकूल वातावरण यामुळे महाराष्ट्राला तब्बल तीन लाख कोटीहून अधिकचे गुंतवणूक करार मिळण्याची शक्यता याठिकाणी असल्यामुळे दावोस सारख्या परिषदेच्या बाबतीत विरोधकानी गैरसमज पसरून मुळीच राजकारण करु नये असे वाटते.

**- संजय गंगाराम साळगांवकर**

### अटल सेतू 26 जानेवारी पर्यंत टोल फ्री करावा

नुकतेच भारत देशाचे आदरणीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी साहेब आणि महाराष्ट्र राज्याचे सन्माननीय . मुख्यमंत्री श्री. एकनाथ जी शिंदे साहेब आणि इतर मंत्री गण यांच्या उपस्थितीत ( श्री. अटल बिहारी वाजपेयी ट्रान्स हार्बर लिंक ) अटल सेतू चे लोकार्पण करण्यात आले . काही वर्षा पूर्वी वरळी सी लिंक लोकर्पण केला गेला त्या वेळेस किमान १५ दिवस वरळी सी लिंक ( राजीव गांधी सी लिंक ) टोल फ्री ठेवण्यात आला होता. त्याच प्रमाणे अटल सेतू सुद्धा २६ जानेवारी पर्यंत नागरिकां साठी टोल फ्री ठेवण्यात यावा . वाहतूक कोंडीतून सुटका, वेळेची आणि इंधनाची बचत करणारा २२ कि.मी. लांबीचा चा अटल सागरी सेतू हा खूप सुंदर रित्या बांधण्यात आला आहे. काही दिवस अटल सेतू टोल फ्री ठेवल्यास नागरिकांचा अटल सेतू वरून प्रवास करण्याची अधिकतम इच्छा निर्माण होऊन , काही दिवस टोल फ्री ठेवलेला थोडा फार झालेला तोटा सुद्धा लगेच भरून निघेल यात काही शंका नाही. तरी अटल सेतू व्यवस्थापक यांनी अटल सेतू किमान २६ जानेवारी पर्यंत तरी टोल फ्री ठेवण्याची प्रयत्नता दर्शवावी ही विनंती.

**- नितीन कदम दादर मुंबई**

### मराठीला सन्मान मिळावा

मराठी भाषे करीता दरवर्षी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा त्याचप्रमाणे वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जन्मदिनी २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा दिन दरवर्षी साजरा करण्यात येतो. या दिवशी, माझ्या मराठीचे बोलू कौतुके, भाषा भरजरी, तरी तिचा उत्सव जरतारी, असे म्हणत सर्वत्र साजरा करण्यात येतो. मराठी राज्यभाषा जाहीर झाली आहे. सरकारी कामकाजात सक्तीची झाली. न्यायालयाने मराठी भाषा येत नसेल तर शिकून घ्या, असा निर्णय दिला. परंतू मराठी देवनागरी लिपीला प्राधान्य मिळत नाही. इंग्रजी शिकलेल्यानी मराठी भाषा करीता, मराठी मध्ये आर्थिक व्यवहार करावयास हवे. आता सर्वत्र ऑनलाईन व्यवहार होत असले तरी, चेक देतांना, संपूर्ण मराठी देवनागरी लिपीत अंक आकडे असावेत. दारावरील पाट्या मराठीत असाव्यात. इंग्रजी शब्दांना मराठी शब्द असावेत. मराठी टिकवण्यासाठी ज्ञान भाषा, लोकभाषा होणे गरजेचे आहे. तरच मराठीला सन्मान मिळू शकेल.

**- विजय ना कदम, लोअर परळ**

*वेंगुर्ले : सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या वेंगुर्ले तालुक्यातील तुळस येथील श्री देव रवळनाथ मंदिर आणि परिवार देवता पुन: प्रतिष्ठापना आणि कलशारोहण सोहळा नुकताच संपन्न झाला , या सोहळ्यात डावीकडून मंगेश राऊळ,मानकरी अनिल परब ,मकरंद परब,दिवाकर परब,कृष्णा परब,बाबा परब,बाबा राऊळ,लक्ष्मण उर्फ बाळू राऊळ,हनुमंत राऊळ ,रमेश परब,बाबू मेस्त्री,गजानन सावंत,दाजी,अनिल तुळसकर,साईल तुळसकर,सदगुरू परब,प्रकाश परब,आजा सावंत,बाबी मेस्त्री,मंदिराच्या बांधणीची पूर्ण जबाबदारी घेणारे वासुदेव उर्फ पिंट्या राऊळ आदी मान्यवर उपस्थित होते .*



## म ह त्त्वा चे

### ओवळीये येथे घराला भीषण आग, सुदैवाने जीवितहानी टळली

**मालवण :** मालवण तालुक्यातील ओवळीये येथील नंदकुमार मनोहर आंगणे यांच्या घराला काल, सोमवारी मध्यरात्री भीषण आग लागली. आगीत घरातील सर्व साहित्य जळून खाक झाल्याने लाखोचे नुकसान झाले. मात्र, आग नेमकी कशी लागली याचे नेमके कारण अद्याप समजू शकले नाही. आंगणे कुटुंबीय झोपेत होते. जाग येताच आंगणे कुटुंबिय आरडाओरडा करत घरातून सुरक्षित बाहेर पडले. यावेळी आजुबाजूचे ग्रामस्थ मदतीसाठी धावले. मिळेल त्या साधनाने पाण्याचा मारा सुरु केला. मात्र आग अधिकच भडकत होती. उशिराने आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. तोपर्यंत घरातील सर्व साहित्य जळून खाक झाले.

### अयोध्येला जाणार अमरावतीच्या कुंकवाचा करंडा

**अमरावती :** भारतीय संस्कृतीत कुंकू लावण्याची प्रथा आहे. कपाळावर गंध, टिळा लावणे ही परंपरा स्त्री व पुरुष दोघांमध्येही सामान्य असली तरी कुंकू लावणे हे सौभाग्याचे लक्षण मानले जाते. कुंकू तयार करणारे शहर म्हणून अमरावतीची खास ओळख आहे. अयोध्येतील बहुप्रतीक्षित राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठेचा दिवस जवळ येऊन ठेपलेला असताना अमरावतीहून अयोध्येसाठी पाचशे किलो कुंकू पाठवले जाणार आहे. येथील 'सकल हिंदू समाज'ने कुंकू पाठवण्याचा संकल्प केला असून उद्या १७ जानेवारी रोजी हे कुंकू अयोध्येसाठी रवाना होणार आहे, अशी माहिती केसरी धर्मसभेचे अध्यक्ष आणि माजी राज्यमंत्री जगदीश गुप्ता यांनी दिली. जगदीश गुप्ता म्हणाले, अयोध्येतील प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी अंबानगरीची खास ओळख असलेले ५०० किलो कुंकू पाठवण्याचे आम्ही ठरवले आहे. कौंडण्यपूर येथील रुक्मिणी पीठाचे पीठाधीश्वर श्री राजराजेश्वर माउली सरकार हे त्यांच्यासोबत प्रतीकात्मक कलशात कुंकू सोबत नेतील. उर्वरित कुंकू रुक्मिणी पीठाचे सेवक अयोध्येत पोहोचवतील. राजराजेश्वर माउली सरकार यांचा अभिवादन सोहळा १७ जानेवारीला सायंकाळी ५ वाजता राजकमल चौकात आयोजित करण्यात आला आहे.

# कर्नाटकात बजरंग बलीचा आणि आता देशात रामाचा आधार

## जयंत पाटलांचा पंतप्रधानांना टोला



**प्रतिनिधी**
■ **निपाणी**

महत्व आणि गरज नसलेल्या गोष्टी जनतेसमोर ठेवल्या जातात. महागाई आणि इतर समस्या झाकून ठेवण्यासाठी इतर गोष्टी केल्या जात असल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली. सीमाभागातील निपाणीत राष्ट्रवादीचा मेळावा पार पडला. यावेळी बोलताना जयंत पाटील यांनी भाजपवर कडाडून हल्लाबोल केला. जयंत पाटील म्हणाले की, काळ बदलला आहे, देशातील परिस्थिती वेगळी आहे. कर्नाटकात बजरंग बलीचा आधार घेतला होता. आता देशात रामाचा आधार घेतला जात आहे. महत्व आणि गरज नसलेल्या गोष्टी जनतेसमोर ठेवल्या जातात. महागाई आणि इतर समस्या झाकून ठेवण्यासाठी इतर गोष्टी केल्या जातात, असा टोलाही त्यांनी लगावला.

ते पुढे म्हणाले की, ज्या पद्धतीने विधानसभा निवडणुकीत उत्साह दिसला होता तोच उत्साह दिसत आहे. या मेळाव्याला मोठ्या संख्येने महिला उपस्थित आहेत. त्यामुळे पुढील निवडणुकीत उत्तम पाटील हे आगामी निवडणुकीत आमदार होणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेष आहे.

दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनीही भाजपवर तोफ डागली. यावेळी बोलताना त्यांनी इतिहासाची सुद्धा आठवण करून दिली. शरद पवार बोलताना म्हणाले की, मशीद पडल्यानंतर राम मंदिर बांधण्याचा निर्णय राजीव गांधी यांच्या कार्यकाळामध्ये झाला होता. राजीव गांधी यांच्या हस्ते शिलान्यास करण्यात आला. मात्र, आता राम मंदिराचे काम बाजूला राहिलं आहे आणि भाजप आणि आरएसएसकडून याचा मतासाठी फायदा करून घेतला जात आहे.

# यवतमाळ जिल्ह्यात भीषण अपघात; 5 ठार तर 5 जण गंभीर जखमी

**प्रतिनिधी**
■ **यवतमाळ**

यवतमाळ जिल्ह्यातील पुसदमध्ये पुलावरून ऑटोचा भीषण अपघात झाला आहे. पुलावरुन ऑटो रिक्षा खाली कोसळल्याने 5 जणांचा मृत्यू झाला आहे. या अपघातत 5 जण गंभीर जखमी झाले आहेत. तर जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल केले असून ते गंभीर असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

दरम्यान मिळालेल्या माहितीनुसार ऑटोमध्ये बकरा घेऊन हे सर्व जण नवस फेडायला जात होते. ऑटोमध्ये जवळपास 10 जण असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. गंभीर जखमींची आमदार इंद्रनील नाईक अन् गटविकास अधिकारी यांनी विचारपूस केली आहे.

पुसद तालुक्यातील बेलगव्हाण घाटातील जंगलामधील लहान पुलावरून मालवाहू ॲपे पलटी झाल्याने चार जण जागीच ठार झाले.तर उपचारादरम्यान दोघा जणांचा मृत्यू झाल्याची घटना



दि.16 जानेवारी 2024 रोजीच्या सकाळी 11.30 वाजताच्या दरम्यान घडली आहे.अपघातात गंभीर जखमी झालेल्या दोन चिमुकल्यांना नांदेड येथे उपचाराकरिता भरती करण्यासाठी रवाना करण्यात आले आहे.

आज सकाळीच मुंबईच्या परळ पुलावर आज सकाळी 8 च्या सुमारास भीषण अपघात झाला आहे. एका दुचाकीला डंपरने धडक दिल्याने झालेल्या अपघातात दुचकीवरील तिघे ठार झाले आहेत. मृतांमध्ये 2 मुली आणि एका तरुणाचा समावेश आहे.

मंगळवारी सकाळी परळ पुलावर अपघात झाल्यानंतर अपघातग्रस्ताना तातडीने केईएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मृत तरुणांची नावे तनिष पतंगे (वय 24), रेणुका ताम्रकर (वय 25) अशी अपघातात मृत्यू झालेल्यांची नावे आहेत. तर एकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

हा अपघात किती भीषण असेल याचा अंदाज वाहनावरुन येतो. बाईक डंपरवर इतक्या जोरदार धडकली की बाईचा समोरचा भागाचा अक्षरश: चक्काचूर झाला आहे. डंपरला धडकल्यानंतर बाईवरील तिघेही जखमी झाले, त्यांच्या डोक्याला जबर मार लागला आणि त्यांचा तिथेच मृत्यू झाला. या अपघातानंतर तिघांना तात्काळ केइएम रुग्णालयात नेण्यात आले, मात्र तिथे डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच भोईवाडा पोलिस घटनास्थळी दाखल झाले. भोईवाडा पोलीस हा अपघात कसा घडला याचा तपास करत आहेत.

# रत्नागिरीतून हापूसची पहिली पेटी रवाना, 25 हजार रुपयांपेक्षा अधिक दर

**प्रतिनिधी**
■ **रत्नागिरी**

आंबा प्रेमींसाठी एक आनंदाची बातमी आहे. रत्नागिरी तालुक्यातून हापूस आंब्याची पहिली पेटी रवाना झाली आहे. रत्नागिरीतील हापूस आंबा अहमदाबादच्या मार्केटमध्ये विक्रीसाठी दाखल झाली आहे. या पेटीला 25 हजार रूपयांपेक्षा अधिक दर मिळण्याची शक्यता आहे. रत्नागिरीतील गणेशगुळे येथील आंबा शेतकरी दीपक शिंदे यांच्या बागेतील हापूस आंब्याची पहिली पेटी रवाना झाली. हवामानातील वातावरणात होणाऱ्या सतत बदलणाऱ्या वातावरणावर मात करत कठोर मेहनत घेतल्याने आंब्याचं चागलं पीक दीपक



शिंदे यांच्या हाती आलं आहे.

अवकाळी पाऊस आणि बदलत्या वातारणाचा फटका रब्बी पिका सोबतच गावठी आंब्याला बसत आहे. काजू, आबा या झाडांना मोहोर लागलाय, तो गळून पडत आहे. आंब्यावर रोगाचा प्रादुर्भाव देखील होत असल्यामुळे आंबा उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे. आंबा व काजूचे पीक चांगल्या प्रकारे बहरून आले आहे.

# स्पर्धा परीक्षा एमपीएससी मार्फतच घ्याव्यात

## छत्रपती संभाजीनगरात विद्यार्थ्यांचा एल्गार

**प्रतिनिधी**
■ **संभाजीनगर**

तलाठी भरतीसह वेगवेगळ्या नोकर भरती परीक्षा तसेच बार्टी, सारथी आणि महाज्योती फेलोशिप पात्रता परीक्षांत पेपर फुटी प्रकरणांमुळे दहा-दहा तास अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधकारमय झाले आहे. त्या प्रकरणाची चौकशी 'एसआयटी'मार्फत करावी व यापुढे सर्व स्पर्धा परीक्षा खाजगी संस्थांऐवजी 'एमपीएससी'च्या मार्फतच घ्याव्यात, असा एल्गार संतप्त विद्यार्थ्यांनी मंगळवारी क्रांतीचौकात पुकारला.

विद्यार्थी कृती समितीच्या वतीने स्पर्धा परीक्षांत होणाऱ्या पेपर फुटी



प्रकरणाच्या विरोधात ठिय्या आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात स्पर्धा परीक्षांची तसेच बार्टी, सारथी आणि महाज्योती फेलोशिप पात्रता परीक्षांची तयारी करणारे हजारो विद्यार्थी सकाळी साडेअकरा वाजेपासून जमा झाले. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या संतप्त भावना मांडल्या. तलाठी स्पर्धा परीक्षा पेपर फुटी प्रकरणाची 'एसआयटी'मार्फत चौकशी करुन शासनाने दोषींना स्पर्धा परीक्षा प्रक्रियेतून आजन्म हद्दपार करावे, असा सूर या आंदोलनात निघाला. ग्रामीण भागातील गरीब शेतकरी, शेतमजुरांची मुलं स्पर्धा परीक्षेची दहा- दहा तास अभ्यास करीत आहेत. मात्र, ऐन परीक्षांमध्ये काही मंडळी पेपर फोडतात. पैसे घेऊन नोकरी लावण्याचे आमिष दाखवतात, याचा शासनाने शोध घेऊन त्यांच्याविरुद्ध कडक कारवाई करावी. मागील पाच-सात वर्षांपासून नोकरीच्या अपेक्षेत स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचा परीक्षांतील घोटाळ्यामुळे भ्रनिराश होत आहे.

# निलेश लंकेंची नगरमधून लोकसभेची तयारी जोरदार

## स्वत:च काढलेल्या शिवस्वराज्य यात्रेच्या समारोपाला गैरहजर

**प्रतिनिधी**
■ **अहमदनगर**



लोकसभेची निवडणूक जसजशी जवळ येत आहे तसतसे नगरचे राजकीय वातावरण चांगलंच तापत असल्याचं दिसून येतंय. त्यामध्ये अजित पवार गटाचे आमदार निलेश लंके आणि खासदार सुजय विखे यांच्यातील राजकीय वादाला धार येताना दिसत आहे. निलेश लंके यांच्या पत्नी या नगरमधून लोकसभेसाठी इच्छुक आहेत, त्यासाठी लंके यांनी शिवस्वराज्य यात्रा काढली आहे. पण स्वत: काढलेल्या या यात्रेच्या समारोपाच्या कार्यक्रमाला मात्र त्यांनी उपस्थिती लावली नसल्याने त्याची सर्वत्र चर्चा सुरू आहे.

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे पारनेरचे आमदार निलेश लंके यांच्या 'शिवस्वराज्य' यात्रेची आज सांगता झाली. अहमदनगरच्या शहरातील माळीवाडा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ यात्रेची सांगता झाली.

# मराठा आरक्षणाचा अंतिम मसुदा तयार - बच्चू कडू

**प्रतिनिधी**
■ **अमरावती**

मराठा आरक्षणाचा तिढा अद्यापही संपलेला नाही. मनोज जरांगे पाटील २० जानेवारी रोजी मुंबईत येणार आहेत. परंतु, मराठ्यांचा हा विराट मोर्चा मुंबईत धडकू नये म्हणून सरकारपातळीवर अनेक प्रयत्न सुरू असल्याचं सांगितलं जातंय. दरम्यान, मराठा आरक्षणाचा अंतिम मसुदा तयार झाल्याची माहिती प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू म्हणाले. मराठा आरक्षणासाठी तयार करण्यात आलेल्या सरकारच्या शिष्टमंडळात बच्चू कडू यांचाही समावेश आहे. ते आज हा मसुदा मनोज जरांगे यांच्याकडे सुपूर्द करणार आहेत. याबाबत बच्चू कडू यांनी आज पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली.



बच्चू कडू म्हणाले, मराठ्यांच्या महाराष्ट्रात ५४ लाख नोंदी सापडल्या आहेत. त्यापैकी ३०-३५ लाख नोंदी मराठवाड्यातील आहेत. सापडलेल्या नोंदीपैकी त्यांच्या सगे सोयऱ्यांनाही प्रमाणपत्र देता यावं याकरता अधिसूचना काढण्यात येणार आहे. एका एका शब्दासाठी मुख्यमंत्री, सचिव यांनी चार ते पाच तास बैठक घेतली आहे. या बैठकीमध्ये मसुदा तयार करण्यात आला असून, हा मसुदा जरांगेंना दाखवण्यात येणार आहे. याबाबत त्यांची काय भूमिका जाणून घेतली जाणार आहे. तसंच जास्तीत जास्त लोकांना प्रमाणपत्र देण्याचा सरकारचा प्रयत्न असणार आहे.

"नोंदी सापडलेल्यांच्या वंशावळी शोधण्यासाठी एक टीम तयारी करावी लागणार आहे. स्वातंत्र्याप्राप्तीनंतर वंशावळ शोधलेच गेले नाहीत. कोतवाल बुक आणि जन्म-मृत्यू नोंदी मराठवाड्यात सापडत नाहीत. या नोंदींबाबत गहाळ झाले, उपलब्ध नाहीत अशी कारणे दिली जातात. परंतु, जरांगेंच्या आंदोलनाचं यश आहे. एका-एका जिल्ह्यात ३०-३५ लाख कागदपत्रांची छाननी केली आहे, याची माहिती जरांगेंना देणार आहोत", असंही बच्चू कडू म्हणाले.नोंदीनुसार, कुणबींचा आकडा वाढत जात आहे. ३३-३४ च्या नमुन्यांवरूनही नोंदी शोधल्या जात आहेत. ही कागदपत्रे जीर्ण झालेली आहेत. ती काळजीपूर्वक हाताळली जातात. पुरावा म्हणून ३३-३४ चा नमुना पाहण्यासाठी अधिसूचना काढण्यात येणार आहे, असं कडू म्हणाले. तसंच, मनोज जरांगेंचं आंदोलन आधी व्हायला पाहिजे होतं, असंही ते म्हणाले. ३३-३४ चा नमुना, गावस्तरावर उपलब्ध असलेली माहिती, लसीकरणाची माहितींसह इतर अनेक पुरावे सहपुरावे म्हणून वापरले जावेत अशी सूचना निघणार आहे, असंही ते म्हणाले.

# मराठा आरक्षणासाठी सांगली ते मुंबई वारी निघणार

**प्रतिनिधी**
■ **सांगली**

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर मनोज जरांगे-पाटील यांनी पुकारलेल्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी जिल्हाभर बैठकांचे सत्र सुरू झाले आहे. जरांगे-पाटील यांनी जाहीर केल्याप्रमाणे पायी चालत ते मुंबईत पोहोचणार आहेत. याच आंदोलनात सहभागी होण्यासाठी सांगलीतूनही आरक्षणाची वारी काढून मराठा बांधव मुंबईतील आंदोलनात सहभागी होतील, असा निर्णय घेण्यात आला. सांगलीत झालेल्या बैठकीत यावर चर्चा झाली.




जरांगे-पाटील यांनी मराठा समाजाच्या आरक्षणासाठी वारंवार पाठपुरावा करूनही राज्य सरकारचे त्याकडे लक्ष जात नाही. यामुळे आता २६ जानेवारीपासून मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करण्यात येणार आहे. यासाठी ते २० जानेवारीपासून पदयात्रेला सुरुवात करणार आहेत. ही पदयात्रा २६ जानेवारीला मुंबईत पोहोचणार आहे.

यात सहभागी होण्यासाठी सांगलीतील बांधवही चालत जाणार आहेत. ते जरांगे-पाटील यांच्यासोबत पुण्यापासून मुंबईकडे रवाना होणार आहेत. या पदयात्रेला आरक्षण वारी असे नाव देण्यात आले आहे. त्यात गावागावांतील मराठा बांधव सहभागी होणार आहेत. २२ जानेवारीला सांगलीतून या वारीला सुरुवात होणार आहे.

## सायकल रॅलीचेही नियोजन

आरक्षणाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी सायकल रॅलीचेही आयोजन करण्यात आले आहे. २० जानेवारीला सांगलीतून सकाळी ही रॅली मुंबईच्या दिशेने रवाना होईल. ज्या बांधवांना सायकल रॅलीत सहभागी व्हायचे आहे, त्यांनी अशोक पाटील कोकळेकर, युवराज शिंदे यांच्याशी संपर्क साधावा.

# रस्त्यांच्या कामातील निकृष्टता खपवून घेणार नाही

## हसन मुश्रीफांच्या हस्ते 100 कोटींच्या कामांना प्रारंभ

**प्रतिनिधी**
■ **कोल्हापूर**

रस्ते प्रकल्पातील ठेकेदारांनी खराब रस्ता केल्यास त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी कोल्हापूरकरांनी लोकप्रतिनिधींना केली. यावेळी लोकप्रतिनिधींनी देखील रस्ते चांगलेच झाले पाहिजे असा सूर आवळला. कोल्हापूरतील रस्त्यांसाठी 100 कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. आज रस्त्यांच्या कामांना प्रत्यक्ष पालकमंत्री हसन मुश्रीफ आणि आमदार राजेश क्षीरसागर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. कोल्हापूर शहरासह संपूर्ण परिसरात रस्त्यांची चाळण झालेली आहे. खराब रस्त्यांमुळे कोल्हापूरकरांना वाहन चालवणं मुश्किल झालं होतं. या सर्वांचा रोष लोकप्रतिनिधींवर



निघत होता. याच पार्श्वभूमीवर राज्य नियोजन मिळण्याचे अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामार्फत कोल्हापुरातील रस्त्यांसाठी 100 कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला होता.

मात्र प्रत्यक्षात या रस्त्यांच्या कामाला सुरुवात झाली नव्हती. अखेर आज बहुप्रतिक्षित आणि बहुचर्चित अशा 100 कोटी रुपयांच्या कोल्हापूर शहरातील रस्ते प्रकल्पाच्या कामाला मुहूर्त मिळाला.कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ, राज्य नियोजन मंडळाचे अध्यक्ष राजेश क्षीरसागर, कोल्हापूर शहराच्या आमदार जयश्री जाधव यांच्या हस्ते रस्ते प्रकल्पाचा शुभारंभ झाला. हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करून लोकार्पण सोहळयासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आमंत्रित करण्यात येणार आहे असे लोकप्रतिनिधींनी नमूद केले.

# आंबेडकरांनी घरात ऐक्य घडवले तर आम्ही त्यांच्या नेतृत्वात काम करण्यास तयार

**प्रतिनिधी**
■ **अकोला**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा बाबासाहेबांनी स्थापन केलेला पक्ष आहे. या पक्षाचे नाव ज्यांना चालत नाही त्या प्रकाश आंबेडकरांनी स्वतःच्या घरात ऐक्य घडून आणावे आम्ही त्यांच्या नेतृत्वात काम करण्यास तयार आहोत, असे मत केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केले. ते अकोल्यात बोलत होते.

अकोला येथे गायरान जमीन हक्क परिषदेच्या निमित्ताने आले असता त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. प्रकाश आंबेडकर यांच्या विषयी बोलताना रामदास आठवले म्हणाले की, तीन भावांचे तीन पक्ष असलेल्या घरातून प्रकाश आंबेडकरांनी या ऐक्याची सुरुवात करावी, आम्ही



त्यांच्यासोबत काम करायला तयार आहोत असाही टोला केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी प्रकाश आंबेडकर यांना लगावला. प्रकाश आंबेडकर यांना बाबासाहेबांचा नातू म्हणून राज्यात आंबेडकरी जनतेत प्रतिष्ठा, मान आहे. आम्हाला राज्यातच नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यात बाबासाहेबांचा कार्यकर्ता म्हणून मान आहे. आमच्या पक्षाचे नागालँडमध्ये दोन सदस्य निवडून आलेत. देशाच्या कानाकोपऱ्यातही आमचा पक्ष असल्याचे सांगायला केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले विसरले नाहीत.

# 'इंद्रायणी'च्या प्रदुषणावर पर्यावरणवादी संस्थांनी व्यक्त केली नाराजी

**प्रतिनिधी**
■ **पिंपरी**

गेल्या १४ दिवसांपासून इंद्रायणीनदी फेसाळत आहे. मात्र, ही नदी कशामुळे फेसाळत आहे. याबाबतचा शोध प्रदूषण नियंत्रण मंडळाला लागले नाही, त्याबाबत पर्यावरणवादी संस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे.

लोणावळा जवळील कुरवंडे गावातून इंद्रायणी नदीचा उगम होतो. मावळ, हवेली आणि खेड



तालुक्यातून ही नदी वाहते. उगम ते तुळापूर संगम असे १०५ किलोमीटरचे नदीपात्र आहे. आळंदी देवाची येथील बंधाऱ्यापासून ३०० मीटर अंतरापर्यंत नदी फेसाळली आहे. चिंबळी, मोई, निघोजे या भागातील औद्योगिक परिसरातील पाणी थेटपणे सोडले जात आहे.

दोन जानेवारीपासून इंद्रायणी नदी फेसाळण्यास सुरुवात झाली आहे. याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाने पाहणी केली. नगरपालिका प्रशासनाने पाहणी केली. पीएमआरडीए प्रशासनाने पाहणी केली. मात्र अजूनही नदी कशामुळे फेसाळत आहे, हे सापडत नाही. याबाबत इंद्रायणी सेवा संघाचे अध्यक्ष विठ्ठल शिंदे म्हणाले, प्रदूषण नियंत्रण मंडळ झोपलेले आहे. त्यांच्याकडे वारंवार तक्रारी करूनही ते दखल घेत नाहीत. ही दुर्दैवाची बाब आहे. इंद्रायणी नदीस फेस आल्यानंतर गेल्या पंधरा दिवसापासून आम्ही सातत्याने प्रशासनाला माहिती देत आहोत. मात्र त्याबाबत प्रशासन गंभीर नसल्याचे दिसून येत आहे. आता तर इंद्रायणीच्या पाण्यात फेस आला आहे.


## महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**

**मध्य मुंबई विद्युत विभाग, सा. बां. विभाग, सावली इमारत, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई :- ४०० ०१८.**
**दूरध्वनी क्र. ०२२-२४९२४३४९, ई-मेल :elcentralmumbai.ee@mahapwd.gov.in**

**ई निविदा सुचना क्र. ३१६ सन २०२३ - २४ ( 1st Call &2nd Call &3rd call)**

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई विद्युत विभाग वरळी मुंबई, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून खालील कामाकरिता वी १ टक्केवारी नमुन्यातील निविदा, ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता मध्य मुंबई विद्युत विभाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र | कामाचे नांव | निविदा रक्कम |
|---|---|---|
| 1 | D16029/2023-24 Providing replacement of old & unserviceble pump by New water pumps at New railway police \|line - ABCD / European Sargent / PSI & PI Bldgs. & SID office Building Dadar, Mumbai ( 2nd call ) | 1450203.00 |
| 2 | D15019/23-24 : Providing, Fully Comprehensive Maintenance to Lift no.2 at Pl building & Lift no.2 at PSI bidg for 3 years at Railway Police Compound, Dadar Mumbai.(Prime Make) (3rd call } | 1213752.00 |
| 3 | D16035/2023-24 Providing replacement of old & unserviceble Water pumps by New water pumps alongwith Switchgears and necessary plumbing items at Subhedar Qtrs, ACP officers Qtrs and Naigaon new police line Main Gate ( Pump room No.1&3) Naigaon Mumbai ( 2nd call ) | 1571961.00 |
| 4 | H11189/23-24 Providing Modernisation of Lift No. 2 in Sharda Staff Quarters Building (G + 6 Floors ) 6 Passenger Centre Opening Auto Door Lift at Sir J.J. Group of Hospitals compound, Byculla, Mumbai. (1st call ) | 1258085.00 |
| 5 | H11188/23-24 Providing Modernization of Lift no 2 in INE B Sc Nurses Hostel Building (G+7 Floors ) 6 Passengers Centre Opening Auto Door Lift at Sir JJ Group Hospitals, Byculla,Mumbai.(1st call } | 890317.00 |
| 6 | H11187/23-24 Providing Modernization of Lift No. 2 in Nurses Staff Quarters Building (G +7 Floors ) 6 Passenger Centre Opening Auto Door Lift at Sir J.J. Group of Hospitals compound, Byculla, Mumbai (1st call) | 1347945.00 |
| 7 | D15058/2023-24 Providing Fully-Comprehensive Maintenance to Prime make 2 nos.passenger lifts 10 passengers capacity, lifts no.1 & 2, G+3 floors at Sewree at Courtr Mumbai (1st call ) | 1014096.00 |
| 8 | W21119/2023-24 Providing MOW and structural repairs with civil renovation to electrical installations at hospital building in Arthur road jail Mumbai (1st call ) | 1611063.00 |

१ वरील अंदाजीत रक्कमेत जी. एस. टी. समाविष्ठ नसून ठेकेदारानी निविदेत दर भरताना जी. एस. टी. वगळून दर नमुद करावा. अंदाजीत रकमेवर नमुद केलेल्या दरानुसार आलेल्या रकमेवर जी. एस. टी. १८ टक्के पर्यंत वेगळा अदा करण्यात येईल.
२ ई-निविदा उपलब्ध कालावधी : दि. १७.०१.२०२४ ते दि.२४.०१.२०२४ रोजी सायंकाळी ५.३० पर्यंत.
३ ई निविदा उघडणे : दि. २९.०१.२०२५ रोजी सकाळी ११.00 नंतर

जा . क्र . काअ/मनुंविवि/निविदा/१७३/२०२३
दिनांक : १२/०१/२०२४
डी.जी.आय.पी.आर/आरओसी२०२३-२४/क्र.५/सी६८१०

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**मध्य मुंबई विद्युत विभाग**
**सा.बां. विभाग, वरळी**

## वाशी विभागात अतिक्रमण विभागाची धडक कारवाई

**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील वाशी विभाग अंतर्गत अब्दुल वाहिद वामिक शेख, घर क्र. 0048, जुहूगांव, वाशी नवी मुंबई येथे महानगरपालिकेची कोणतीही पुर्व परवानगी न घेता अनधिकृत बांधकाम करत असल्याचे निदर्शनास आले होते तेव्हा अनधिकृत बांधकामास वाशी विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम 54 अन्वये ०४/०८/२०२२ रोजी नोटीस बजावण्यात आलेली होती. त्यांनी सदरचे बांधकाम हटविले नसल्याने सदर अनाधिकृत बांधकामावर वाशी विभाग कार्यालयामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करून २४/०८/२०२२, 04/01/2023 व ०६/०६/२०२३ रोजी अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले होते. परंतु सदर बांधकामधारकाने सदरचे काम पुन्ह:श्च सुरु केल्याचे निदर्शनास आल्यामुळे आज १५/०१/२०२४ रोजी सदरच्या बांधकामावर निष्काशनाची कारवाई करण्यात आली आहे. सदर धडक मोहिमेसाठी वाशी विभागाकडील सहा. आयुक्त / अधिकारी / कर्मचारी, ६ मजूर, २ ब्रेकर व घन /हातोडे यांच्या सहाय्याने निष्कासित करण्यात आले.



## महत्त्वाचे

### मजुराला दारूसाठी जीवे ठार मारण्याचा तरुणांचा प्रयत्न

**कल्याण :** दारू पिण्यासाठी पैसे देण्यास नकार दिला म्हणून विठ्ठलवाडी येथील पाच तरुणांनी एका मजुराला अडविले. त्याला बेदम मारहाण करून त्याच्यावर धारदार शस्त्राने वार करून त्याला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. दोन दिवसांपूर्वी ही घटना विठ्ठलवाडी बस आगाराच्या समोरील रस्त्यावर घडली आहे. संदीप हरी विश्वकर्मा (३०) असे मजुराचे नाव आहे. तो खडेगोळवलीत औदेराम नगरमध्ये कुटुंबियांसह राहतो. त्याच्यावर मुंबईतील शीव येथील लोकमान्य टिळक रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ओम उर्फ तुषार भोसले, ऋतिक उर्फ चुहा साबळे, प्रेम सिंग उर्फ गुंडा, विशाल यादव उर्फ दही आणि पुई अशी आरोपींची नावे आहेत. हे सर्व आरोपी २३ ते २५ वयोगटातील आहेत. पोलिसांनी सांगितले, तक्रारदार मजूर संदीप विश्वकर्मा हे दिवसभराची मजुरी करून पायी आपल्या खडेगोळवली येथील घरी चालले होते. मुलांसाठी खाऊ घेतला होता. आम्हाला दारू पिण्यासाठी पैस दे, नाहीतर तुला येथून सोडणार नाही, अशी धमकी आरोपींनी दिली. मी दिवसभर कष्टाचे काम करून घरी चाललो आहे. तुम्हाला देण्यासाठी माझ्या जवळ पैसे नाहीत, असे संदीपने तरूणांना सांगितले. या वाक्याचा राग येऊन आरोपी तरूणांनी संदीपला मारहाण सुरू केली. त्याला खाली पाडून मारण्यात आले. त्याच्यावर धारदार शस्त्राने वार करून त्याला जखमी केले.

### ठाणेकरांनी लुटला गुलाबी थंडीचा अनुभव



**ठाणे :** नोव्हेंबर डिसेंबर म्हंटला कि, आठवते ती गुलाबी थंडी. मात्र, यंदाच्या वर्षी नोव्हेंबर आणि डिसेंबर महिना संपून जानेवारी महिना उजाडला तरी, थंडीचा आनंदापासून ठाणेकर मुकले होते. त्यात जनेवारी महिन्याच्या सुरुवातीला सर्वात कमी २०.२ अंश तापमानाची नोंद झाली होती. त्यानंतर पुन्हा उकाडा वाढल्याने ठाणेकरांना उन्हाचे चटके सहन करावे लागले होते. अशातच अचानकपणे सोमवारी सायंकाळ पासून तापमानाचा पार घसरू लागल्याने वातवरणात गारवा निर्माण होण्यास सुरुवात झाली होती. मंगळवारी पहाटे ४ वाजता २१.१ तर, सकाळी ६ वाजता सर्वात कमी १९.४ अंश इतक्या तापमानाची नोंद करण्यात आली. त्यामुळे उशिरा का होईना पण यंदा ठाणेकरांना गुलाबी थंडी अनुभवता आली.

### ठाकरे शिवसेनेचा 'लाव रे तो व्हिडिओ'

पान १ वरुन..

अपात्र होतील, असं संपूर्ण देशाला वाटलं होतं. आम्ही निकालाची चौकट बनवतो आणि त्या चौकटीच्या आधारावर अध्यक्षांनी निर्णय घ्यावा, असं न्यायालयानं सांगितलं होतं. पण 1999 च्या नंतरची शिवसेनेच्या घटनेची नोंद नसल्याचे कारण देत हा निर्णय दिल्याचा नार्वेकरांनी सांगितलं, असं परब म्हणाले. मात्र, 2013 च्या शिवसेनेच्या कार्यकारणीत झालेले पाचही ठराव अनिल परब यांनी वाचून दाखवले. तसेच युवा सेनेला शिवसेनेची अधिकृत संघटना म्हणून मान्यता देण्यात आली होती. 2013 च्या घटना दुरुस्तीमध्ये हा ठराव मंजूर करण्यात आला होता, अशी माहितीही अनिल परबांनी दिली.

# फी न भरल्याने विद्यार्थ्याला भरपरीक्षेतून काढले वर्गाबाहेर

### ठाण्यातील लिटिल फ्लॉवर शाळेतील प्रकार

प्रतिनिधी
■ ठाणे

ठाण्यातील वर्तकनगर येथील लिटल फ्लॉवर शाळेत विद्यार्थ्यांना फी भरली नाही म्हणून वर्गातून बाहेर काढल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकारानंतर विद्यार्थ्यांच्या पालकांनी शाळेत धाव घेत गोंधळ घातला. यावेळी शाळा प्रशासन आणि पालकांमध्ये जोरदार खडाजंगी झाल्याचे पाहायला मिळाले.

शाळेची फी न भरल्याने परीक्षा सुरु असताना विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर काढल्याचा प्रकार ठाण्यातील वर्तकनगर येथील एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मंगळवारी सकाळी घडला. पालकांनी असे आरोप केल्यानंतर शाळेच्या आवारात विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांकडून शाळा प्रशासनाला जाब विचारण्यासाठी गोंधळ घातला जात आहे.



आम्ही दर महिना फी भरतो. पण कधी तरी उशीर होतो त्यातही शाळा प्रशासनाकडून दंड आकारला जातो, ऑनलाईन फी भरलेली शाळेला मान्य नाही, शाळेत जर विद्यार्थी मराठीत बोलले तरी 50 रुपये दंड, मुलींनी शाळेत टिकली लावली तरी ५० रुपये दंड आकारण्यात येतो. तसेच विद्यार्थ्यांना फी भरण्यास उशीर झाला तर तुमची या शाळेत शिकण्याची लायकी नाही तुम्ही मराठी शाळेत शिका अशी भाषा शाळेच्या शिक्षकांकडून आणि मुख्यध्यापकांकडून वापरली जात असल्याचा आरोप पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी केला आहे.

या संपूर्ण प्रकारानंतर संतप्त पालकांकडून शाळा प्रशासनाला धारेवर धरत या प्रकरणी जाब विचारला. पालक आणि शिक्षकांमध्ये झालेल्या वादामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान, या प्रकरणी शिवसेना युवा सेनेचे नेते पूर्वेस सरनाईक यांनी शाळा प्रशासनाची भेट घेत पालकांच्या आरोपावर जाब विचारला.

# आदू बाळ मुख्यमंत्र्यांच्या मागे लागून दावोसला गेले होते

### म्हस्केंची ठाकरेंवर बोचरी टीका



प्रतिनिधी
■ ठाणे

दावोस दौऱ्याला उद्योगमंत्र्यांनी जाणे अपेक्षित असताना, पर्यटन मंत्री असताना देखील आदू बाळ का गेले. आदू बाळाची स्मृती भ्रंष झाली असून लहानपणी खाऊसाठी भांडायचे तसे आदू बाळाने तेव्हा मुख्यमंत्र्याचे मागे लागून दाओसला गेल्याची टीका शिवसेनेचे प्रवक्ते नरेश म्हस्के यांनी आदित्य ठाकरे यांचे नाव न घेता केली.

दावोस दौऱ्यावरुन आदित्य ठाकरे यांनी केलेल्या टीकेला उत्तर देताना, म्हस्के यांनी हि टीका केली. त्यामुळे आता, दावोस दौऱ्यावरून शिवसेना (शिंदे गट) विरुद्ध उद्धव बाळासाहेब ठाकरे गटात आरोपप्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जात आहे.

उध्दव ठाकरे हे जेव्हा मुख्यमंत्री होते, त्यावेळेस त्यांची प्रकृत्ती खालावली होती. त्यांच्यावर शस्त्रक्रिया देखील झाली होती. परंतु अशा परिस्थितीत आदू बाळाने त्यांच्या सोबत असणे आवश्यक असतांना ते बाळ दावोसला काय करत होते, दौरा संपल्यानंतरही ते कोणाबरोबर बर्फात मौज मजा करीत होते, हे त्यांनी जाहीर करावे असा सवाल म्हस्के यांनी उपस्थित केला आहे.

तसेच या दौऱ्याला किती जणांना ते घेऊन गेले होते, ते देखील जाहीर करावे असे आव्हानही त्यांनी आदीत्य ठाकरे यांना दिले. नियमानुसार आम्ही उच्च न्यायालयात गेला असून उबाठा गटातील १४ आमदारांना अपात्र करावे अशी मागणी केली आहे. अध्यक्षांवर दबाव होता, म्हणून त्यांनी १४ आमदारांना अपात्र केले नसल्याचा आरोपही त्यांनी केला. अध्यक्षांना कोणी भिती दाखवली म्हणून त्यांनी तो निर्णय दिला का? अशी शंकाही त्यांनी उपस्थित केली.

दरम्यान, उद्धव ठाकरे यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या महापात्रकार परिषदेवर देखील म्हस्के यांनी टीका केली आहे. जेव्हा पत्रकार परिषद घेण्याची व पत्रकारांशी संवाद साधण्याची गरज होती. त्यावेळी मी आणि माझे कुटुंब, लॅपटॉप यातून ते कधीच बाहेर नसल्याची टीका केली. तसेच आपल्याकडील लोक थाबंवावी यासाठीच महापत्रकार परिषद घेत असल्याचा आरोप देखील त्यांनी यावेळी केला.

ठाण्यातील सर्व आमदार खासदारांनी आम्ही महाआरतीचे निमंत्रण दिले जाणार आहे. राम मंदिराचे श्रेय हे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आहे, हे खासदार राजन विचारे आणि त्यांच्या नेत्यांनी मान्य करावे आम्ही त्यांच्या घरी जाऊन निमंत्रण देऊ असेही ते म्हणाले. मात्र, राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांना निमंत्रण दिले जाणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# पनवेल शहरातील पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन

प्रतिनिधी
■ पनवेल

पगारास वारंवार उशीर होत असल्याने पाणिपुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांनी दि.16 रोजी कामबंद आंदोलन पुकारले.पहाटे 4 वाजता अचानक पमीपुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन पुकारले.

मागील दोन वर्षांपासून हा प्रकार सुरू असल्यामुळे आणखी किती दिवस हे सहन करायचे असा प्रश्न या कर्मचाऱ्यांनी उपस्थित केला आहे.गुरूजी इंटरप्रायजेस या मनुष्यबळ पुरविणाऱ्या कंपनीकडून काम करणाऱ्या पाणिपुरवठा कर्मचाऱ्यांनी मात्र आंदोलनाचा पवित्रा उचलला. दिवाळी बोनस अर्धवट देणाऱ्या ठेकेदार व्यवस्थापनाकडून तीन वेळा वेगवेगळी तारीख देवून चालढकलपणा केला जात होता. ठेकेदाराकडून 15 तारीख देण्यात आली होती. परंतू 15 जानेवारीला देखील ही उर्वरित रक्कम जमा न झाल्यामुळे मंगळवारपासून कर्मचाऱ्यांनी संपाचे हत्यार उपसले. पहाटे 4 वाजल्यापासून



पाणि सोडण्याचे काम महापालिका क्षेत्रातील 29 गावे आणि पनवेल शहरात बंद करण्यात आले.

नागरिकांच्या तक्रारी सुरू होताच पाणिपुरवठा विभागाने कर्मचाऱ्यांशी संपर्क साधला असता काम बंद केल्याचे समजले. कर्मचाऱ्यांना विनवणी करण्यास सुरूवात झाली. परंतू पगार झाल्याशिवाय काम करणार नाही असा पवित्रा घेतल्यामुळे अनेक दिवस न होणारा पगार ठेकेदार गुरूजी इंटरप्रायजेसने तातडीने सकाळी 9 वाजताच कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा केला. पाणिपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता विलास चव्हाण यांनी पाणिपुरवठा सर्व्हिस केंद्रावर बैठक घेवून कर्मचाऱ्यांना काम सुरू करण्याची विनंती केली. यापुढे पगारास देखील विलंब होणार नाही अशी विनवणी केल्यानंतर कर्मचाऱ्यांना एक पाऊल मागे टाकत कामाला सुरूवात केली. त्यानंतर पनवेलकरांना पाणिपुरवठा सुरू झाला. काम बंद आंदोलनात पाणिपुरवठा विभागाचे ६० पेक्षा अधिक कर्मचारी काम करतात.

# 11 वर्षांनी मोठी प्रेयसी, लग्नाचा हट्ट आणि आक्षेपार्ह फोटो...

### प्रियकरानेच केली प्रेयसीची हत्या

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

नवी मुंबईतील एका लॉजमध्ये ३५ वर्षीय महिलेचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. मृतदेह सापडल्यानंतर अवघ्या काही दिवसांनी पोलिसांनी आता या प्रकरणाचा खुलासा केला आहे. महिलेचा गळा आवळून खून करण्यात आला होता. खुनाच्या आरोपाखाली पोलिसांनी एकाला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या आरोपीचे त्या महिलेशी संबंध होते.

९ जानेवारी रोजी एका महिलेचा मृतदेह लॉजमध्ये आढळून आला होता. हे प्रकरण नवी मुंबईतील तुर्भे भागातील आहे. जिथे ९ जानेवारीला एका ३५ वर्षीय महिलेचा मृतदेह लॉजच्या खोलीत सापडला होता. तेव्हापासून पोलीस या प्रकरणाचा तपास करत होते. महिलेसोबत लॉजवर गेलेल्या व्यक्तीचा पोलीस शोध घेत होते. आता आठवडाभरानंतर पोलिसांनी या प्रकरणाचा खुलासा करत २४ वर्षीय आरोपी सोहेब कलाम शेख याला अटक केली आहे. आरोपी हा साकीनाका, मुंबई येथील रहिवासी आहे.

माध्यमांना माहिती देताना नवी मुंबई पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, या खून प्रकरणाच्या प्राथमिक तपासात पीडित आणि आरोपीचे संबंध असल्याचं समोर आलं आहे. आरोपीला त्या महिलेशी लग्न करायचे होते. त्याला तिच्यावर लग्नासाठी दबाव आणायचा होता. त्याने महिलेला तिची वैयक्तिक छायाचित्रे तिच्या नातेवाईकांना पाठवण्याची धमकी दिली होती. ती त्याच्यापेक्षा ११ वर्षांनी मोठी आहे.

# पनवेलकरांच्या आरोग्याला मिळणार बळकटी; 30 हजार नागरिकांनी केल्या रक्त तपासण्या

प्रतिनिधी
■ पनवेल

पनवेल महापालिका पायाभूत सुविधांमध्ये वैद्यकीय आरोग्य सेवेवर भर देत आहे. आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या वैद्यकीय सेवांना बळकटी देण्यासाठी १४ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात सकाळी दहा ते दहा वाजेपर्यंत ओपीडी सुरू करण्यात आली आहे. या सेवेला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असून सुमारे दोन लाख नागरिकांनी या सेवेचा लाभ घेतला आहे; तर ३० हजार नागरिकांनी रक्त तपासण्या केल्या आहेत.

गरोदर मातांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वसामान्यांना आरोग्यविषयक सुविधा मिळाव्यात, यासाठी पनवेल महापालिकेने आरोग्य केंद्रात सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत आरोग्य सेवा देण्यावर भर दिला आहे. या अंतर्गत महापालिका प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या या ओपीडी सेवेमध्ये आरोग्य सल्ला, प्राथमिक आरोग्य उपचार, आपत्कालीन सेवा, संसर्गजन्य रोग उपचार, असंसर्गजन्य रोग उपचार, उच्च रक्तदाब, मधुमेह तपासणी व प्रतिबंध नियंत्रण, प्रसूतिपूर्व सेवा, नवजात शिशूंना दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवा, नियमित लसीकरण, कोविड लसीकरण, समुपदेशन सेवा दिल्या जात आहेत. यासोबतच प्रयोगशाळेमध्ये ४० प्रकारच्या चाचण्यांचे निःशुल्क निदान केले जात आहे. याचाही जवळपास ३० हजार १७२ नागरिकांनी लाभ घेतला आहे. याचबरोबर येथे मोफत औषध सेवाही पुरवली जात आहेत. त्यामुळे मेपासून आजपर्यंत सुमारे दोन लाख नागरिकांनी या सेवेचा लाभ झाला आहे.

**कष्टकऱ्यांना सर्वाधिक फायदा**

*सर्वसाधारणपणे कामगार तसेच कष्टकरी वर्ग हा सकाळी नऊ ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत कष्ट करतो. काही आजारपण असेल, तर हा वर्ग काम संपल्यानंतर दवाखान्यात जातो; पण सायंकाळी सवलतीच्या दरातील व मोफत सरकारी दवाखाने बंद झालेले असतात. त्यामुळेच नाईलाजास्तव खासगी दवाखान्यात उपचार घ्यावे लागत असल्याने आर्थिक भुर्दंड सोसावा लागत होता. त्यामुळे पनवेल महापालिकेने रात्री दहा वाजेपर्यंत दवाखाने सुरू ठेवल्याने कष्टकरी वर्गाला या सुविधेचा सर्वाधिक उपयोग झाला.*

# बचत गटांना विद्यार्थ्यांचे गणवेश शिवण्याचे काम

प्रतिनिधी
■ भाईंदर

मिरा-भाईंदर महापालिकेच्या शाळांमधून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे गणवेश शिवण्याचे काम आता महिला बचत गटांना देण्यात येणार आहे. प्रायोगिक तत्त्वावर, आवश्यकता असलेल्या गणवेशांच्या सुमारे २० टक्के गणवेश बचत गट शिवणार आहेत. महिला बचत गटांना गणवेश शिवण्याचे काम देणारी मिरा-भाईंदर ही राज्यातील पहिली महापालिका ठरणार आहे.

महापालिकेच्या मराठी, हिंदी, गुजराती व उर्दू माध्यमांच्या ३६ शाळा आहेत. त्यात सुमारे नऊ हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. या विद्यार्थ्यांना महापालिकेकडून गणवेश, दप्तर, बूट, मोजे, वह्या मोफत दिल्या जातात. त्यासाठी दरवर्षी एक ते दीड कोटी रुपयांची तरतूद केली जाते. हे शैक्षणिक साहित्य देण्यासाठी महापालिका कंत्राटदाराची नेमणूक करते. कंत्राटदार गणवेशासाठी आवश्यक कपड्याची खरेदी करून महापालिकेकडे सादर करतो. नंतर त्या कपड्याची गुणवत्ता प्रयोगशाळेत तपासल्यानंतर कंत्राटदार स्वतः गणवेश शिवून देतो किंवा दुसऱ्याकडून शिवून घेऊन ते महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना देतो.

मात्र यावर्षी प्रथमच कंत्राटदाराला हे गणवेश महिला बचत गटाकडून शिवून घेण्याच्या सूचना देण्यात येणार आहेत. शहरात सुमारे ९०० महिला बचत गट आहेत. त्यातील ३०० गट सक्रिय आहेत. या बचत गटांची महापालिका प्रशासनासोबत दोन वेळा बैठक पार पडली. त्यात बचत गटांनी विद्यार्थ्यांसाठी गणवेश शिवण्याची तयारी दर्शवली आहे. या गटांना गणवेश शिवण्यासाठीचे दर सादर करण्यास सांगण्यात आले.

# ब्रह्माकुमारीज पनवेलतर्फे अल्टिमेट हॅपिनेस सत्र सादर



■ पनवेल

ब्रह्मा कुमारीज पनवेल तर्फे १६ जानेवारी रोजी नवीन पनवेल येथे अल्टिमेट हॅपिनेस सत्र सादर करण्यात आले. या आयोजित कार्यक्रमात डॉ.सचिन परब यांनी अल्टिमेट हॅपिनेस या विषयावर संबोधित केले. कार्यक्रमाला चारुशीला घरत माजी उपमहापौर पनवेल महानगरपालिका, माजी नगरसेविका राजेश्री वावेकर, तारा दीदी, बीके डॉ. शुभदा नील, भारती दीदी, संतोष बहन, मंगला गडमुले, प्रभा सिन्हा आणि इतर मान्यवर उपस्थित होते. सहभागींनी अनुभवात्मक ध्यानासह सत्राचा आनंद घेतला.

# कुस्तीपटू खाशाबा जाधवांचा आदर्श सर्वांनी घ्यावा - म्हात्रे

प्रतिनिधी
■ कल्याण



स्व.खाशाबा जाधव यांचा आदर्श सर्वांनी घ्यावा असे प्रतिपादन कोकण विभागाचे मा. शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी काल केले. कल्याण डोंबिवली महानगरपालिका व ठाणे जिल्हा आटयापाटया असोसिएशन यांच्या संयुक्त विदयमाने स्व.खाशाबा जाधव यांचा जन्म दिन महाराष्ट्र राज्य क्रीडा दिन म्हणून महापालिकेच्या आचार्य अत्रे रंगमंदिरात काल संपन्न झाला, त्यावेळी बोलतांना आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी हे प्रतिपादन केले. शिव छत्रपती पुरस्कार मिळण्यासाठी मेहनत घ्यावी लागते, ग्रामीण भागातील मुलांनी मैदानाची मागणी केली तर ती उपलब्ध करुन दयावीत, शिव छत्रपती पुरस्कार मिळालेल्या मुलांना शासकीय सेवेत नोकरी मिळावी ही मागणी मी अधिवेशनात केली आहे अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

यश मिळालं तर ते डोक्यात जाता कामा नये, आपण समाजाचं देणं लागतो, हे नेहमी लक्षात ठेवल पाहिजे, चांगले संस्कार लाभले तर चांगला माणूस बनू शकतो, असे उद्गार रणजीतसिंह खाशाबा जाधव यांनी आपल्या भाषणात काढले.

या समयी ठाणे जिल्हा आटयापाटया असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ(आप्पा) शिंदे, माजी आमदार नरेंद्र पवार, स्व. खाशाबा जाधव यांचे सुपूत्र रणजीतसिंह जाधव त्यांच्या पत्नी भारती जाधव, कल्याण तालुका शारीरिक शिक्षक मंडळाचे अध्यक्ष लक्ष्मण इंगळे, पूर्वा मॅथ्यु लोकरे, सुप्रिया नाईकर प्राचार्य, ग्लोबल कॉलेज, डोंबिवली व पालक प्रतिनिधी, शिव छत्रपती पुरस्कार विजेते प्रशांत पाटील, अविनाश ओंबासे, संजय कुलकर्णी, उपआयुक्त धैर्यशील जाधव, उपआयुक्त अर्चना दिवे, वंदना गुळवे, स्नेहा करपे तसेच हास्यजत्राफेम शिवाली परब, निमिष कुलकर्णी व इतर मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

# मालमत्ताधारकांच्या माथी 136 कोटींचा दंड

### चालू आर्थिक वर्षात 36 कोटी जमा

प्रतिनिधी
■ पनवेल

पनवेल शहर महापालिका मागील ६ वर्षांचा थकीत मालमत्ताकर सिडको वसाहतींमधील आणि २९ गावांमधील मालमत्ताधारकांकडून वसूल करीत आहे. हा कर वेळीच न भरल्याने पालिकेच्या कर विभागाने करदात्यांवर तब्बल १७३ कोटी ३६ लाख रुपये शास्ती (दंड) लावला आहे. या दंडापैकी ७८ हजार २१० करदात्यांनी पालिकेकडे चालू आर्थिक वर्षात ३६ कोटी ७१ लाख रुपये जमा केले. परंतु पालिकेला अजूनही १३६ कोटी रुपये दंड वसुलीतून मिळणे शिल्लक असल्याचा अंदाज पालिकेने बांधला आहे. वेळीच मालमत्ता कर न भरल्याने पालिकेने हा दंड लावला आहे.

पनवेल शहर महापालिकेमध्ये एकूण ३ लाख ५७ हजार ८९९ करदाते आहेत. मागील काही वर्षांचा मालमत्ता



कर पनवेल महापालिकेने वसूल करू नये म्हणून विविध राजकीय पक्षांनी आणि सामाजिक संस्थांनी आंदोलने केली. तसेच न्यायालयामध्ये दाद मागितली. त्यावर अद्याप कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. न्यायालयातून किंवा राज्य सरकारकडून कोणताही दिलासा देणारा निर्णय न झाल्याने मालमत्ता कर वसुली अभियानावर पालिका प्रशासन ठाम राहिले. उलट पालिकेने वेळीच कर न भरल्यास दंडवसुलीवर व्याज वसूल करण्याची भूमिका प्रसारमाध्यमांना जाहिराती देऊन मांडली.

पालिकेचे करावरील दंड आणि त्या दंडावरील व्याजाची रक्कम पालिकेच्या आर्थिक ताळेबंदाच्या पुस्तकात वाढत गेल्यामुळे सुमारे पावणेदोनशे कोटी रुपये दंड आणि व्याजाच्या रकमेतून पालिकेला मिळणार आहेत. निवासी करदात्यांपेक्षा व्यापारी आणि औद्योगिक करदात्यांना वेळीच कर न भरल्याने लाखोंचा मालमत्ता कर त्यावरील दंड व्याज ही रक्कम लाखो रुपयांवर गेल्याने मोठ्या आर्थिक भुर्दंडाचा सामना करावा लागत आहे. व्यापारीवर्गाकडून पनवेल पालिकेचे आयुक्त किंवा मुख्यमंत्री तसेच उच्च न्यायालयाने मालमत्ता कराचे दर कमी करण्याबरोबरच दंड आणि त्यावरील व्याजाची रक्कम रद्द करण्याची मागणी होत आहे.

# शासकीय रुग्णालयाच्या टेरेसवर सापडला मृतदेह

■ उल्हासनगर

उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयाच्या टेरेसवर एका रुग्णाने प्राण गमावल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी मध्यवर्ती पोलीस तपस करीत आहेत. रविवारी रात्री हा रुग्ण गंभीर आजारावर उपचार घेण्यासाठी मध्यवर्ती रुग्णालयात वार्ड नंबर बारामध्ये भरती करण्यात आला होता, मात्र वॉर्ड बॉय व नर्स यांची नजर चुकवून तो टेरेसवर गेला, दरम्यान टेरसेवरून पळून जाण्याचा प्रयत्न करीत असतांना त्याचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेनंतर मध्यवर्ती रुग्णालयात एकच खळबळ उडाली आहे. सूर्यकिरण बिरला वय वर्ष अंदाजे ४० असे या रुग्णाचे नाव असून तो उपचार घेण्यासाठी कर्जत ग्रामीण येथून उल्हानगरच्या मध्यवर्ती रुग्णालयात दाखल झाला होता, मात्र उपचारा दरम्यान तो पहाटेच्या सुमारास रुग्णालयाच्या टेरेसववरून पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे, यात रुग्णावर उपचार सुरू असताना ही घटना घडल्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांनी रुग्णालय प्रशासनावर आपला रोष व्यक्त केला आहे, यात मध्यवर्ती रुग्णालयाचे प्रशासन जबाबदार असल्याचा धक्कादायक आरोप रुग्णाच्या बायकोने केले आहेत.

# मराठी भाषेत ज्ञाननिर्मिती करुन तिचे संवर्धन करायला हवे - प्रल्हाद जाधव

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

मातृभाषा मराठी हा आपल्या अस्तित्वाचा हुंकार असून मराठी भाषेत ज्ञाननिर्मिती करुन तिचे संवर्धन करायला हवे असे सांगत साहित्यिक, वक्ते प्रल्हाद जाधव यांनी भाषा टिकवण्याची जबाबदारी शासकीय यंत्रणेवर टाकली जाते, मात्र ती जनतेचीही जबाबदारी असून दोघांनी एकत्रितपणे व त्यात शासनाने समन्वयकाच्या भूमिकेतून भाषा संवर्धनाचे काम केले पाहिजे असे मत व्यक्त केले.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली, मराठी भाषा संवर्धन पंधरवडयानिमित्त आयोजित उपक्रमांतील दुसरे व्याख्यानपुष्प गुंफताना महाराष्ट्र शासनाचे निवृत्त माहिती संचालक तथा सुप्रसिध्द लेखक, नाटककार प्रल्हाद जाधव यांनी 'वाणी, भाषा, लेखणी... शासकीय




कामकाजातील यशाची त्रिवेणी' या विषयावर उपस्थित नमुंमपा अधिकारी, कर्मचारी यांच्याशी संवाद साधला. महानगरपालिका शब्दात पालक नाही तर पालिका आहे. म्हणजेच तिच्यात स्त्रित्वाची, आईपणाची भावना आहे. आईपण हे जपणारे असते. त्यात नवी मुंबई हा देखील स्त्रीलिंगी शब्द असल्याने त्यातही आईपण आहे. त्यामुळे दोन आया एकत्र येऊन शहर संगोपनाची भूमिका त्या चांगल्या रितीने जपत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

## प्रा. डॉ. प्रकाश खांडगे यांना मेस्टा जीवनगौरव पुरस्कार जाहीर

**मुंबई :** लोककलांचे ज्येष्ठ अभ्यासक प्रकाश खांडगे यांना महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्ट असोसिएशन या संस्थेतर्फे शिक्षण क्षेत्र आणि समाजसेवेतील बहुमोल योगदानाबद्दल जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. राणीबाग भायखळा येथील अण्णाभाऊ साठे नाट्यगृहात 18 जानेवारी रोजी सकाळी 11 वाजता त्यांना हा जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येईल. असे मेस्टाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजयराव तायडे पाटील यांनी एका पत्रकाद्वारे जाहीर केले आहे. या जीवन गौरव पुरस्काराबद्दल प्रा. डॉ. घावरे पाटील यांनी प्रा. डॉ. प्रकाश खांडगे यांचे अभिनंदन केले आहे. पत्रकारितेद्वारे तसेच लोकसाहित्य लोककलांचे ज्येष्ठ अभ्यासक म्हणून प्रा. डॉ. प्रकाश खांडगे यांनी महाराष्ट्रातील लोककलावंतांच्या विकासासाठी बहुमोल कार्य केले आहे. मुंबई विद्यापीठात लोककला अकादमीमध्ये समन्वयक आणि त्यानंतर प्राध्यापक म्हणून 2017 पर्यंत यशस्वीरित्या लोककलांच्या प्रशिक्षणाचे अध्यापन कार्य त्यांनी केले आहे. त्यांना आत्तापर्यंत 'पद्मश्री दया पवार पुरस्कार', 'महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट संशोधन ग्रंथ पुरस्कार', महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक क्षेत्राचा 'कलादान पुरस्कार' भारत सरकारच्या 'संगीत नाटक अकादमीचा राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते 2019 मधला पुरस्कार' तसेच भारत सरकारच्या पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्राचा 'पद्मभूषण कोमल कोठारी पुरस्कार' 2021 मध्ये प्राप्त झाला आहे.



### आत्माराम मोरे शालेय कबड्डी स्पर्धा

## माणेकलाल एमपीएस विभागात प्रथम



**प्रतिनिधी**
**मुंबई**

महाराष्ट्र राज्य क्रीडा दिनाचे औचित्य साधून सुरु झालेल्या ज्येष्ठ क्रीडा पत्रकार स्व. आत्माराम मोरे स्मृती आंतर शालेय सुपर लीग विनाशुल्क कबड्डी स्पर्धेत माणेकलाल मेहता मुंबई पब्लिक स्कूल-घाटकोपर संघाने पश्चिम उपनगर विभागातून प्रथम क्रमांक पटकाविला. झटापटीने रंगलेल्या संपूर्ण सामन्यामध्ये माणेकलाल स्कूलने समता विद्यामंदिरचे आव्हान ५८-५५ असे संपुष्टात आणले आणि विभागीय प्रथम स्थानावर झेप घेतली.

आत्माराम मोरे प्रतिष्ठान व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी आयोजित पश्चिम उपनगर विभागीय निर्णायक लढत माणेकलाल स्कूलचा सामनावीर राहुल बराई व कुलदीप सिंग विरुद्ध समता विद्यामंदिरचा हर्ष पावसकर व करण इंगवले यांच्या चौफेर चढायांनी गाजली. मध्यंतराला माणेकलाल स्कूलने २२-१८ अशी घेतलेली आघाडी अखेर समता विद्यामंदिर संघावर ३ गुणांनी विजय मिळविण्यास उपयुक्त ठरली. यावेळी शालेय कबड्डी संघांकडून प्रात्याक्षिकांसह वॉर्म-अपचा सराव करून घेतांना त्यापासून होणाऱ्या फायद्यांची माहिती देण्यात आली. वॉर्म-अप केल्यामुळे खेळतांना क्वचितच किरकोळ दुखापत होते. म्हणून मार लागण्याची भीती न बाळगण्याचा सल्ला शालेय खेळाडूंना देण्यात आला. तसेच खेळाडूंनी सामन्यात केलेल्या चुकांचे परिमार्जन करण्यात आले.

## भारताची अष्टपैलू दीप्ती शर्मा आयसीसीची 'प्लेयर ऑफ दि मंथ'

### जेमिमाह रॉड्रिग्ज आणि झिम्बाब्वेची प्रेशियस मारंज शर्यतीत होत्या

**वृत्तसंस्था**
**लंडन**

भारताच्या दीप्ती शर्मा हिला आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (ICC) महिन्यातील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार जाहीर केला आहे. आयसीसीने मंगळवारी याची घोषणा केली. पुरुष क्रिकेटपटूंमध्ये ऑस्ट्रेलियन गोलंदाज पॅट कमिन्सला हा पुरस्कार देण्यात आला. ICC ने डिसेंबर २०२३ मध्ये सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्यांना हा पुरस्कार दिला.




दीप्तीसोबतच भारताची जेमिमाह रॉड्रिग्ज आणि झिम्बाब्वेची प्रेशियस मारंज याही पुरस्काराच्या शर्यतीत होत्या. पुरुष गटात बांगलादेशचा तैजुल इस्लाम आणि न्यूझीलंडचा ग्लेन फिलिप्स हे शर्यतीत होते.

***इंग्लंड-ऑस्ट्रेलियाविरुद्ध शानदार कामगिरी केली***

*दीप्तीने गेल्या महिन्यात इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध चमकदार कामगिरी केली होती. इंग्लंडविरुद्धच्या एकमेव कसोटीच्या दोन्ही डावांत तिने ९ विकेट घेतल्या. तिने पहिल्या डावात 5 तर दुसऱ्या डावात 4 विकेट्स घेतल्या. एवढेच नाही तर तिने ६७ धावा केल्या.इंग्लंडपाठोपाठ दीप्तीने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटीतही 8 विकेट घेतल्या होत्या, तिने फलंदाजीतही ७८ धावा केल्या होत्या. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात तिने अवघ्या ३८ धावांत ५ विकेट घेतले.'आयसीसी प्लेयर ऑफ द मंथ' पुरस्कार जिंकल्यानंतर दीप्ती म्हणाली, 'डिसेंबरसाठी आयसीसी महिला खेळाडू म्हणून निवड होणे ही माझ्यासाठी सन्मानाची गोष्ट आहे. गेल्या महिन्यात बलाढ्य संघांविरुद्ध मी भारतासाठी चांगली कामगिरी करू शकलो याचा मला आनंद आहे. भविष्यात मला असेच आणखी क्षण मिळावेत यासाठी मी कठोर परिश्रम करत राहीन.*

### पॅट कमिन्स 'प्लेअर ऑफ द मंथ' ठरलेला तिसरा ऑस्ट्रेलियन



*ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्स याने महिन्यातील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार पटकावला. हा पुरस्कार जिंकणारा तो तिसरा ऑस्ट्रेलियन खेळाडू ठरला. त्यांच्या आधी ट्रॅव्हिस हेडला नोव्हेंबरमध्ये हा पुरस्कार मिळाला होता. तर डेव्हिड वॉर्नरने नोव्हेंबर २०२१ मध्ये हा पुरस्कार जिंकला.पॅट कमिन्सने पाकिस्तानविरुद्धच्या कसोटी मालिकेत १९ विकेट घेतल्या होत्या. दुसऱ्या कसोटीत त्याने दोन्ही डावात ५ -५ विकेट्स घेतल्या. या कामगिरीसाठी त्याला सामनावीराचा पुरस्कार मिळाला. तिसऱ्या कसोटीनंतर त्याला मालिकावीराचा पुरस्कारही मिळाला.*

### सुमित नागलची ऐतिहासिक कामगिरी

## 1989 नंतर ग्रँड स्लॅम स्पर्धेत उच्चमानांकित खेळाडूला पराभूत करणारा पहिला भारतीय

**वृत्तसंस्था**
**मेलबर्न**

भारतीय टेनिसपटू सुमित नागल याने इतिहास रचत मोठी कामगिरी केली आहे. त्याने उच्चमानांकित खेळाडूला एकेरी सामन्यात पराभूत करत ऑस्ट्रेलियन ओपन ग्रँड स्लॅम स्पर्धेत मोठा अपसेट केला आहे. त्याने ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये पुरुष एकेरीच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. मुख्य फेरीच्या पहिल्या फेरीत त्याने २७व्या मानांकित अलेक्झांडर बुब्लिकचा पराभव केला. नागलने हा सामना ६-४, ६-२, ७-६ असा सरळ सेटमध्ये जिंकला. अलेक्झांडरचे या स्पर्धेत ३१वे मानांकन होते. त्याचा पराभव करत त्याने सर्वानाच आश्चर्याचा धक्का दिला आहे.

सुमित नागल २०१३ नंतर एकेरीची दुसरी फेरी गाठणारा पहिला भारतीय पुरुष खेळाडू आहे. सोमदेव देवबर्मनने २०१३ मध्ये दुसऱ्या फेरीत प्रवेश केला होता. १९८९ नंतर पहिल्यांदाच भारतीय खेळाडूने ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये एकेरी



सामन्यात अग्रमानांकित खेळाडूचा पराभव केला आहे. रमेश कृष्णन यांनी १९८९ मध्ये अशी कामगिरी केली होती. त्यानंतर दुसऱ्या फेरीत त्यांनी स्वीडनच्या मॅट्स विलँडरचा पराभव केला. विलँडर त्यावेळी टेनिस क्रमवारीत जगातील अव्वल खेळाडू होते.

सुमितने दुसऱ्यांदा ग्रँडस्लॅमची मुख्य फेरी जिंकली आहे. याआधी २०२०च्या यू.एस. ओपनमध्ये तो मुख्य ड्रॉमध्ये एक सामना जिंकण्यात यशस्वी ठरला होता. टेनिस क्रमवारीत अव्वल १०० मध्ये स्थान मिळवणाऱ्या खेळाडूला त्याने सातव्यांदा पराभूत केले आहे. त्याचबरोबर विरोधी खेळाडूच्या क्रमवारीत सुमितचा हा दुसरा मोठा विजय आहे.

## एनएमपीएलसाठी निवड चाचणी 17 जानेवारीला

**प्रतिनिधी**
**ठाणे**

माझगाव क्रिकेट क्लब आयोजित दुसऱ्या नवी मुंबई प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेकरता नोंदणी केलेल्या खेळाडूंची निवड चाचणी १७,१८ आणि १९ जानेवारी रोजी होणार असल्याची माहिती या लीगचे प्रवर्तक शाह आलम शेख यांनी दिली आहे.

मुंबई क्रिकेट संघटनेची मान्यता असलेल्या या लीगचे आयोजन ठाणे जिल्ह्यातील क्रिकेटपटूंना संधी देण्याच्या उद्देशाने करण्यात आले आहे. या लीगमध्ये आठ संघ विजेतेपदासाठी लढत देतील. या आठ संघाकरता या निवड चाचणी नंतर लिलावाद्वारे खेळाडूंना निवडण्यात येतील.

फेब्रुवारी महिन्यात रंगणाऱ्या या लीगमध्ये अंबरनाथ ॲव्हेंजर्स, वाशी वारियर्स, कोपरखैरणे टायटन्स, मिरा भाईंदर लायन्स, बेलापूर ब्लास्टर्स, ठाणे टायगर्स, सानपाडा स्कॉर्पिअन, कल्याण टस्कर आदी संघाचा समावेश असून स्पर्धेदरम्यान विजयी संघासह लीगमधील प्रत्येक संघाला रोख बक्षिसे देण्यात येतात असे लीगचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिजित घोष यांनी सांगितले. स्पर्धेदरम्यान प्रत्येक संघ सात सामने खेळेल. त्यातील गुणानुक्रमे पहिले चार संघ उपांत्य फेरीत खेळण्यासाठी पात्र ठरतील. लीगचे सामने दादोजी कोंडदेव स्टेडियम, डॉ डी वाय पाटील स्टेडियम इथे खेळवण्यात येणार आहेत.

ही निवड चाचणी सिडको ग्राउंड, पाली कळंबोली, सेक्टर १९, प्लॉट नंबर २-ए नवी मुंबई येथे सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत होईल असे भुपेंद्र सिन्हा यांनी सांगितले.अधिक माहितीसाठी ९८६७६९८१२२ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन लीगचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिजित घोष यांनी केले आहे.

## अमरहिंद मंडळ राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेची गटवारी जाहीर

### मिडलाईन - जय दत्तगुरू लढतीने स्पर्धेला प्रारंभ

**प्रतिनिधी**
**मुंबई**

मिडलाईन स्पोर्टस् - रायगड विरुद्ध जय दत्तगुरु कबड्डी संघ - मुंबई शहर या रंगतदार लढतीने अमरहिंद मंडळ आयोजित "स्व. उमेश शेनॉय स्मृती चषक राज्यस्तरीय पुरुष कबड्डी स्पर्धेचा" प्रारंभ होईल. आज दिनांक १७जानेवारी रोजी सायं. ४-० ०वा. दादर, गोखले रोड(प.) येथील मंडळाच्या पटांगणात मॅटच्या क्रीडांगणावर ही स्पर्धा होईल. मंडळाचे माजी कार्यवाह व कबड्डी संघाचे माजी संघनायक रंजन पडते यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन होईल. सामने एकाच क्रीडांगणावर खेळविण्यात येणार असल्यामुळे १६ सहभागी संघाची ५ गटात विभागणी करण्यात आली आहे. या स्पर्धेची गटवारी आज मंडळाचे विद्यमान सचिव रवींद्र ढवळे व स्पर्धा प्रमुख साईनाथ काळसेकर यांनी सर्व प्रसार माध्यमाकरीता जाहीर केली.

***पुरुष गट राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेची गटवारी.***
***अ गट :-*** *१)मिडलाईन स्पोर्टस् (रायगड), २)जय दत्तगुरु कबड्डी संघ (मुं. शहर), ३)विजय स्पोर्टस् क्लब (ठाणे).*
***ब गट :-*** *१)बाबुराव चांदेरे फाऊंडेशन (पुणे), २)शिवशंकर मंडळ (ठाणे), ३)ओम् पिंपळेश्वर मंडळ (मुंबई शहर).*
***क गट :-*** *१)विजय क्लब (मुंबई शहर), २)जॉली स्पोर्टस् (मुंबई उपनगर), ३)अंकुर स्पोर्टस् (मुंबई शहर).*
***ड गट :-*** *१)लायन्स स्पोर्टस् (मुंबई शहर), २)श्री विठ्ठल मंडळ (ठाणे), ३)बंड्या मारुती मंडळ (मुंबई शहर).*
***ई गट :-*** *१)जय भारत क्रीडा (मुंबई शहर), २) गोलफादेवी सेवा (मुंबई शहर), ३)श्री राम कबड्डी संघ (पालघर), ४) ओवाळी क्रीडा मंडळ (मुंबई उपनगर).*

## गोरेगाव पूर्व येथील मोहन गोखले रोड जंक्शनच्या नूतनीकरण कामाला सुरुवात

**प्रतिनिधी**
**मुंबई**

गोरेगाव पूर्व येथील दूध सागर रोड आणि मोहन गोखले रोड या जंक्शन च्या नूतनीकरणाच्या कामाला आता प्रत्यक्षात सुरुवात झाली आहे. भाजपच्या स्थानिक माजी नगरसेविका प्रीती मनोज सातम यांनी या कामाचे सोमवारी श्रीफळ वाढवत या कामाच्या शुभारंभ केला आहे. त्यामुळे या भागातील रहिवाशांना होणारा वाहतुकीचा आणि वाहतूक कोंडीचा त्रास कमी होईल.

मोहन जोशी रोड जंक्शनची मागील काही महिन्यांपासून दुरवस्था झाली होती. अनेक भागात खड्डे झाल्याने या परिसरात वाहतूक संथ गतीने होत होते, परिणामी वाहतूक




कोंडीची प्रचंड समस्या निर्माण होत होती. त्यामुळे या जंक्शनचे नूतनीकरण व्हावे यासाठी भाजपच्या स्थानिक माजी नगरसेविका प्रीती सातम यांनी सातत्याने प्रयत्न केल्यावर या कामाला प्रत्यक्षात सुरुवात होत आहे. सोमवारी या कामाचा शुभारंभ श्रीफळ वाढवून केले आहे. हे जंक्शन मास्टिक तंत्राचा वापर करत बनवले जाणार आहे. जेणेकरून या भागातील वाहतूक सुरळीत राहील.

या भागातील रस्त्यांच्या सिमेंट काँक्रिट ची कामे यापूर्वीच हाती घेतली असून जनतेला दिलेल्या वचना प्रमाणे याही जंक्शनच्या कामाला सुरुवात होत आहे. हे नियोजित वेळेत पूर्ण होईल आणि येत्या पावसाळ्यात या भागात खड्डे आणि खराब झालेल्या भागामध्ये जो त्रास मागील अनेक वर्षांपासून विभागांतील जनता भोगत होती, तो त्रास आता कायमचा दूर होईल असा विश्वास सातम यांनी व्यक्त केला आहे.

### दादासाहेब फाळके चित्रपट युनियन

## महाराष्ट्राच्या संयुक्त सचिवपदी जगदीश हांडे यांची नियुक्ती

**प्रतिनिधी**
**मुंबई**

मुंबई येथील सामाजिक कार्यकर्ते, आणि दानशूर असे व्यक्तिमत्व म्हणून प्रसिध्द असलेले अनेक वर्ष सामाजिक क्षेत्रात तसेच वृत्तपत्रामध्ये काम केलेले, शौर्य दिव्यांग फाउंडेशन चे महाराष्ट्र राज्याचे सचिव जगदीश हांडे यांची दादासाहेब फाळके चित्रपट युनियन महाराष्ट्र राज्य च्या जॉइंट सेक्रेटरी पदी निवड झाली असून आज दादासाहेब फाळके चित्रपट युनियनचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित म्हामुणकर यांनी त्यांना रीतसर नियुक्तीपत्र देऊन भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. हांडे यांना प्रिंट मिडिया व इलेक्ट्रॉनिक मीडिया यांची जवाबदारी



सुध्दा दिली आहे.

आतापर्यंत हांडे यांनी अपंग पुनर्वसन योजना, शालेय पोषण आहार, शाळकरी मुलांना गणवेश व शालेय पुस्तके वाटप, चित्रकला स्पर्धा, सामाजिक जनजागृती तसेच वृध्दआश्रम मद्ये जाऊन ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे असे उपक्रम राबविले आहेत.

## मध्य रेल्वेच्या डॉ. आंबेडकर स्मृती रुग्णालयाला सीएसआर फंड अंतर्गत कॉक्लीअर इम्प्लांट उपकरण

**प्रतिनिधी**
**मुंबई**

मध्य रेल्वेच्या भायखळा येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती रूग्णालय, समारंभात व्यावसायिक सामाजिक जबाबदारी (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) उपक्रमांतर्गत मध्य रेल्वेला कॉक्लियर इम्प्लांट हे इलेक्ट्रॉनिक उपकरण प्रदान करण्यात आले.

११ जानेवारी २०२४, रोजी मध्य रेल्वे मुख्यालयातील महाव्यवस्थापक सभागृह येथे आयोजित समारंभात मध्य रेल्वे महाव्यवस्थापक राम करण यादव, तसेच अपर महाव्यवस्थापक मध्य रेल्वे, चित्तरंजन स्वैन, प्रधान मुख्य वैद्यकीय संचालक मध्य रेल्वे, डॉ. मीरा अरोरा आणि मध्य रेल्वेचे इतर अधिकारी वर्ग उपस्थित होते. या प्रत्यारोपणाच्या कार्याचा फायदा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती रूग्णालय, भायखळा, मुंबई येथील रुग्णांना होणार आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती रूग्णालय, मध्य



रेल्वेचे ३६६ खाटांचे तिसरे संदर्भ रुग्णालय, मध्य रेल्वे आणि भारतीय रेल्वेच्या सर्व क्षेत्रामधील रुग्णांना आरोग्य सेवा प्रदान करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. रूग्णालयाचा कान-नाक-घसा (ईएनटी) विभाग २००४ पर्यंत, संपूर्ण देशातील फक्त काही रुग्णालये ही शस्त्रक्रिया करत होते, तेव्हापासून कान, नाक आणि घशाची काळजी घेण्याच्या संपूर्ण स्पेक्ट्रम हाताळण्यात कौशल्यासाठी प्रसिद्ध आहे व उत्कृष्टतेचे केंद्र देखील होते, ज्यात २००४ पासून पायनियरिंग कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया समाविष्ट होती. ईएनटी फील्डमध्ये दरवर्षी अंदाजे ३० कॉक्लियर रोपण होतात.

कॉक्लियर इम्प्लांट ही इलेक्ट्रॉनिक उपकरणे आहेत जी गंभीर ते गंभीर संवेदनासंबंधी श्रवणशक्ती कमी झालेल्या व्यक्तींसाठी डिझाइन केलेली आहेत (७० डीबी/८०-१००% श्रवण कमी). हे यंत्र मुले (जन्मापासून बहिरे) आणि प्रौढ (भाषिकोत्तर – प्रौढ व्यक्ती बोलणे शिकल्यानंतर बहिरे होतात) अशा दोन्ही प्रकरणांमध्ये वापरली जाते. हे प्रत्यारोपण मुले आणि प्रौढ दोघांसाठी एकप्रकारची जीवनरेखा आहेत, ज्यांना श्रवणयंत्राचा फायदा होत नाही. कॉक्लियर इम्प्लांटचे सर्वोत्तम परिणाम लहान मुलांमध्ये दिसून येतात. वय जितके लहान तितके ते अधिक योग्य. दरवर्षी सुमारे ३० कॉक्लियर इम्प्लांट करणारे हे हॉस्पिटल शस्त्रक्रियेच्या प्रतीक्षेत असलेल्या लोकांसाठी आशेचा किरण बनले आहे.



***मुंबई: राष्ट्रीय स्वयंसेवक संघ परिवाराच्या वतीने मंगळवारी प्रतिनिधींनी भाजपा विधानपरिषद गटनेते आमदार प्रविण दरेकर यांना त्यांच्या निवासस्थानी जाऊन राम मंदिराच्या उदघाटनानिमित्त अक्षता दिल्या. दरेकर कुटुंबियांनी त्याचे मनोभावे स्वागत केले. त्यानंतर दरेकर यांनी त्यांच्या समवेत जाऊन इमारतीतील सुरक्षा रक्षकांनाही अक्षता व प्रभू श्रीरामाची तसवीर प्रदान केली.***

## पश्चिम रेल्वेची 'वांद्रे टीटी-उधना सुपरफास्ट स्पेशल' ट्रेन

**प्रतिनिधी**
**मुंबई**

प्रवाशांच्या सोयीसाठी आणि अतिरिक्त गर्दी कमी करण्याच्या दृष्टीकोनातून, पश्चिम रेल्वे वांद्रे टर्मिनस ते उधना दरम्यान विशेष भाड्यावर सुपरफास्ट स्पेशल ट्रेन चालवणार आहे. सुमित ठाकूर - पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी यांनी जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, या ट्रेनचे तपशील असे आहेत.

गाडी क्रमांक ०९०५५ / ०९०५६ वांद्रे टर्मिनस - उधना सुपरफास्ट स्पेशल (६४ फेऱ्या) :ट्रेन क्र. ०९०५५ वांद्रे टर्मिनस - उधना स्पेशल वांद्रे टर्मिनस येथून दररोज (मंगळवार व शुक्रवार वगळता) ०९.५० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी उधना येथे १४.०५ वाजता पोहोचेल. ही ट्रेन 17 जानेवारी 2024 ते २९ फेब्रुवारी २०२४ पर्यंत धावेल. त्याचप्रमाणे, ट्रेन क्रमांक ०९०५६ उधना – वांद्रे टर्मिनस स्पेशल उधना येथून दररोज (सोमवार आणि गुरुवार वगळता) १६.१५ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी २०.३० वाजता वांद्रे टर्मिनसला पोहोचेल. ही ट्रेन १६ जानेवारी २०२४ ते २८ फेब्रुवारी २०२४ पर्यंत धावेल.ही गाडी दोन्ही दिशांना बोरीवली, विरार, बोईसर, वापी, वलसाड, बिलीमोरा आणि नवसारी स्थानकावर थांबेल.या ट्रेनमध्ये स्लीपर क्लासचे डबे आणि सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे आहेत.

ट्रेन क्रमांक ०९०५५ आणि ०९०५६ साठी १९ जानेवारी २०२४ पर्यंतच्या सहलींसाठी बुकिंग सर्व पीआरएस काउंटरवर आणि IRCTC वेबसाइटवर सुरू आहे. वरील गाड्या विशेष भाड्यावर विशेष ट्रेन म्हणून धावतील. थांबण्याच्या वेळा आणि रचना यासंबंधी तपशीलवार माहितीसाठी, प्रवासी कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट देऊ शकतात.

## मध्य रेल्वेच्या 10 कर्मचाऱ्यांना महाव्यवस्थापकांचा 'संरक्षा पुरस्कार'

**प्रतिनिधी**
**मुंबई**

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राम करण यादव यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे आयोजित कार्यक्रमात मध्य रेल्वेच्या १० कर्मचाऱ्यांना "महाव्यवस्थापक संरक्षा पुरस्कार" प्रदान करण्यात आला. मुंबई विभागातील ३, नागपूर विभागातील १, पुणे विभागातील ३ आणि सोलापूर विभागातील ३ कर्मचाऱ्यांना हा पुरस्कार देण्यात आला.




छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे दि. १६.१.२०२४ रोजी आयोजित कार्यक्रमात नोव्हेंबर ते डिसेंबर - २०२३ या महिन्यात कर्तव्य बजावताना त्यांनी दाखवलेली सतर्कता, अनुचित घटना टाळण्यात आणि ट्रेन ऑपरेशन्समध्ये संरक्षितता सुनिश्चित करण्यात त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. या पुरस्कारामध्ये पदक, प्रशंसा प्रमाणपत्र, अनुकरणीय संरक्षा कार्याचे प्रशस्तिपत्रक आणि २०००/- रोख पुरस्काराचा समावेश आहे.

मुंबई विभागात १) संजीत प्रसाद सिंग, ट्रेन व्यवस्थापक, पनवेल, २) नीरज कुमार, स्थानक उपव्यवस्थापक, पेण, ३) रामेश्वर मीना, तंत्रज्ञ लोकमान्य टिळक टर्मिनस, नागपूर विभागातील सुधीर भाऊदास चव्हाण, तंत्रज्ञ, पुणे विभागतील चिरंजीलाल बैरवा, रूळ व्यवस्थापक, कोरेगाव, २) राजीव कुमार, तंत्रज्ञ ३) निखिल कांबळे, तंत्रज्ञ पुणे विभाग,सोलापूर विभागात १) पी.जे. जिजीमोन, स्थानक उपव्यवस्थापक, कलबुरगि, २)सुनील कुमार, पॉइंट्समन, सावलगी,३) विनोद कुमार, गेटमन कलबुरगि, हे ते मानकरी आहेत

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**वृक्ष प्राधिकरण**

**- जाहिर सूचना-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (२४ जून २०२१ सुधारलेला) कलम ८ ( ३) (क) मधील तरतूदी नुसार परिमंडळ ७ मधील 'आर / उत्तर' विभागातील ०४ प्रस्ताव म्हणजेच एकूण ०४ प्रस्ताव, म.न.पा. आयुक्त, अध्यक्ष वृक्ष प्राधीकरण / वृक्ष प्राधिकरण समिती यांचा मंजुरीकरिता प्राप्त झाले आहेत.

उपरोक्त प्रस्तांवामधील झाडे कापणे / पुर्नरोपित करणेबाबत तपशील हा म.न.पा. च्या www.mcgm.gov.in या संकेतस्थळावर बृहन्मुंबई महानगरपालिकेविषयी→ विभाग आणि खाते→ खातेनिहाय माहिती पुस्तिका→ उद्याने व वृक्ष प्राधिकरण→ कागदपत्रे→ Advt. 7 days- DD- W.S. -Z-VII- 08 या लिंकवर उपलब्ध आहे.

उपरोक्त प्रस्तावांविषयी नागरिकांच्या काही आक्षेप वा सूचना असल्यास सदर जाहीरात प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात विहित नमुन्यात ( Prescribed Format) उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी यांच्या कार्यालयात सादर कराव्यात. तसेच, आपण आपल्या आक्षेप / सुचना विहित नमुन्यात ( Prescribed Format) dysg.ta@mcgm.gov.in ह्या ई-मेलवरही नोंदवू शकतात.

विहीत मुदतीत सादर न झालेले आक्षेप / सूचनेचा विचार करता येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी. लेखी / ई-मेलद्वारे सुचना / आक्षेप पाठवुनही अति आवश्यक असल्यास आपण या सुचना / आक्षेपांच्या लेखी / ई-मेलच्या प्रतीसह व्यक्तीशः सुनावणीकरीता उपस्थित राहु शकता. सदर सुचना / आक्षेपाबाबतची सुनावणी रोजी उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी यांच्या कार्यालयात दुपारी ४.३० ते ०५.००वाजेदरम्यान करण्यात येईल.

**उद्यान अधीक्षक यांचे कार्यालय**
पेंग्विन इमारत, २ रा माळा, वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, भायखळा (पूर्व) मुंबई - 400027.
दुरध्वनी क्र. २३७४२१६२ Email - sg.gardens@mcgm.gov.in

पीआरओ/२५९०/जाही/२०२३-२४

**झाडे लावा, झाडे जगवा**

**सही/-**
**उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी**

## वायूदलाची पायलट मॅडिसन मार्श बनली मिस अमेरिका

**वॉशिंग्टन:** अमेरिकेच्या इतिहासात प्रथमच वायुसेनेची सक्रिय पायलट मिस अमेरिका बनली आहे. 22 वर्षीय मॅडिसन मार्शने ही सौंदर्य स्पर्धा जिंकली असून ती मिस वर्ल्ड 2024 मध्ये अमेरिकेचे प्रतिनिधित्व करणार आहे. विजयानंतर फॉक्स न्यूज चॅनलला दिलेल्या मुलाखतीत मार्श म्हणाली - सर्वात आनंदाची गोष्ट म्हणजे हा खिताब जिंकणारी मी पहिला सक्रिय वायुसेनेचा पायलट आहे. खरे सांगायचे तर F-16 लढाऊ विमान उडवण्यापेक्षा हे काम माझ्यासाठी अवघड होते. मॅडिसनच्या विजयानंतर यूएस एअर फोर्सने आपल्या अधिकृत ट्विटर हँडलवर मार्शचे दोन फोटोच शेअर केले नाहीत तर इतिहास रचल्याबद्दल तिचे अभिनंदनही केले. म्हणाले- आमच्या सक्रिय पायलट मार्शचे अभिनंदन. तिचा आम्हाला अभिमान आहे. नंतर मार्श म्हणाली- मला वाटते की आपण काहीही साध्य करू शकतो. आपल्याला रोखण्याची ताकद कोणामध्ये असेल तर ते आपणच आहोत. अन्यथा तुमचा मार्ग कोणीही रोखू शकणार नाही. मी एका छोट्या शहरातील आहे आणि याआधी अशा कोणत्याही कार्यक्रमात सहभागी झाले नव्हते. मी नुकतीच



# देशातल्या लोकांची उपासमार घालवण्यासाठी मोदींनी 10 दिवस उपवास करावा

## शरद पवारांचा मोदींवर निशाणा

प्रतिनिधी
बेळगाव

प्रभू श्रीराममंदिराच्या कामाचा निर्णय राजीव गांधी यांच्या काळात झाला. आता भाजप आणि आरएसएस त्याचा मतांसाठी फायदा घेत आहेत, असं म्हणत शरद पवार यांनी सत्ताधारी आणि त्यांच्या सहकाऱ्यांना लक्ष्य केलं आहे. त्यासोबतच गरिबी घालवण्यासाठी सरकार असा कार्यक्रम हाती घेईल का? असा सवाल शरद पवारांनी केला आहे.



बेळगाव जिल्ह्यातील एका सार्वजनिक कार्यक्रमात पवारांनी अशा पद्धतीचे वक्तव्य केले. करण्यात आला आहे. यानिमित्तानं आयोजित कार्यक्रमास शरद पवार यांनी हजेरी लावली होती. यानंतर शरद पवार यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

देशातल्या लोकांची उपसमार घालवण्यासाठी मोदींनी 10 दिवस उपवास करावा असा सल्ला देत शरद पवार यांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला आहे. धार्मिक प्रश्नावर लोकांची मनं वळवण्याचा प्रयत्न केला जात आहे. अयोध्येचा श्रीराम, हनुमान यांच्याबद्दल आम्हाला आदर आहे. अयोध्येतील मशीद पडल्यानंतर इथं राम मंदिर बांधण्याबाबतचा निर्णय राजीव गांधी यांच्या वेळी झाला आहे. राजीव गांधी यांच्या हस्ते शिलान्यास झाला. राम मंदिराचे काम बाजूला राहिले मात्र आता भाजप आणि आरएसएस याचा मतासाठी फायदा करून घेत आहेत, अशी खरमरीत टीका शरद पवारांनी केली आहे.

## भावाच्या मार्कशीटवर मिळवली सरकारी नोकरी; 43 वर्षांनंतर झाली पोलखोल

ग्वाल्हेर

मध्य प्रदेशातील ग्वाल्हेरमधून फसवणुकीचे विचित्र प्रकरण समोर आले आहे. महानगरपालिकेत कर्मचाऱ्याने 43 वर्षे सहाय्यक वर्ग-3 पदावर नोकरी केली. त्याची निवृत्तीची वेळ जवळ आली होती. निवृत्तीनंतर आयुष्य सुखकर होईल, असे त्यांना वाटत होते, पण एका तक्रारीने सर्व काही उद्ध्वस्त केले. हे संपूर्ण प्रकरण ग्वाल्हेर महापालिकेतील सहाय्यक वर्ग-3 कर्मचारी कैलाश कुशवाह यांचे आहे. कुशवाह यांनी जून 1981 मध्ये भाऊ रणेंद्र कुशवाह यांच्या मार्कशीटचा वापर करून ग्वाल्हेर महापालिकेत नोकरी मिळवली. विशेष म्हणजे, 43 वर्षे त्यांनी नोकरी केली, पण एका तक्रारीमुळे त्यांची पोलखोल झाली.

## भारत हुथींच्या रडारवर नाही

# लाल समुद्रातील हल्ल्यांमुळे आमचे नुकसान



## 5 वर्षांनंतर पुन्हा चाबहारवर चर्चा

वृत्तसंस्था
तेहरान

हुथी बंडखोरांना इराणचा पाठिंबा आहे आणि ते पाश्चात्य देशांविरुद्ध काम करत आहेत. भारत थेट हुथींच्या रडारवर नाही. न्यूज 18 ला मिळालेल्या गुप्तचर अहवालात ही बाब समोर आली आहे. त्यानुसार इराणचे इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स (IRGC) आणि हिजबुल्लाह मिळून हुथींना प्रशिक्षण देतात.

ते जहाजांद्वारे हुथी बंडखोरांना ड्रोन, बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि इतर शस्त्रेदेखील देतात. रिपोर्टनुसार, चीन त्यांना कारखाने बांधण्यात, शस्त्रास्त्रांच्या सुट्या भागांची तस्करी आणि अनेक बाबतीत सल्ला देण्यामध्ये मदत करतो. दुसरीकडे, इराण भारताकडे पाश्चात्य देशांच्या विरोधात मित्र म्हणून पाहतो.

वास्तविक, इराणला मुस्लिम देशांचा नेता बनायचे आहे. तथापि, इराण हा शिया समुदायाचा देश आहे, तर भारतात बहुतेक सुन्नी समुदायाचे लोक राहतात. लाल समुद्र आणि हिंदी महासागरात हुथींच्या सततच्या हल्ल्यांबद्दल भारत आणि चीनने चिंता व्यक्त केली आहे.

अशा परिस्थितीत दोन्ही देश या मुद्द्यावर अमेरिकेची बाजू घेतील अशी भीती इराणला वाटत आहे. इराणला भारतासोबत असल्याचे संकेत द्यायचे आहेत. या मालिकेत भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर हे देखील सोमवारी दोन दिवसांच्या दौऱ्यावर इराणला पोहोचले. अफगाणिस्तान, गाझा आणि युक्रेनमधील युद्ध अशा अनेक मुद्द्यांवर भारत आणि इराण यांच्यात द्विपक्षीय चर्चा झाली.

अफगाणिस्तान, गाझा आणि युक्रेनमधील युद्ध अशा अनेक मुद्द्यांवर भारत आणि इराण यांच्यात द्विपक्षीय चर्चा झाली. येथे त्यांनी इराणचे अध्यक्ष इब्राहिम रायसी आणि परराष्ट्र मंत्री हुसेन अमीर-अब्दोल्लाहियान यांची भेट घेतली. समुद्रातील जहाजांवर झालेल्या हल्ल्यांच्या मुद्द्यावर जयशंकर म्हणाले- भारताभोवती जहाजांवर होणारे हल्ले ही आंतरराष्ट्रीय समुदायासाठी गंभीर चिंतेची बाब आहे.

## डीपफेक विरोधात 7 दिवसांत नवे नियम

प्रतिनिधी
नवी दिल्ली

डीपफेकबाबत सरकार नवीन नियम आणत आहे. केंद्रीय मंत्री राजीव चंद्रशेखर यांनी आज म्हणजेच 16 जानेवारीला डीपफेकवर 2 बैठका घेतल्याचे सांगितले. चुकीची माहिती आणि डीपफेकबाबत नवीन आयटी नियमांमध्ये मोठ्या तरतुदी आहेत. त्याचे पालन सर्वांनी करणे बंधनकारक आहे, अन्यथा कारवाई केली जाईल. नवीन IT नियम 7-8 दिवसात अधिसूचित केले जातील. यापूर्वी 23 नोव्हेंबर रोजी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी 'डीपफेक लोकशाहीसाठी नवा धोका म्हणून समोर आला आहे' असे म्हटले होते. केंद्रीय मंत्री म्हणाले की सर्व सोशल मीडिया प्लॅटफॉर्मने डीपफेकचा धोका आणि त्याचे गांभीर्य स्वीकारले आहे. डीपफेकचे निर्माते आणि ते होस्ट करणाऱ्या प्लॅटफॉर्मची जबाबदारी निश्चित केली जाईल, असे वैष्णव म्हणाले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही डीपफेकवर चिंता व्यक्त केली आहे. त्यांचा एक डीपफेक व्हिडिओ समोर आला होता. नुकताच माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरचा एक डीपफेक व्हिडिओ व्हायरल झाला होता.

## कुनो राष्ट्रीय उद्यानातील 'शौर्य'चा मृत्यू; आतापर्यंत 10 चित्ते मरण पावले

वृत्तसंस्था
भोपाळ

मध्य प्रदेशातली कूनो राष्ट्रीय अभयारण्यात आणखी एका चित्त्याचा मृत्यू झाला. हा चित्ता नामबियातून आणण्यात आला होता. त्याचं नाव शौर्य असं ठेवण्यात आलं होतं. शौर्य हा नामिबीयातून आणलेला दहावा चित्ता होता. कूनो या अभय अरण्यात मृत्यू झालेल्या चित्त्यांची संख्या आता दहा झाली आहे. सिंह प्रकल्पाच्या संचालकांनी एक पत्रक जारी केलं आहे. त्यात हे नमूद करण्यात आलं आहे की १६ जानेवारी या दिवशी दुपारी ३.१७ च्या दरम्यान शौर्य या चित्त्याचा मृत्यू झाला. मृत्यूचं कारण शवविच्छेदनानंतर कळणार आहे असंही सांगण्यात आलं आहे.

***कूनोमध्ये आणण्यात आले होते २० चित्ते***

*कूनो नॅशनल पार्कमध्ये प्रोजेक्ट चित्ताच्या अंतर्गत नामीबिया आणि दक्षिण अफ्रिका या ठिकाणाहून २० चित्ते आणण्यात आले होते. या चित्त्यांची चर्चा देशभरात झाली होती. यानंतर आतापर्यंत सात मोठे आणि ३ बछडे अशा दहा चित्त्यांचा मृत्यू झाला. काही दिवसांपूर्वी मादी चित्त्याने काही दिवसांपूर्वी तीन बछड्यांना जन्म दिला आहे. त्याचे फोटो सोशल मीडियावरही पोस्ट करण्यात आले होते. वन विभागाने याविषयी आनंद व्यक्त केला होता. केंद्रीय पर्यावरण मंत्री भुपेंद्र यादव यांनीही या बछड्यांचे फोटो पोस्ट केले होते. हे तिन्ही बछडे सध्या व्यवस्थित आहेत. त्यांची प्रकृती उत्तम आहे असंही स्पष्ट करण्यात आलं आहे.*

***आत्तापर्यंत १० चित्त्यांचा मृत्यू***

*'साशा' या मादी चित्त्याचा २७ मार्चला मूत्रपिंडाच्या आजाराने, तर 'उदय' या चित्त्याचा १३ एप्रिलला हृदय निकामी झाल्यामुळे आणि 'दक्षा' या मादीचा ९ मे रोजी चित्त्यांच्या झुजीनंतर मृत्यू झाला. त्यानंतर ११ जुलैला 'तेजस', १४ जुलैला 'सूरज' तर दोन ऑगस्टला 'धात्री' या मादी चित्त्याचा मृत्यू झाला. भारतात चित्ते आल्यानंतर त्यातील एका मादी चित्त्याने २४ मार्चला चार बछड्यांना जन्म दिला. मात्र, २३ मे रोजी एक तर २५ मे रोजी दोन बछड्यांचा मृत्यू झाला. तसंच आज 'शौर्य' या चित्त्याचा मृत्यू झाला.*

## काश्मीरमधील स्टेडियमला माजी सीडीएस बिपिन रावत यांचे नाव

वृत्तसंस्था
जम्मू

देशाचे पहिले चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ (CDS) बिपिन रावत यांचा डिसेंबर 2021 मध्ये अपघाती मृत्यू झाला होता. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात तामिळनाडूमध्ये लष्कराचे MI-17 हेलिकॉप्टर क्रॅश झाले होते. या अपघातात बिपिन रावत यांच्यासह त्याच्या इतर सहकाऱ्यांचा मृत्यू झाला होता. सांगायचे झाले तर बिपिन रावत बराच काळ बारामुल्लामध्ये कार्यरत होते. ते बारामुल्लाच्या लोकांशी खूप जवळचे होते. याचपार्श्वभूमी आता बारामुल्लाच्या स्टेडियमला दिवंगत बिपिन रावत यांचे नाव देण्यात आले आहे.

जनरल बिपिन रावत यांचे स्मरण करून मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी जनरल बिपिन रावत यांच्या पुतळ्याच्या अनावरणासह डेहराडून येथील स्मारक स्थळाचे उद्घाटन केले आहे. यावेळी ते




म्हणाले होते की, जनरल बिपिन रावत यांच्या स्मृती चिरंतन राहण्यासाठी राज्यातील कोणत्याही मोठ्या प्रकल्पाला त्यांचे नाव देण्यात येईल. यावेळी त्यांनी असेही म्हटले होते की, सीडीएस रावत यांच्या आकस्मिक निधनाने देशाचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले आहे. उत्तराखंड हे लष्करी वर्चस्व असलेले राज्य असून भारतीय लष्कराच्या गौरवशाली इतिहासात उत्तराखंडच्या सैनिकांनी विशेष योगदान दिले आहे. जनरल बिपिन रावत यांनी मातृभूमीसाठी केलेली चार दशके नि:स्वार्थी सेवा विलक्षण शौर्य आणि सामरिक कौशल्याने परिपूर्ण होती.

## राम मंदिरात VIP एंट्रीच्या नावावर सायबर घोटाळा

वृत्तसंस्था
बिलासपूर

22 जानेवारीला राम मंदिरात व्हीआयपी प्रवेश देण्याच्या नावाखाली सायबर घोटाळा सुरू आहे. रामजन्मभूमी गृह संपर्क अभियान ॲपच्या नावाने फाइल तयार करून मोबाईलवर लोकांना मेसेज पाठवले जात आहेत. फाइल डाउनलोड करताच लोक फसवणुकीला बळी पडू शकतात. बिलासपूर पोलिसांनी असे कोणतेही ॲप डाउनलोड करणे टाळण्यास सांगितले आहे. मेसेज मिळाल्यावर तक्रार नोंदवण्यास सांगण्यात येत आहे.

सीएसपी पटेल म्हणाले की, नकळत असे ॲ प डाउनलोड करणे धोक्याचे आहे. यामध्ये लोकांचा वैयक्तिक डेटा चोरू शकणारे सॉफ्टवेअर देखील असू शकते. अशा लिंक्स किंवा फाइल्सच्या माध्यमातून फसवणूक करणारे तुमच्या बँक खात्यातून ऑनलाइन पैसेही चोरू शकतात. पोलिसांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून लोकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. प्रशिक्षणार्थी आयपीएस संदीप पटेल म्हणाले की, राम मंदिराला भेट देण्यासाठी व्हीआयपी पास देण्यासारखी कोणतीही व्यवस्था नाही. ज्याला निमंत्रण आले आहे त्याला अधिकृतरीत्या पाठवले आहे.

## पंजाबच्या मुख्यमंत्र्यांना दहशतवादी पन्नूने अमेरिकेतून दिली धमकी

वृत्तसंस्था
अमृतसर

खलिस्तान समर्थक आणि शीख फॉर जस्टिस (SFJ) दहशतवादी गुरपतवंत सिंग पन्नूने आता मुख्यमंत्री भगवंत मान यांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे. एवढेच नाही तर पंजाबला पुन्हा एकदा दहशतवादाच्या



युगात ढकलण्यासाठी पन्नूने पंजाबच्या गुंडांना त्याच्याशी संपर्क साधण्याचा एक नवीन

### गँगस्टर कृपया संपर्क करा; प्रजासत्ताक दिनी शिक्षा देऊ

व्हिडिओ जारी केला आहे. पन्नूने २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनी वातावरण बिघडवण्याची धमकी दिली आहे.


पन्नूने व्हिडिओमध्ये पंजाबमधील कायदा आणि सुव्यवस्था सुधारण्यासाठी पंजाब पोलिसांचे प्रयत्न चुकीचे असल्याचे म्हटले आहे. व्हिडिओमध्ये पन्नू भूतकाळात झालेल्या चकमकींबद्दल बोलत आहे आणि पंजाब आणि परदेशातील तुरुंगात बसलेल्या गुंडांना त्याच्याशी संपर्क साधण्यास सांगत आहे. एवढेच नाही तर पंजाबमधील कायदा आणि सुव्यवस्था सुधारण्यासाठी उचललेली पावले चुकीची असल्याचे म्हटले.

पन्नूने सीएम मान यांचे वर्णन माजी मुख्यमंत्री बेअंत सिंग असे केले आहे आणि डीजीपी गौरव यादव यांचे माजी डीजीपी गोविंद राम असे वर्णन केले आहे.

### अध्यक्षपदाच्या शर्यतीतून विवेक रामास्वामी बाहेर

**वॉशिंग्टन:** अमेरिकेतील अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी आता अवघे काही दिवस शिल्लक आहेत. या पार्श्वभूमीवर मोठ्या घडामोडी होत आहेत. एकीकडे डोनाल्ड ट्रम्प यांनी आयोवा कॉकसच्या पहिल्या निवडणुकीत विजय मिळवला असतानाच, त्यांचे प्रबळ विरोधी समजले जाणारे विवेक रामास्वामी हे अध्यक्षपदाच्या शर्यतीतून बाहेर पडले आहेत. रामास्वामी यांनी सोमवारी (स्थानिक वेळेनुसार) याबाबत घोषणा केली. त्यांनी डोनाल्ड ट्रम्प यांना आपला पाठिंबा जाहीर केला आहे.

## पुन्हा अध्यक्षपदी निवड झाल्यास इस्रायलचा प्रश्न चुटकीशीर सोडवणार




वृत्तसंस्था
वॉशिंग्टन

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे पुन्हा दुसऱ्या टर्मसाठी प्रयत्नशील आहेत यासाठी त्यांनी यावेळी चांगलाच जोर लावला आहे. या आपल्या प्रचारादरम्यान, त्यांनी नवी भूमिका मांडली आहे. जर मी अद्यापही अमेरिकेचा अध्यक्ष असतो तर इस्रायलवर हमासकडून हल्लाच झाला नसता असं त्यांनी म्हटलं आहे.

तसेच जर पुन्हा आपण निवडून आलो तर हा प्रश्न चुटकीसरशी सोडवू असंही त्यांनी म्हटलं आहे. 'दि टाइम्स ऑफ इस्रायल' या वर्तमानपत्राशी बोलताना त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. सीएनएनच्या वृत्तानुसार, ट्रम्प यांचा मंगळवारी आयोवा कोकाससमध्ये ट्रम्प यांचा विजय झाला आहे. यामुळं आगामी २०२४ मधील राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी रिपब्लिकन पक्षाच्या नामांकनासाठी ट्रम्प यांचं स्थान मजबूत झालं आहे.

२०१४ मध्ये हिलरी क्लिंटन यांचा पराभव करत ट्रम्प हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बनले होते. त्यानंतर परत दुसऱ्या टर्मसाठी त्यांना रिपब्लिकन पार्टीनं उमेदवारी दिली होती. पण जो बायडन यांच्याविरोधात त्यांचा पराभव झाला होता. पण आता पुन्हा एकदा ते निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत. म्हणजेच सलग तिसऱ्या वेळेस ट्रम्प निवडणूक लढवण्यास सज्ज आहेत.

कोकाससमध्ये विजयानंतर ट्रम्प यांनी बायडन यांच्यावर टीका केली आहे. बायडन हे अमेरिकेच्या इतिहासात आत्तापर्यंतचे सर्वात खराब अध्यक्ष आहेत, असं त्यांनी म्हटलं आहे. जर आपण अजूनही अध्यक्ष असतो तर रशिया युक्रेनवर कधीही हल्ला करु शकला नसता तसेच इस्रायलवर कधीही हल्ला झाला नसता. पण जर आपल्याला नोव्हेंबरमध्ये पुन्हा संधी मिळाली तर इस्रायलचा प्रश्न चुटकीशीर सोडवू असं आश्वासनही त्यांनी दिलं.

## जाना था हनिमून, पहुंच गये जेल...

### पायलटच्या कानशिलात लगावणाऱ्याची व्यथा

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

दिल्ली-गोवा इंडिगो फ्लाइटमध्ये एका प्रवाशाने सहपायलटला मारहाण केल्या व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या प्रकरणी इंडिगोने प्रवाशाविरोधात तक्रार दाखल केली होती. यानंतर दिल्ली पोलिसांनी प्रवाशी साहिल कटारियाला अटक देखील केले होते. यानंतर सोमवारी (14 जानेवारी) सायंकाळी साहिल कटारियाला जामीन देखील मंजूर करण्यात आला. सहपायलटला



मारहाण करताचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता.

या प्रकरणी दिल्ली पोलिसांनी साहिल कटारियाविरोधात आयपीसीच्या कलम 323, 341 आणि कलम 290 अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणी अधिकाऱ्यांची साहिल कटारियाची सुटका करण्यात आली. या प्रकरणाचा तपास पोलीस करत आहेत. साहिल कटारियाचे नुकतेच लग्न झाले आहे. साहिल कटारिया पत्नीसोबत हनिमूनसाठी गोव्याला निघाला होता. पण इंडिगोची फ्लाइट ही खराब हवामानामुळे उड्डाणाला विलंब होणार असल्याची घोषणा सहपायलटने गेली. यावेळी साहिल कटारिया संतापल्यानंतर सहपायलटच्या कानशिलात लगावली.

## अयोध्येतील सर्व हॉटेल 100 टक्के बुक

### 170 किलोमीटर अंतरातील रुमचे भाडे गगनाला भिडले

वृत्तसंस्था
अयोध्या

येत्या 22 जानेवारीला अयोध्येतील राम मंदिरात राम लल्लाचा प्राण प्रतिष्ठा सोहळा संपन्न होणार आहे. त्यामुळे त्याठिकाणी प्राण प्रतिष्ठा सोहळ्याची तयारी जोरात सुरू आहे. देशाभरात या कार्यक्रमामुळे उत्साहाचे वातावरण आहे, मात्र अयोध्येत रस्त्यांपासून विमानतळापर्यंत सर्वच गोष्टींचे भाव गगनाला भिडले आहेत. राम लल्लाच्या प्राण प्रतिष्ठा सोहळ्याला अवघे काही दिवस बाकी असतानाच या महिन्यासाठी अयोध्येतील सर्व हॉटेल्स 100 टक्के बुक झाली आहेत. याशिवाय अयोध्येपासून 170 किलोमीटरच्या अंतरात असलेल्या परिसरातील म्हणजेच लखनऊ, प्रयागराज आणि गोरखपूरमध्येही हॉटेल्सच्या मागणीत झपाट्याने वाढत होताना दिसत आहे.



सिग्नेट हॉटेल्स आणि रिसॉर्ट्सचे एमडीचे संस्थापक म्हणाले की, त्यांच्या हॉटेलमधील सर्व खोल्या या महिन्यासाठी बुक केल्या गेल्या आहेत. हॉटेलमधील खोल्यांचे सरासरी भाडे 85 हजार रुपयांच्या पुढे गेले आहे. सिग्नेट कलेक्शन केके यांनी अयोध्येतील सर्व हॉटेल्सच्या 45 टक्के खोल्या टेंपल ट्रस्टसाठी बुक केल्या आहेत. जेणेकरून व्हीआयपी लोकांना तिथे राहता येईल.

रॅडिसनने पार्क इन हॉटेलमध्ये बुकींग सुरू झाल्यानंतर 21 जानेवारीपर्यंत पूर्णपणे बुक झालेले आहे. सिग्नेट कलेक्शन केके हॉटेलच्या सर्व खोल्या या महिन्यासाठी आगाऊ बुक करण्यात आल्या आहेत. प्रत्येक खोलीची किंमत सुमारे 85 हजार रुपये आणि त्याहूनही जास्त किमतीने बुक झाली आहे. रॅडिसनने पार्क इन हॉटेलमध्येही बुकींग सुरू झाल्यानंतर बुकिंगचा महापूर आला. विशेष म्हणजे हॉटेलने कोणत्याही सार्वजनिक प्लॅटफॉर्मवर खोलीच्या किमती शेअर केलेल्या नाहीत, अशातही सर्व हॉटेलच्या खोल्या 21-22 जानेवारीसाठी बुक झाल्या आहेत.

## नेतन्याहू यांना युद्धासाठी मिळाले बजेट, मंत्रिमंडळाची 15 अब्ज डॉलर्सना मंजुरी

वृत्तसंस्था
तेल अवीव

इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांना राजकीय पटलावर मोठा दिलासा मिळाला आहे. मंत्रिमंडळाने 2024च्या अर्थसंकल्पात 55 अब्ज शेकेल (इस्रायली चलन) अतिरिक्त अर्थसंकल्प मंजूर केला आहे. हे अंदाजे 15 अब्ज यूएस डॉलर्सच्या समतुल्य आहे.

7 ऑक्टोबर रोजी सुरू झालेल्या युद्धानंतर नेतान्याहू यांनी या अर्थसंकल्पासाठी दोनदा प्रयत्न केले होते. दुसरीकडे, एका इस्रायली फुटबॉलपटूला तुर्कीमध्ये अटक केल्यानंतर इस्रायलला परत पाठवण्यात आले आहे. या टबॉलपटूने आपल्या मनगटावर पट्टी बांधून हमासने ओलिस ठेवलेल्यांची सुटका करण्याची मागणी केली होती. मंत्रिमंडळाची बैठक सुमारे दोन तास चालली. त्यात अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली.तीन महिन्यांपासून सुरू असलेले युद्ध आणि त्याचा अर्थसंकल्प याबाबत अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले. तथापि, नंतर तात्काळ $15 बिलियनचे आणीबाणीचे बजेट जारी करण्याचे मान्य करण्यात आले.

बजेटचा बहुतांश भाग लष्करी उपकरणांवर खर्च केला जाणार आहे. याशिवाय दुसरा भाग युद्धामुळे प्रभावित झालेल्या लोकांच्या उपचार आणि नुकसानभरपाईवर खर्च केला जाईल. काही अहवालांमध्ये असे म्हटले आहे की ही बैठक रविवारी रात्री ते सोमवारी सकाळपर्यंत चालली आणि नंतर नेतन्याहू आणि संरक्षण मंत्री स्मोट्रिच या बैठकीसाठी स्वतंत्रपणे भेटले.

नंतर स्मोट्रिच म्हणाले- आम्ही आरोग्य बजेट वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. मानसिक आरोग्य आणि रुग्णालयाच्या सुविधांवर सुमारे एक अब्ज डॉलर्स खर्च केले जातील. याशिवाय शिक्षणाच्या बजेटमध्येही वाढ करण्यात येत आहे. एक मुद्दा अंतर्गत सुरक्षेचा आहे. 7 ऑक्टोबरनंतर ते हायटेक करणे गरजेचे आहे. सध्या आमचे लक्ष युद्धावर आहे आणि ते जिंकणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे आम्ही या क्षेत्रावर सर्वाधिक लक्ष केंद्रित केले आहे. 28 वर्षीय सेझिव्हने रविवारी तुर्की लीगमध्ये गोल केल्यानंतर कॅमेऱ्यावर आपला मनगटाचा बँड फ्लॅश केला. त्यावर होस्टेज क्रायसिसशी संबंधित घोषणा लिहिली होती.

### इस्रायली फुटबॉलपटूला तुर्कीमध्ये अटक




***इस्रायली फुटबॉलपटूला अटक***

*एका इस्रायली फुटबॉलपटूला तुर्कीमध्ये अटक करून त्याला इस्रायलला परत पाठवण्यावरून इस्रायल आणि तुर्की आमने-सामने आले आहेत. सेजीव जेहेकेल असे या खेळाडूचे नाव आहे. 28 वर्षीय सेझिव्हने रविवारी तुर्की लीगमध्ये गोल केल्यानंतर कॅमेऱ्यावर आपला मनगटाचा बँड फ्लॅश केला. त्यावर होस्टेज क्रायसिसशी संबंधित घोषणा लिहिली होती. स्थानिक मीडियानुसार - मनगटावर 100 दिवस तुरुंगात... असे लिहिले होते. हमासच्या कैदेत अजूनही 132 इस्रायली ओलीस आहेत आणि त्यांच्या सुटकेबाबत दहशतवादी संघटनेने अद्याप काहीही सांगितलेले नाही. इस्रायलने किमान एक महिन्यासाठी युद्धविराम पाळावा, त्यानंतरच ओलीसांच्या सुटकेबाबत चर्चा होऊ शकते, अशी हमासची मागणी आहे. दुसरीकडे, इस्रायलच्या परराष्ट्र मंत्रालयाने तुर्कीच्या या कारवाईला हुकूमशाही आणि नाझीवादाची घटना असल्याचे वर्णन केले आणि सांगितले की या प्रकरणावर लक्ष ठेवले जाईल जेणेकरून योग्य वेळी प्रतिक्रिया दिली जाऊ शकेल.*